


# जनमाध्यम


e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ रविवार ३१ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०+४







# ३५ वर्षीय तरुणाचा चंद्रभागा नदीत आढळला मृतदेह

## मृतक बेंबळा बु. येथील रहीवासी

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील बेंबळा बु येथील ३५ वर्षीय तरुणाचा मृतदेह चंद्रभागा नदीच्या मोठया पुलाजवळ चंद्रपूर हद्दीत आज (दि.३०) सकाळच्या सुमारास आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

सचिन अशोक कुरवाडे (वय ३५) असे मृतक तरुणाचे नाव असून आज सकाळी चंद्रभागा नदी जवळून बकऱ्या चारण्यासाठी गेलेल्या इसमास मृतदेह नदीच्या पाण्यात आढळून आला. याबाबतची माहिती खल्लार पोलिसांना मिळताच ठाणेदार रविंद्र बारड यांच्यासह वेंकेश नाकील, विजय निमकांडे, जितेंद्र पाली, दिवेकर यांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचा व मृतकाचा पंचनामा करुन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे पाठविला.



सचिन कुरवाडे याला दारु पिण्याचे व्यसन असल्याने तो काल (दि.२९) रात्री ९:३० ते १० वाजताच्या दरम्यान घरून बाहेर गेला होता.रात्री दारूच्या नशेत तो मोठया पुलावरून चंद्रभागा नदी पात्रात पडला असावा व त्यातच त्याचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे.

आज सकाळी त्याचा मृतदेह हा आढळून आला.पुलावर मृतकाच्या पायातील चप्पल व पॅन्ट आढळून आली तर मृतदेह हा १५० मिटर दूर अंतरावर नदीत आढळून आल्याने आत्महत्या आहे की घातपात? याबाबत नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा आहे. शवविच्छेदनानंतर बेंबळा येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले .

मृतकाच्या पश्चात भाऊ, आई वडील, पत्नी, तीन वर्षाची मुलगी व चार महिन्याचा मुलगा असा आप्त परिवार आहे. हा घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

> घटनास्थळाचा व मृतकाचा पंचनामा केला असता मृतकाच्या शरीरावर घातपात असल्याचे कुठलेही निशाण आढळून आले नाही. मृतक हा पुलावरून खाली पडल्याने पाय फॅक्चर असल्याचे आढळले. याबाबत खल्लार ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास बारकाईने करण्यात येईल.
>
> **-रविंद्र बारड, ठाणेदार, खल्लार**

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल, चार अल्पवयीन आरोपी ताब्यात

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** बाहेरगावी शिक्षणासाठी असलेल्या १४ वर्षीय जुळ्या बहिणींचा पाठलाग करून एका बहीणीचा हात धरून विनयभंग केल्याची घटना रहीमापुर पोलीस स्टेशन हद्दीतील घडली. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून रहीमापुर पोलिसांनी पोस्को कायद्यासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करत चारही अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपी आणि पीडिता वेगवेगळ्या समाजाचे असल्याने गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी गावी आलेल्या पीडित जुळ्या बहिणी दि. २९ रोजी रात्री अंदाजे साडेआठ वाजता जेवणानंतर विहीगाव फाट्या कडे फिरण्यासाठी गेल्या होत्या. डांबरी रस्त्याने पायी परत येत असताना त्यांच्या पुढे




दोन व पाठीमागे दोन असे एकूण चार मुले चालत होते. रस्त्यात ही मुले अश्लील इशारे करत असल्याचे मुलींच्या लक्षात आले. घाबरलेल्या दोन्ही बहिणी मध्येच लागणाऱ्या काकांच्या घरी थोडावेळ थांबल्या. आपण थांबलो तर ही मुले निघून जातील असे त्यांना वाटले. मात्र, उर्दू शाळेजवळ ती चारही मुले थांबलेली दिसली. त्यातील एकाने वो आगे, उनके पीछे चलो असे म्हणताच एकाने पुढे येऊन पीडित मुलीचा हात पकडला. मुलीने हाताला झटका देत बहिणीसह जवळच्या मंदिरात धाव घेतली व तेथील महिलेला घडलेला प्रकार सांगितला.

त्यानंतर दोघी घरी जाण्यास निघाल्या असता रस्त्यावरील त्याच गटातील एका मुलाने पुन्हा अडवून मुझे तू पसंद है, तेरा क्या कहना है असे म्हटले. मुलींनी त्याच्याकडे दुर्लक्ष करून थेट घर गाठले व वडिलांना संपूर्ण प्रकार सांगितला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांचा जमाव झाला होता. परीस्थितीचे गांभीर्य ओळखत रहीमापुर चिंचोली पोलीसांनी दोन्ही बाजुकडील जमावाला शांत करत अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेऊन वातावरण निवळण्याची मोठी कामगीरी पार पाडली.

पीडित मुलीच्या तक्रारीवरून रहीमापुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन ठाणेदार आनंद होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) सह संबांधित कलम ७४, ७५(१)(आय), ७५(२), ७८, ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३, कलम ८, १२ अंतर्गत POCSO नोंद करून तपासात घेण्यात आला असुन पुढील तपास सुरू आहे.

# जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची अभिनव संकल्पना

## राज्यात प्रथमच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शंभर टक्के पारदर्शक बदल्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा प्रशासनात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्या यावर्षी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नेतृत्वात करण्यात आल्या असून यावर्षी जिल्हा प्रशासनाने राज्यात प्रथमच समुपदेशाने बदलीचे धोरण काटेकोरपणे अंमलबजावणी करीत केले आहे. जिल्हाधिकारी येरेकर यांनी स्वतः बदलीसाठी पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधला.

शंभर टक्के बदल्या समुपदेशाने करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाची भावना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या बचतीच्या आव्हानाला प्रतिसाद देत समुपदेशनाने बदलीचा प्रयोग जिल्ह्यात यशस्वी ठरलेला आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या आस्थापनेवरील प्रशासकीय बदलीस पात्र सहायक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहायक व वाहनचालक या संवर्गांच्या प्रशासकीय बदल्या-२०२६ दि. २९ मे २०२६ रोजी समुपदेशनाद्वारे पार पडलेल्या आहेत.

दरवर्षी समुपदेशनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे प्रशासकीय बदलीस पात्र कर्मचारी उपस्थित राहून समुपदेशनाद्वारे बदली प्रक्रियेत सहभागी होतात. परंतु यावर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर देशातील नागरिकांना केलेल्या आवाहनानुसार घरून काम करण्याची मुभा, अनावश्यक सोने खरेदी टाळणे, पेट्रोल व डिझेलचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करणे, खाद्यतेलाचा वापर कमी करणे, रासायनिक खतांवरील अवलंबिता कमी करून नैसर्गिक शेती करणे, स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढविणे व परदेश दौरे टाळणे इ. बाबींचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने उपाय योजना प्रस्तावित केल्या आहेत.



त्यानुसार केंद्र व राज्य शासनाने सूचित केलेल्या उपाययोजनांचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या अधिनस्त जिल्ह्यातील सहायक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसुल सहायक, ग्राम महसुल अधिकारी, वाहन चालक इत्यादी संवर्गातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांना पेट्रोल, डिझेलचा अपव्यय टाळण्यासाठी तसेच प्रवास टाळण्यासाठी त्यांच्या कार्यालयातून जिल्हाधिकारी कार्यालयात न बोलविता दि. २९ मे रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे समुपदेशन बदली प्रक्रिया आयोजित करण्यात आली. यामध्ये सहायक महसूल अधिकारी संवर्गात बदलीस पात्र ४१ कर्मचाऱ्यांपैकी ४१ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली, मंडळ अधिकारी संवर्गात ५ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचाऱ्यांची बदली झाली, ग्राम महसूल अधिकारी संवर्गात ८२ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ८२ कर्मचाऱ्यांची बदली झाली, महसूल सहायक संवर्गात ३९ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ३९ कर्मचाऱ्यांची बदली झाली आणि वाहन चालक संवर्गात ३ पात्र कर्मचाऱ्यांपैकी ३ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आलेली आहे.

या बदली प्रक्रियेत सर्व संबंधित कर्मचारी यांनी त्यांच्या कार्यालयातूनच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग घेतलेला आहे. वरीलप्रमाणे पार पडलेल्या बदली प्रक्रियेबाबत सर्व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. धारणी, वरूड, अंजनगाव सुर्जी, धामणगांव रेल्वे इत्यादी दूरच्या कार्यालयातून बदली प्रक्रियेसाठी अमरावती मुख्यालयात न येता त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रक्रियेत सहभागी होता आल्यामुळे अत्यंत पारदर्शक व विक्रमी वेळेत बदली प्रक्रिया पार पडल्यामुळे कर्मचारी संघटनांनी आनंद व्यक्त केलेला आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी अभिनव संकल्पना राबविल्यामुळे त्यांचे आभार व्यक्त केले आहेत. या बदली प्रक्रियेमुळे कर्मचाऱ्यांच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय न झाल्यामुळे सदर बदली प्रक्रिया यापुढेही अशाचप्रकारे राबवावी, असे कर्मचाऱ्यांनी मत व्यक्त केले आहे. आशियाई संकटाच्या आव्हानात्मक परिस्थितीत जिल्हाधिकारी येरेकर यांनी प्रशासकीय बदल्या सुयोग्य, पारदर्शक आणि प्रभावी पद्धतीने पार पाडल्या आहेत आणि हा उपक्रम निश्चितच प्रशंसनीय आहे.

# हॉटेल व्यावसायिकावर २० ते २५ अज्ञात युवकांचा जिवघेणा हल्ला

## -अंजनगाव टी पॉइंटवरील घटना

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर अंजनगाव टी पॉईंट परिसरात शुक्रवारी (दि.२९) ला सायंकाळच्या सुमारास धक्कादायक घटना घडली. दर्यापूर येथिल हॉटेल व्यावसायिक मनोज पाटील टेटू यांच्यावर २० ते २५ अज्ञात युवकांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात मनोज पाटील गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर दर्यापूर येथिल उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

माहितीनुसार, अचानक आलेल्या युवकांच्या टोळक्याने हल्ला चढविला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तात्काळ जखमींना रुग्णालयात दाखल केले.



दरम्यान, हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू केला आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# शेतमजुरांनी भरलेली टाटा एस पलटी; आठ महिला जखमी

**समुद्रपूर :** धुमनखेडा येथील शेतातून काम आटोपून परतणाऱ्या शेतमजुरांना घेऊन जाणाऱ्या टाटा एस वाहनाचा अपघात होऊन आठ महिला मजूर जखमी झाल्या. समुद्रपूर शहराजवळील स्मशानभूमी परिसरात चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन पलटी झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, समुद्रपूर येथील महिला मजूर धुमनखेडा येथील शेतात फणे गोळा करण्यासाठी गेल्या होत्या. काम आटोपल्यानंतर त्या एमएच-३२ यू-०५९५ क्रमांकाच्या टाटा एस वाहनातून परतत असताना स्मशानभूमीजवळ वाहन अनियंत्रित झाले. वाहनाने दोन पलट्या घेतल्याने त्यातील महिला मजूर जखमी झाल्या. या अपघातात विमल पुंडलिक गिरोले, आम्रपाली दिलीप बडवाई, अपर्णा रविंद्र उनपाने, प्रीती विलास मेश्राम, सोनाबाई किशोर गजभिये, कल्पना सुभाष मेश्राम, मिना गजू टेंभरे यांच्यासह अन्य एक महिला जखमी झाली. जखमींना तातडीने समुद्रपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रीती मेश्राम यांना गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

## १० वरील उर्वरित

### विधान परिषद निवडणूक

काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष हेमंत देशमुख यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी उपस्थित नेत्यांनी हर्षजीत देशमुख यांना शुभेच्छा देत आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला. विविध पक्षांचे नेते एकत्र आल्याने महाविकास आघाडी ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढविणार असल्याचे संकेत मिळाले.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना हर्षजीत देशमुख म्हणाले, 'आम्ही केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नव्हे, तर जनतेचा विश्वास आणि पाठिंबा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहोत. महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांचे सहकार्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांचा पाठिंबा आमच्यासोबत असून विजय निश्चित आहे.'

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेदरम्यान परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत उमेदवाराला शुभेच्छा दिल्या. आगामी निवडणुकीत ही लढत रंगतदार होण्याची चिन्हे यानिमित्ताने स्पष्ट झाली आहेत.

### बँक खात्यातून सहा लाख रुपये

व्यवहार पांडे यांनी स्वतः केले नव्हते. त्यामुळे अज्ञात सायबर भामट्यांनी त्यांच्या खात्यात प्रवेश मिळवून ऑनलाइन आर्थिक फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर त्यांनी सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर तक्रार नोंदवून पोलिसांकडे धाव घेतली. फिर्यादीच्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, चोरीला गेलेली रक्कम कोणत्या खात्यात वळविण्यात आली आणि आरोपींनी फसवणुकीसाठी कोणती पद्धत वापरली याचा तपास सुरू आहे. दरम्यान, वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी बँक खात्यांशी संबंधित ओटीपी, पासवर्ड, लिंक किंवा वैयक्तिक माहिती कोणासोबतही शेअर करू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### साईनगर अकोली येथे २७ वर्षीय

कोणतीही स्पष्ट कारणे समोर आली नसून, युवकाने हे टोकाचे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले याचा शोध पोलीस घेत आहेत. या घटनेची नोंद खोलापुरी गेट पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली असून, पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे.

युवकाच्या आत्महत्येमागील कारणांचा उलगडा करण्यासाठी कुटुंबीय व संबंधितांकडून माहिती संकलित करण्यात येत आहे. दरम्यान, तरुण वयात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे साईनगर अकोली परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## दहेगाव स्टेशन शिवारात अवैध इंधनसाठा जप्त

**वर्धा :** सावंगी (मेघे) पोलिसांनी दहेगाव स्टेशन शिवारात धाड टाकून अवैधरीत्या साठवून ठेवलेले तब्बल २ हजार ७३० लिटर डिझेल व पेट्रोल जप्त केले. या कारवाईत २ लाख ८५ हजार ७५९ रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना दहेगाव स्टेशन परिसरात काही व्यक्तींच्या संशयास्पद हालचालींबाबत गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार सावंगी पोलिसांचे पथक जिल्हा पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. तेथे तपासणी केली असता काळ्या व निळ्या रंगाच्या प्लास्टिक कॅनमध्ये मोठ्या प्रमाणात इंधन साठवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले.

# जागतिक शांतता आणि सामाजिक सलोख्यासाठी हजारो कंठातून उमटला 'सामुदायिक प्रार्थने'चा सूर!

## -राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजयंतीनिमित्त युगप्रभात फाउंडेशनचा उपक्रम

**-खासदार, आमदारांसह सर्वपक्षीय नेते आणि हजारो अमरावतीकरांची उपस्थिती**

**अमरावती/प्रतिनिधीः-** जगात सध्या सुरू असलेल्या युद्धांचे सावट आणि त्याचे सर्वच देशांवर होणारे विपरित परिणाम, तसेच देशांतर्गत धार्मिक सलोखा टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान समोर असतानाच, अमरावतीत आज एक अभूतपूर्व आणि सकारात्मक सोहळा अनुभवायला मिळाला. निमित्त होते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजयंतीचे. या पर्वाचे औचित्य साधून 'युगप्रभात फाउंडेशन' आणि 'सामुदायिक प्रार्थना आयोजन समिती, अमरावती' यांच्या वतीने स्थानिक पंचवटी चौक येथील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्यापाशी एका भव्य 'विश्वशांतीकरीता सामुदायिक प्रार्थना' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आज सायंकाळी ६:३० वाजता पार पडलेल्या या सोहळ्यात हजारो अमरावतीकरांनी एकत्र येत विश्वशांतीसाठी प्रार्थना केली.





'धर्म-पंथ देशाचे भांडण । न मिटे ऐक्य-प्रेमाविण । ते प्रेम साधाया प्रार्थने समान। पातळी नाही उमध ?

राष्ट्रसंतांच्या याच उदात्त विचारांचा धागा पकडून, समाजात बंधुभाव, ऐक्य आणि जागतिक शांतता निर्माण व्हावी या मुख्य उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. सध्याच्या अस्थिर जागतिक वातावरणात आणि देशात धर्माधर्मामध्ये निर्माण होणारी तेढ दूर करण्यासाठी मानवी मूल्ये जपणे व सामूहिक प्रार्थनेच्या माध्यमातून मनामनात शांततेचा संदेश पोहोचवणे ही काळाची गरज बनली आहे, हाच सूर या संपूर्ण सोहळ्यातून उमटला.

**मान्यवरांची मांदियाळी आणि जनसागर-**

या मंगलमय सोहळ्याला अमरावतीतील विविध क्षेत्रांतील प्रमुख व्यक्तिमत्त्वांची आणि राजकीय नेत्यांची विशेष उपस्थिती लाभली होती. यामध्ये प्रामुख्याने आदरणीय पद्मश्री जनार्धन बोथे गुरुजी, आचार्य हरिभाऊजी वेरुळकर, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवाणी, मनपा गटनेते चेतन गावंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**भक्तिमय आणि ऊर्जस्विनी वातावरण**

-पंचवटी चौकातील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मारकाचा परिसर आज सामुदायिक प्रार्थनेने आणि जयघोषाने भक्तीमय झाला होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि संत गाडगे बाबा यांच्या विचारांमधून प्रेरणा घेत, उपस्थित सर्व मान्यवर आणि हजारो नागरिकांनी एका सुरात, एका लयीत विश्वशांतीसाठी सामूहिक प्रार्थना केली. डोळे मिटून, शांत चित्ताने केलेल्या या प्रार्थनेमुळे संपूर्ण परिसरात एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली होती. जागतिक युद्धजन्य परिस्थितीचा फटका सर्वसामान्य माणसाला बसत असताना, भारतासह संपूर्ण जगात शांतता, सौहार्द आणि प्रेम नांदावे, अशी भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युगप्रभात फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी व आयोजन समितीने विशेष परिश्रम घेतले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ रविवार, ३१ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# माने हॉस्पिटल गर्भलिंगनिदान प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट

## पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह, पाच आरोपींवर गुन्हा दाखल होऊनही अटक नाही

■ पप्पु घुगे ■

*वाशीम : मालेगाव येथील माने हॉस्पिटलमध्ये उघडकीस आलेल्या अवैध गर्भलिंगनिदान चाचणी प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडवून दिली असतानाच या प्रकरणातील आरोपी अद्यापही पोलिसांच्या हाती लागले नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दि. २३ मे रोजी गुन्हा दाखल होऊन अनेक दिवस उलटून गेले तरी मुख्य आरोपींसह इतर संशयित खुलेआम फरार असल्याने पोलिसांच्या तपासाच्या गतीवर आणि कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.*

### आरोपींना अभय कोणाचे ?



आरोग्य विभागाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मालेगाव येथील माने हॉस्पिटलमध्ये गर्भलिंगनिदान चाचणीचा अवैध व्यवसाय सुरू असल्याची शंका व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर आरोग्य विभागाच्या विशेष पथकाने रितसर तपासणी केली असता धक्कादायक बाबी समोर आल्या. प्राथमिक चौकशीत गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने मालेगाव पोलिस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली.

या तक्रारीच्या आधारे हॉस्पिटलचे संचालक डॉ. विवेक माने यांच्यासह कृष्णा खडसे, गजानन वानखेडे, दीपक बदर आणि एका अज्ञात महिला डॉक्टरविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र गुन्हा नोंद होताच आरोपी पोलिसांना चकवा देत पसार झाले. विशेष म्हणजे एवढ्या गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात आरोपींना अटक करण्यात पोलिसांना अद्याप यश आलेले नाही. दरम्यान, जिल्ह्यातील सामाजिक संघटना, महिला संघटना आणि विविध स्तरांतील नागरिकांनी या प्रकरणात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मुलींच्या जन्मदरावर परिणाम करणाऱ्या आणि समाजासाठी घातक ठरणाऱ्या गर्भलिंगनिदानासारख्या गंभीर गुन्ह्यात आरोपींना अद्याप अटक न होणे ही चिंताजनक बाब असल्याचे मत व्यक्त होत आहे.या प्रकरणी पोलिस प्रशासन व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, 'आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके कार्यरत असून तपास सुरू आहे,' असे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात आरोपी अद्याप फरारच असल्याने तपास यंत्रणांच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरलेल्या या प्रकरणात आरोपींना कोणाचे राजकीय किंवा प्रशासकीय संरक्षण मिळत आहे काय? आरोपींना अटक करण्यात विलंब का होत आहे? पोलिसांच्या तपासात नेमके अडथळे कोणते? असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. गर्भलिंगनिदानासारख्या समाजविघातक कृत्याविरोधात शासनाने कठोर भूमिका घेतलेली असताना वाशीम जिल्ह्यातील या गाजलेल्या प्रकरणात आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे आता पोलिस प्रशासन आरोपींना केव्हा अटक करते आणि या प्रकरणाचा संपूर्ण पर्दाफाश केव्हा होतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### राजकीय महत्त्वाकांक्षांवर प्रश्नचिन्ह?

मालेगाव येथील माने हॉस्पिटल प्रकरणामुळे चर्चेत आलेले डॉ. विवेक माने हे गेल्या अनेक वर्षांपासून वाशिम–मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत होती. निवडणुका जवळ आल्या की विविध माध्यमांतून त्यांची सक्रियता आणि बॅनरबाजीही पाहायला मिळत होती. मात्र, आता समोर आलेल्या गंभीर प्रकरणामुळे त्यांच्या राजकीय वाटचालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणाचा भविष्यातील राजकीय समीकरणांवर काय परिणाम होईल? जनतेसमोर निर्माण झालेली प्रतिमा कायम राहील का? तसेच आगामी काळातील नेतृत्वाच्या दावेदारीवर याचा कितपत प्रभाव पडेल? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सध्या प्रकरणाचा तपास सुरू असला तरी या घडामोडींमुळे डॉ. माने यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांना मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय आणि सामाजिक वर्तुळात रंगू लागली आहे.

---

## विदेशी वृक्षांच्या वाढत्या लागवडीमुळे जैवविविधतेला धोका; देशी झाडे लावण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■



मादागास्करमधून आलेला गुलमोहर, ऑस्ट्रेलियातील निलगिरी तसेच सुबाभूळ, पेल्ट्रोफोरम, अकेशिया, स्पॅथोडिया, कॅशिया, ग्लिरिसिडीया, सप्तपर्णी आणि रेन ट्री यांसारख्या विदेशी वृक्षांच्या वाढत्या लागवडीमुळे स्थानिक जैवविविधतेवर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता पर्यावरण अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर देशी वृक्षांचे संवर्धन आणि लागवड करण्याचे आवाहन राष्ट्रीय हरित सेना समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले आहे.

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण अमेरिकेतून आलेल्या गव्हाबरोबर पार्थेनियम अर्थात गाजर गवत भारतात आले आणि स्थानिक परिसंस्थेसाठी मोठी समस्या ठरले. स्थानिक अन्नसाखळीत त्यावर नियंत्रण ठेवणारे जीव नसल्याने या तणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. त्याचप्रमाणे विदेशी वृक्षांच्या अतिलागवडीमुळे अनेक भागांत स्थानिक पक्षी, कीटक आणि प्राण्यांचे अधिवास कमी होत आहेत. काही विदेशी झाडांवर पक्षी घरटी बांधत नाहीत तसेच स्थानिक परागीभवन करणारे कीटकही कमी प्रमाणात दिसून येतात.

पूर्वी सहज आढळणाऱ्या चिमण्या, घुबड, गिधाडे, गरुड, वटवाघुळे आणि रातकिड्यांचे प्रमाण कमी झाल्याचेही त्यांनी नमूद केले. जंगलातील अन्नसाखळी विस्कळीत झाल्यास वन्यप्राणी मानवी वस्तीकडे वळण्याची शक्यता वाढते, असेही त्यांनी सांगितले.

भारतीय संस्कृतीत वृक्षांना विशेष महत्त्व असल्याचे सांगताना त्यांनी पिंपळ, वड, कडुलिंब, चिंच, बेल, आवळा आणि आंबा यांसारख्या देशी वृक्षांचे महत्त्व अधोरेखित केले. देशी वृक्ष स्थानिक हवामान, माती आणि जैवविविधतेशी सुसंगत असल्याने त्यांच्या फांद्यांवर पक्षी घरटी बांधतात, फुलांवर मधमाशा व फुलपाखरे आकर्षित होतात आणि अनेक प्राणी त्यांच्या फळांवर अवलंबून असतात. या झाडांच्या पाचोळ्यामुळे जमिनीचा कसही वाढतो. वड, पिंपळ, उंबर, जांभूळ, आंबा, करंज, बहावा, कदंब, आवळा, मोह, पळस, फणस, बेल, चिंच, कडुनिंब आणि सीताफळ यांसारखी देशी झाडे पर्यावरण संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले.

'फोटोसाठी वृक्षारोपण नव्हे, तर पर्यावरणासाठी वृक्षसंवर्धन गरजेचे आहे. हिरवळ वाढवताना जैवविविधतेचे संरक्षण करणे अधिक महत्त्वाचे आहे. एक झाड लावा; पण योग्य देशी झाड लावा,' असे आवाहन अभिजीत जोशी यांनी केले.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा व समाजभूषण कार्यकर्त्यांचा भव्य सत्कार

**अकोला :** ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशन, अकोला यांच्या वतीने संबोधी बुद्ध विहार, चैतन्य नगर, अकोला येथे दहावी व बारावी परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा 'गुणवंत विद्यार्थी गौरव सन्मानपत्र' देऊन भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. तसेच समाजामध्ये उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना 'समाजभूषण कार्यकर्ता प्रमाणपत्र' देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी एकूण २४ गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत उत्कृष्ट गुणवत्ता प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

## एसपी चांडक 'क्लीन', पण फिल्डवरचेच अधिकारी करताहेत 'क्रिएट सीन'

■ अवैध धंद्यांविरोधातील मोहिमेलाच घरातून सुरुंग
■ हेडक्वार्टरच्या भीतीपेक्षा 'हप्त्यांची ऊब' भारी?

■ ॲड. समीर ठाकूर ■



अकोला : जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी अकोल्याची सूत्रे हाती घेतल्यापासून पोलिस प्रशासनात शिस्त, पारदर्शकता आणि परिणामकारक कारवाईची नवी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद, सहज उपलब्धता, गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पोलिसिंग अधिक प्रभावी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची राज्यभर दखल घेतली जात आहे. मात्र दुसरीकडे जिल्ह्यातील वास्तव वेगळेच चित्र दाखवत असल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे.

वरिष्ठ पातळीवर अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेतली जात असताना जिल्ह्याच्या विविध भागांत मटका, वरली, जुगार अड्डे, एक्का-बादशाह, टेबल जुगार, अवैध दारू विक्री, अमली पदार्थांचा व्यापार आणि इंधनाचा काळाबाजार आजही सुरू असल्याचे आरोप होत आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक हे सर्व अवैध धंदे बंद करण्यासाठी प्रयत्नशील असताना त्यांच्या आदेशांची अंमलबजावणी करणारी यंत्रणाच नेमकी किती प्रामाणिकपणे काम करत आहे? हा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

पोलिस दलातील काही घटकांकडूनच वरिष्ठांच्या मोहिमेला छुपा विरोध होत असल्याची चर्चा आता पोलिस वर्तुळातही रंगू लागली आहे. अवैध धंद्यांबाबतची माहिती वरिष्ठांकडे पोहोचताच कारवाईचे आदेश दिले जातात; मात्र प्रत्यक्ष धाड टाकली जाते तेव्हा मुख्य सूत्रधार हाताबाहेर गेलेले असतात आणि जाळ्यात अडकतात ते केवळ किरकोळ काम करणारे मोहरे. त्यामुळे कारवाईचा गाजावाजा मोठा आणि परिणाम मात्र नगण्य, अशी परिस्थिती निर्माण झाल्याची टीका होत आहे.

जिल्ह्यातील अनेक भागांत अवैध धंदे इतक्या उघडपणे सुरू असल्याची चर्चा असताना संबंधित पोलिस यंत्रणेला त्याची माहिती नसणे अशक्य असल्याचे जाणकारांचे मत आहे. जर माहितीच नसेल तर ती कार्यक्षमतेची गंभीर उणीव मानावी लागेल आणि माहिती असूनही कारवाई होत नसेल तर तो अधिक चिंताजनक विषय ठरतो. यामुळेच पोलिस प्रशासनातील काही घटकांवर संशयाची सुई रोखली जात आहे.

अनेक नागरिकांचा सूर आता अधिक तीव्र होत आहे. गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी जिल्ह्याबाहेर मोहीमा राबविणारे अधिकारी त्यांच्या स्वतःच्या हद्दीत सुरू असलेले अवैध व्यवहार का थांबवू शकत नाहीत, असा सवाल उपस्थित केला जात आहे. काही ठिकाणी अवैध धंद्यांवर कारवाई करण्यापेक्षा त्यांच्यावर 'नियंत्रण' ठेवण्याची पद्धत विकसित झाल्याची चर्चा असून त्यामुळेच अनेक धंदे वर्षानुवर्षे टिकून असल्याचे बोलले जात आहे.

### आदेश आला की 'मित्रधाड'?

अवैध धंद्यांवरील कारवाईबाबत जिल्ह्यात एक नवीन शब्दप्रयोग चर्चेत आला आहे तो म्हणजे **'मित्रधाड'**. वरिष्ठांकडून कारवाईचे आदेश मिळताच संबंधित ठिकाणी धाड टाकली जाते; मात्र त्यात मुख्य सूत्रधारांऐवजी किरकोळ आरोपी दाखविले जातात, अत्यल्प मुद्देमाल जप्त केला जातो आणि धंद्याचा कणा अबाधित ठेवला जातो, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. यामुळे धाडही झाली, वरिष्ठांचे समाधानही झाले आणि धंदाही बंद पडला नाही, अशी परिस्थिती निर्माण होत असल्याची चर्चा आहे. **'सांप भी मरे और लाठी भी ना टूटे'** या म्हणीचा प्रत्यय काही कारवायांमध्ये येत असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

### 'झारीतील शुक्राचार्य' कोण?

अवैध धंदे चालविणारे जितके जबाबदार आहेत, त्याहून अधिक जबाबदार त्यांना संरक्षण देणारे घटक असल्याचे मत अनेकांकडून व्यक्त केले जात आहे. कारण कारवाईची भीती नसल्याशिवाय कोणताही अवैध व्यवसाय दीर्घकाळ टिकू शकत नाही.

म्हणूनच केवळ धंदेवाल्यांवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. त्यांना माहिती पुरविणारे, कारवायांची खबर देणारे किंवा अप्रत्यक्ष संरक्षण देणाऱ्या यंत्रणेतील 'झारीतील शुक्राचार्यां'चा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### डीबी पथके नेमके करतात तरी काय?

प्रत्येक पोलिस ठाण्यातील डीबी (गुन्हे शोध) पथकावर हद्दीतील गुन्हेगारी हालचालींवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असते. अवैध धंद्यांची माहिती गोळा करणे, गुन्हेगारांवर नजर ठेवणे आणि वेळोवेळी कारवाई करणे हे त्यांचे प्रमुख काम मानले जाते. मात्र अनेक ठिकाणी अवैध दारू, मटका, जुगार आणि अमली पदार्थांचे व्यवहार सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असताना संबंधित डीबी पथकांना त्याची माहिती नसणे अवघड असल्याचे मत जाणकार व्यक्त करीत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील डीबी पथकांच्या कामगिरीचे स्वतंत्र मूल्यमापन करून आवश्यक त्या ठिकाणी पुनर्गठन करण्याची मागणी आता पुढे येत आहे.

### एसपी साहेबांच्या प्रतिमेला धक्का बसू नये...

एसपी अर्चित चांडक यांनी जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचे सर्व स्तरांतून स्वागत झाले आहे. मात्र त्यांच्या प्रतिमेला सर्वात मोठा धोका बाहेरील गुन्हेगारांपेक्षा यंत्रणेतील निष्क्रियता किंवा कथित संगनमतामुळे निर्माण होत असल्याची चर्चा आहे. अवैध धंद्यांवर खऱ्या अर्थाने लगाम घालायचा असेल तर केवळ धाडी टाकून भागणार नाही. त्या धंद्यांना मिळणारे अंतर्गत संरक्षण, माहितीची गळती आणि कथित आर्थिक साखळी यावरही प्रहार करावा लागेल. अन्यथा जिल्हा पोलिस प्रमुखांचे **'क्लीन मिशन'** आणि फिल्डवरील काहींचे **'क्रिएट सीन'** असेच चित्र कायम राहील, अशी चर्चा अकोल्यात रंगू लागली आहे.

## मांगूळझनक येथे क्षयरोग व एड्स तपासणी शिबिर उत्साहात



■ प्रतिनिधी | रिसोड ■

प्राथमिक आरोग्य केंद्र मांगूळझनक येथे शुक्रवारी फिरते डिजिटल क्ष-किरण वाहनाच्या माध्यमातून क्षयरोग व एड्स तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात संशयित क्षयरुग्णांची एक्स-रे तपासणी, स्पुटम संकलन तसेच एचआयव्ही चाचण्या करण्यात आल्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बेले, वैद्यकीय अधिकारी डॉ. रूहाटीया मॅडम, डॉ. हरीश शिंदे व डॉ. पुरुषोत्तम मगर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर पार पडले.

क्ष-किरण तंत्रज्ञ अक्षय इंगळे यांनी ९० संशयितांची एक्स-रे तपासणी केली. यावेळी ६० संशयितांचे स्पुटम नमुने संकलित करण्यात आले. तसेच प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी गोपाल शिंदे यांनी ५७ व्यक्तींची एचआयव्ही तपासणी केली.

## वाशिम जिल्ह्यातील किनखेडा ते कारली रोड दुरुस्त करा अन्यथा आंदोलन -रघुनाथ खुपसे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील किनखेडा ते कारली रस्ता दुरुस्त करण्या बाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मा जिल्हा अध्यक्ष मनिष डांगे यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष रघुनाथ खुपसे यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन किनखेडा कारली रस्ता त्वरित दुरुस्त करण्यात बाबत निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे यावेळीमहाराष्ट्र नवनिर्माण सेनचे मा शहर अध्यक्ष गणेश इगोले मा शहर अध्यक्ष रवी वानखेडे महाराष्ट्र सैनिक फकीर कर्डीले, संदीप वानखेडे, शाहरुख मांजरे,जुम्मा बेनिवाले,अनिल भगत,मोहन भगत,विशवनाथ ईगोले,नितु खाबलकर,कैलास लाडकर, गजानन ईगोले,जिजिबा घुले, पना लाडकर,नागोजि सुरवै, दता बुदे,आदी उपस्थिती होते.

## पेट्रोल पंपावर बनावट नोटांचा खेळ फसला

✦ पेट्रोल पंपावर संशय आल्याने रॅकेटचा पर्दाफाश
✦ हैदराबादच्या सात आरोपींना अटक

## २३.५० लाखांच्या नकली नोटांसह सात जण जेरबंद

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

अमानी येथील पेट्रोल पंपावर बनावट नोटांचा वापर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीचा मालेगाव पोलिसांनी पर्दाफाश करत तब्बल २३ लाख ५० हजार रुपयांच्या नकली नोटा जप्त केल्या आहेत. या प्रकरणी हैदराबाद येथील सात जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २९ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या दरम्यान अमानी येथील विकास गवळी यांच्या पेट्रोल पंपावर एपी ०७ एसी ४५५४ क्रमांकाची इनोव्हा कार डिझेल भरण्यासाठी आली होती. वाहनातील व्यक्तींनी दोन हजार रुपयांचे डिझेल भरून घेतले. त्यानंतर त्यांनी पंप कर्मचाऱ्याला पैसे दिले असता, त्यामधील दोन ५०० रुपयांच्या नोटांवर 'भारतीय बच्चो का बँक – चिल्ड्रन बँक ऑफ इंडिया' असे लिहिलेले असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्या नोटा बनावट असल्याचा संशय कर्मचाऱ्याला आला. पंप कर्मचारी माधव केशव काटेकर यांनी तात्काळ वाहन थांबविण्यास सांगून पंप मालक विकास गवळी यांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलिसांना कळविण्यात आले.



घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता कारमध्ये ५०० रुपयांच्या एकूण ४,७०० बनावट नोटा आढळून आल्या. या नोटांची एकूण किंमत २३ लाख ५० हजार रुपये असल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर पोलिसांनी वाहनातील सर्व सात जणांना ताब्यात घेऊन वाहनासह मालेगाव पोलीस ठाण्यात आणले. पंप कर्मचारी माधव काटेकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी रमेश व्यंकटेश्वर पालापु, सय्यद खालीद सय्यद खाजा, विराबाबु व्यंकटेश्वर राव, सय्यद कदीर सय्यद खाजा, शेख अमीर खुसरो अफसर अली, शेख हमीद शेख हबीब आणि मो. मोसीन खान यांच्याविरुद्ध मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १७९ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ष्सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश यलगुलवार करीत असून सर्व सात आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, पोलीस निरीक्षक राजेश खेरडे, पोलीस उपनिरीक्षक राजेश यलगुलवार, पोलीस हवालदार मनीष राठोड, शिवाजी काळे, जयशंकर पाटील, तसेच नाईक पोलीस कॉन्स्टेबल विजेंद्र इंगोले, पोलीस कॉन्स्टेबल अमोल पवार, वैभव झरकर व गणेश मेटांगळे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८३ ■ रविवार, ३१ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# प्रदेशाध्यक्षांचा आदेश धुळीत; वर्धा काँग्रेसचा 'इंधन' मुद्द्यावरच पंचर

## मोदी सरकारविरोधातील आंदोलनाला ब्रेक; जिल्हाध्यक्षांचे मौन संशयाच्या भोवऱ्यात

### भाजपशी 'सॉफ्ट कॉर्नर' की संघटनात्मक बेशिस्तीचा कळस? कार्यकर्त्यांमध्ये संतापाचा स्फोट

**वर्धा रवींद्र लाखे :** राज्यभर पेट्रोल-डिझेल दरवाढ, इंधन टंचाई आणि सर्वसामान्यांच्या वाढत्या आर्थिक कोंडीविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जिल्हानिहाय आंदोलन छेडण्याचे स्पष्ट आदेश दिले. २९ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन केंद्र सरकारविरोधात जनआक्रोश व्यक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलनाचा ज्वालामुखी धगधगत असताना वर्धा जिल्हा काँग्रेसने मात्र या आदेशालाच अक्षरशः केराची टोपली दाखविल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

मोदी सरकारच्या धोरणांविरोधात सातत्याने आक्रमक भूमिका घेणाऱ्या काँग्रेसने इंधन प्रश्नावर मोठे जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार केला होता. ग्रामीण भागात डिझेलअभावी शेतीची कामे खोळंबत आहेत, वाहतूक क्षेत्र संकटात आहे आणि पेट्रोल-डिझेल दरवाढीने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. अशा वेळी काँग्रेसने सरकारला घेरण्याची सुवर्णसंधी असताना वर्ध्यात मात्र आंदोलनाचा मागमूसही दिसला नाही. विशेष म्हणजे नुकतेच जिल्हाध्यक्षपदाची धुरा सांभाळणारे सुनील कोल्हे यांच्या नेतृत्वाकडे कार्यकर्त्यांच्या मोठ्या अपेक्षा होत्या. नव्या नेतृत्वामुळे संघटनेत चैतन्य निर्माण होईल, अशी चर्चा होती. मात्र प्रदेशाध्यक्षांच्या स्पष्ट आदेशानंतरही आंदोलन न झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम, असंतोष आणि संतापाची लाट उसळली आहे.


महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

या संदर्भात संपर्क साधला असता जिल्हाध्यक्षांनी आंदोलन झाले नसल्याचे मान्य केले. मात्र आंदोलन का झाले नाही, आदेशाची अंमलबजावणी का झाली नाही, याबाबत कोणतीही समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात आले नाही. त्यामुळे संशयाचे ढग आणखी गडद झाले आहेत.

राजकीय वर्तुळात आता उघडपणे प्रश्न विचारले जात आहेत. प्रदेशाध्यक्षांचा आदेश डावलण्याचे धाडस कोणाच्या बळावर झाले, जिल्हा काँग्रेसवर कोणाचा दबाव होता, की मोदी सरकारविरोधातील संघर्षाची धारच बोथट झाली आहे, काही कार्यकर्ते तर थेट आरोप करत आहेत की, वर्धा काँग्रेसची भूमिका भाजपसाठी सोयीची ठरत आहे का, याचीही चौकशी झाली पाहिजे. काँग्रेस नेहमीच जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष करणारा पक्ष असल्याचा दावा करते. मात्र इंधन दरवाढीमुळे शेतकरी, व्यापारी, वाहनधारक आणि सामान्य कुटुंबे होरपळत असताना वर्धा काँग्रेसचे नेतृत्व मात्र शांत बसल्याचे चित्र दिसत आहे. राज्यभर निदर्शने, घोषणाबाजी आणि निवेदने सुरू असताना वर्ध्यातील ही संशयास्पद शांतता अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरत आहे.

दरम्यान, पक्षाच्या गोटात एक चर्चा जोर धरत आहे, मोदी सरकारविरोधात इंधन प्रश्नावर रणशिंग फुंकण्याची वेळ आली असताना वर्धा काँग्रेसनेच स्वतःच्या आंदोलनाचे इंधन संपविले. प्रदेशाध्यक्षांच्या आदेशाची झालेली ही उघड अवहेलना केवळ संघटनात्मक अपयश नसून पक्षातील अंतर्गत विस्कळीतपणाचे गंभीर लक्षण मानले जात आहे.

### शक्तीप्रदर्शन पुढे ढकलले; मग इंधन आंदोलनही गायब कसे

२५ मे रोजी प्रदेशाध्यक्षांचे इंधन टंचाई व दरवाढीविरोधातील आंदोलनाचे पत्र प्राप्त झाल्यानंतर युवक काँग्रेसचे प्रस्तावित शक्तीप्रदर्शन पुढे ढकलण्यात आले. कांबळे गटाने २९ मेचा कार्यक्रम रद्द करून तो २ जूनला घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे इंधन प्रश्नावर काँग्रेसची ताकद दाखविण्यासाठी रणनीती आखली जात असल्याची चर्चा होती. मात्र प्रत्यक्षात इंधन आंदोलनच झाले नाही आणि शक्तीप्रदर्शनही पुढे ढकलण्यात आले. त्यामुळे आदेश, संघटनात्मक हालचाली आणि अचानक आलेली शांतता यामागे नेमके कोणते राजकारण दडले आहे, याबाबत कार्यकर्त्यांतच कुजबुज सुरू झाली आहे. आदेश आला... आंदोलन गायब झाले... आणि नेतृत्व मौनात गेले,

# दहेगाव स्टेशन शिवारात अवैध इंधनसाठा जप्त; सावंगी पोलिसांची कारवाई



**वर्धा जनमाध्यम :** सावंगी (मेघे) पोलिसांनी दहेगाव स्टेशन शिवारात धाड टाकून अवैधरीत्या साठवून ठेवलेले तब्बल २ हजार ७३० लिटर डिझेल व पेट्रोल जप्त केले. या कारवाईत २ लाख ८५ हजार ७५९ रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना दहेगाव स्टेशन परिसरात काही व्यक्तींच्या संशयास्पद हालचालींबाबत गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार सावंगी पोलिसांचे पथक जिल्हा पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. तेथे तपासणी केली असता काळ्या व निळ्या रंगाच्या प्लास्टिक कॅनमध्ये मोठ्या प्रमाणात इंधन साठवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले.

कारवाईदरम्यान ५४ प्लास्टिक कॅनमध्ये सुमारे १ हजार ६२० लिटर डिझेल आणि ३७ प्लास्टिक कॅनमध्ये सुमारे १ हजार ११० लिटर पेट्रोल असा एकूण २ हजार ७३० लिटर इंधनसाठा जप्त करण्यात आला. पोलिसांनी पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल ताब्यात घेतला.

या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध सावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून इंधनसाठ्याचा स्रोत व त्यामागील रॅकेटचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे व त्यांच्या पथकाने केली. या धडक कारवाईमुळे अवैध इंधन व्यापार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# कारंजा तालुक्यातील गारपिट येथे जिल्हाधिकाऱ्यांचा रात्रीचा मुक्काम

-ग्रामस्थांशी साधला थेट संवाद | -वीज आणि पाण्याचा प्रश्न निकाली काढण्याच्या सूचना



**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातील समस्या जाणून घेण्यासाठी आणि प्रशासकीय कामांना गती देण्यासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी कारंजा (घा.) तालुक्यातील गारपीट गावाला भेट देऊन रात्रीचा मुक्काम केला. यावेळी त्यांनी आयोजित ग्रामसंवाद कार्यक्रमात ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

यावेळी जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वैशाली रसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. तहसीलदार अनिल निनावे, अप्पर तहसीलदार नेहा मावस्कर, गट विकास अधिकारी अरुण इंगळे, विस्तार अधिकारी वानखेडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि गारपीट गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


संध्याकाळी ७:३० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या ग्रामसंवाद कार्यक्रमात गारपीट गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. ग्रामस्थांनी पिण्याचे पाणी, रस्ते, वीजपुरवठा, स्वच्छता यांसह विविध मूलभूत सुविधांविषयीच्या मागण्या व समस्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. पाण्याचा प्रश्नः गावात सद्यस्थितीत गढूळ पाणीपुरवठा होत असून, कायमस्वरूपी शुद्ध पाण्याची सोय करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांना या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. गावातील रस्त्यांवरील पथदिवे बंद असल्याबाबत आणि तेंदूपत्ता बोनस अद्याप मिळाला नसल्याची तक्रार गावकऱ्यांनी केली. यावर तात्काळ दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी विद्युत विभागाला बंद असलेले पथदिवे त्वरित सुरू करण्याचे आदेश दिले. यावेळी ?जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या हस्ते गावातील घरकुल योजनेचे लाभार्थी श्री. राठोड यांना त्यांच्या नवीन घराची चावी सुपूर्द करून गृहप्रवेश घडवून आणण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी गावातील तरुण पिढीच्या बेरोजगारीचा प्रश्न आणि आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. गावातील बेरोजगार तरुणांना त्यांच्या कौशल्यानुसार आवश्यक ते प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाला दिले. तसेच, शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, रोजगार निर्मिती, स्वच्छता आणि ग्रामविकासाच्या उपक्रमांमध्ये गावकऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# शेतमजुरांनी भरलेली टाटा एस पलटी; आठ महिला जखमी

**समुद्रपूर जनमाध्यम :** धुमनखेडा येथील शेतातून काम आटोपून परतणाऱ्या शेतमजुरांना घेऊन जाणाऱ्या टाटा एस वाहनाचा अपघात होऊन आठ महिला मजूर जखमी झाल्या. समुद्रपूर शहराजवळील स्मशानभूमी परिसरात चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन पलटी झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, समुद्रपूर येथील महिला मजूर धुमनखेडा येथील शेतात फणे गोळा करण्यासाठी गेल्या होत्या. काम आटोपल्यानंतर त्या एमएच-३२ यू-०५९५ क्रमांकाच्या टाटा एस वाहनातून परतत असताना स्मशानभूमीजवळ वाहन अनियंत्रित झाले. वाहनाने दोन पलट्या घेतल्याने त्यातील महिला मजूर जखमी झाल्या. या अपघातात विमल पुंडलिक गिरोले, आम्रपाली दिलीप बडवाई, अपर्णा रविंद्र उनपाने, प्रीती विलास मेश्राम, सोनाबाई किशोर गजभिये, कल्पना सुभाष मेश्राम, मिना गजू टेंभरे यांच्यासह अन्य एक महिला जखमी झाली. जखमींना तातडीने समुद्रपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रीती मेश्राम यांना गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

रविवार ३१ मे २०२६







## नागपुरात २४ तासात
# तिघांचा उष्माघाताने मृत्यू?



**नागपूर/प्रतिनिधी :** एकीकडे ढगाळ वातावरण, अधूनमधून पावसाच्या सरींनी उकाडा वाढविला असताना नागपूर,वर्धा येथे उन्हाचा चांगलाच कहर अनुभवास येत आहे. गेल्या २४ तासांत तीन अज्ञात इसम बेशुद्धावस्थेत आढळले. उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने उष्माघाताने ते दगावल्याची शक्यता आहे.

विदर्भात तापमान ४३ ते ४६ अंशांवर आहे. मुस्लिम कब्रस्तानाजवळ सायंकाळी ४५ ते ५० वर्षाचा इसम बेशुद्ध आढळला.याशिवाय धंतोली हद्दीत जनता चौक ते पंचशील चौकदरम्यान शहीद गोवारी उड्डाणपुलाखाली सायंकाळी सातच्या सुमारास वाजता ३५ ते ४० वर्षीय पुरुष आढळला. तसेच सक्करदरा परिसरातील हॅप्पीनेस फॉर्नर हॉटेलसमोर सायंकाळी ६.१० वाजता ६५ ते ७० वर्षीय वृद्ध बेशुद्धावस्थेत मिळून आला. तिघांनाही उपचारासाठी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.मृतांची ओळख अद्याप पटलेली नसून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या मृत्यूंचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. हवामान विभागाने आज, शनिवारपासून नागपूरसह विदर्भातील काही भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे कमाल तापमानात आणखी घट होण्याचा अंदाज आहे.

# ममता बॅनर्जी यांचे पुतणे, खासदार अभिषेक बॅनर्जींच्या ताफ्यावर हल्ला

## जमावाने दगडफेक, मारहाण केल्याचा आरोप

**कोलकाता: /वृत्तसंस्था-** पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे पुतणे आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांना आज ( दि ३०) पश्चिम बंगालमधील सोनारपूर दक्षिण येथे मारहाण करण्यात आली. तसेच अंडी व दगडफेक करण्यात आली. ते निवडणूक निकालानंतर झालेल्या हिंसेतील पीडित कुटुंबांची भेट घेण्यासाठी गेले होते, तेव्हा हा धक्कादायक प्रकार घडला.

### सारे काही भाजप पुरस्कृत : अभिषेक बॅनर्जी यांचा आरोप

व्हिडिओमध्ये राज्यात निवडणूक निकालानंतर झालेल्या हिंसाचाराचा फटका बसलेल्या पीडित कुटुंबांना भेटण्यासाठी गेलेल्या ममता बॅनर्जींचे पुतणे अभिषेक बॅनर्जी (ज्यांनी क्रिकेट हेल्मेट घातले होते) यांना अनेक स्थानिक लोक अडवून मारहाण करताना दिसत आहेत.

स्थानिकांच्या या तीव्र रोषाला सामोरे गेल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना अभिषेक बॅनर्जी यांनी आरोप केला की, 'हे सर्व भाजप पुरस्कृत आहे. त्यांनी काय केले आहे ते पहा. त्यांच्या लोकशाहीचे हे उदाहरण आहे.

अजून एक महिनाही झाला नाही, आणि पोलीस कुठेच दिसत नाहीयेत.'




### 'त्यांना मला जीवे मारायचे होते'

अचानक घडलेल्या घटनेनंवर प्रतिक्रिया देताना अभिषेक बॅनर्जी अत्यंत घाबरलेले दिसत होते. त्यांचा शर्टही फाटलेला होता. या हल्ल्यामागे भाजपचा हात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, 'हा सगळा भाजप पुरस्कृत हल्ला आहे. त्यांनी काय केले आहे ते पहा. हेच त्यांचे लोकशाहीचे उदाहरण आहे का निवडणूक होऊन महिनाही झाला नाही, आणि पोलीस कुठेच दिसत नाहीत. त्यांना मला जीवे मारायचे होते... ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. आम्ही याबद्दल उच्च न्यायालयाला नक्कीच माहिती देऊ. तसेच राज्यपालांनाही या घटनेची कल्पना दिली जाईल... मी याविरोधात नक्कीच न्यायालयात जाईन.'

### 'चोर' घोषणा देत अंडीही फेकली

- या हाय-व्होल्टेज ड्राम्या दरम्यान अभिषेक बॅनर्जी यांच्याविरोधात 'चोर' अशा घोषणा देण्यात आल्या, तसेच त्यांच्यावर अंडीही फेकण्यात आली.'पीटीआय' ने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म "" वर (पूर्वीचे ट्विटर) पोस्ट केलेला आणखी एक व्हिडिओ समोर आला आहे. यामध्ये, निवडणूक निकालानंतरच्या हिंसाचारात ठार झालेल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबाला भेटायला गेलेल्या अभिषेक बॅनर्जी यांच्यावर महिला अंडी फेकत असल्याचे आणि त्यांना 'चोर' म्हणत असल्याचे दिसत आहे.

# 'चिल्ड्रन्स बँक ऑफ इंडिया'च्या बनावट नोटा खपवण्याचा प्रयत्न : पोलिसांनी आवळल्या मुसक्या!

## २३.५० लाखांच्या बनावट नोटा जप्त : ७ जणांना केली अटक, मालेगाव पोलिसांची कामगिरी

**वाशीम /प्रतिनिधी :** पेट्रोल पंपावर डिझेल भरून 'चिल्ड्रन्स बँक ऑफ इंडिया'च्या नकली नोटा खपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका आंतरराज्यीय टोळीचा मालेगाव पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल २३ लाख ५० हजार रुपयांच्या नकली नोटांसह एका इनोव्हा कार आणि ७ आरोपींना ताब्यात घेतले आहे. ही धडक कारवाई ता २९ मे रोजी सायंकाळच्या सुमारास अमानी येथील विकास गवळी यांच्या पेट्रोल पंपावर करण्यात आली. ता २९ मे रोजी सायंकाळी ७.०० वाजेच्या सुमारास अमानी येथील विकास गवळी यांच्या पेट्रोल पंपावर एक 'इनोव्हा कार' क्रमांक ऐ पी ०७ ऐ सी ४५५४ डिझेल भरण्यासाठी आली. कारमधील चालकाने पंपावरील कर्मचाऱ्याला २,००० रुपयांचे डिझेल भरण्यास सांगितले. डिझेल भरल्यानंतर जेव्हा कर्मचाऱ्याने पैशांची मागणी केली, तेव्हा कारमधील एका इसमाने त्याला २ हजार रुपये दिले. या पैशांपैकी १,००० रुपयांची नोटबंदी मधील खरी नोट होती. , मात्र ५०० रुपयांच्या इतर दोन नोटांवर 'भारतीय बच्चो का बँक - चिल्ड्रन बँक ऑफ इंडिया' असे लिहिलेले होते. हा प्रकार पंपावरील सतर्क कर्मचाऱ्याच्या तात्काळ लक्षात आला नोटा नकली असल्याचे समजताच कर्मचाऱ्याने चालकाला गाडी थांबवण्यास सांगितले आणि तात्काळ पंप मालक विकास गवळी यांना घटनेची कल्पना दिली. गवळी यांनी प्रसंगावधान राखत गाडी तिथेच रोखून धरली आणि मालेगाव पोलिसांशी संपर्क साधला. माहिती मिळताच मालेगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले. पंप मालक व कर्मचाऱ्यांच्या समक्ष संशयित इनोव्हा कारची झडती घेण्यात आली. या झडतीदरम्यान कारमध्ये पोलिसांना धक्कादायक घबाड सापडले. कारमध्ये 'चिल्ड्रन्स बँक ऑफ इंडिया' लिहिलेल्या ५०० रुपयांच्या तब्बल ४,७०० नकली नोटा आढळून आल्या, ज्यांची एकूण किंमत २३,५०,०००/- रुपये (२३ लाख ५० हजार) आहे. या कारवाईत २३.५० लाख रुपयांच्या नकली नोटा आणि इनोव्हा कार ४५५४)जप्त करण्यात आले.



कारमधील सर्व ७ जणांवर अप क्र. ३७५/२०२६, कलम १७९, ३(५) भान्यासं (भारतीय न्याय संहिता) मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पेट्रोल पंपावरील कर्मचारी माधव केशव काटेकर (वय ६१ वर्ष, रा. मालेगांव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मालेगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासाची चक्रे फिरवत पोलिसांनी ७ ही आरोपींना अटक केली असून, या रॅकेटचे धागेदोरे कुठे पसरले आहेत याचा तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश यलगुलवार करत आहेत.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटप बंधनकारक

## निकृष्ट कापड आढळल्यास कारवाई, शिलाईचे काम महिला बचत गटांकडून

**मुंबई/प्रतिनिधी :** वर्षापासून १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश वाटप करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच, गणवेशाचे कापड निकृष्ट दर्जाचे आढळल्यास पुरवठादार, संबंधित शाळा व्यवस्थापन समितीवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा शालेय शिक्षण विभागाने दिला आहे. गणवेशाचे दर्जेदार कापड, शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी वाटप, स्थानिक महिला बचत गटांकडून शिलाई तसेच गुणवत्तेची कठोर तपासणी, याबाबी अनिवार्य करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश मिळावा, यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. गणवेशावर समग्र शिक्षा अभियानाचा लोगो लावणेही बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या दोन गणवेशांपैकी एक गणवेश स्काऊट-गाईड उपक्रमाला अनुरूप असावा, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाची हाफ पँट आणि मुलींसाठी आकाशी



रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट असलेला पिनो फ्रॉक. तसेच, ज्या शाळांमध्ये सलवार कमीज असेल तर सलवार गडद निळ्या रंगाचा व कमीज आकाशी रंगाची अशी रचना असणार आहे.

गणवेशाची गुणवत्ता तपासणार

गणवेशाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्यासाठी केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडून नियमित तपासणी बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच, प्रयोगशाळेत नमुने तपासण्याची व्यवस्था करण्यात आली.

गणवेशाची गुणवत्ता चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच पुरवठादाराला रक्कम दिली जाणार आहे. शासनाच्या अनुदानासोबतच अधिक दर्जेदार गणवेशासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांनी सीएसआर निधी व लोकसहभागातून अतिरिक्त निधी उभारण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# डी. के. शिवकुमार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड

## ३ जून रोजी घेणार मुख्यमंत्री पदाची शपथ

**बंगळूरु/वृत्तसंस्था-** कर्नाटकच्या राजकारणातील मोठ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर डी.के. शिवकुमार मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आज बंगळूरु विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक झाली. यावेळी डी. के. शिवकुमार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. दरम्यान, कर्नाटकात नवीन सरकार स्थापनेची प्रक्रिया सुरू असताना, काँग्रेस नेते डी.के. शिवकुमार यांचे ज्योतिषी 'आराध्य' यांनी असा दावा केला आहे की, त्यांनी शिवकुमार यांना ३ जून रोजी सायंकाळी ५:१५ वाजता मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा सल्ला दिला आहे.



बैठकीत मुख्यमंत्री सिद्धरामैया यांनी पहिला प्रस्ताव मांडला, ज्यामध्ये नवीन विधिमंडळ पक्षनेत्याचा निर्णय काँग्रेस हायकामांड करेल असे सांगण्यात आले होते. या प्रस्तावाला डॉ. जी. परमेश्वर यांनी अनुमोदन दिले. बैठकीत हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. बैठकीदरम्यान काँग्रेस विधिमंडळ पक्षाने सिद्धरामैया यांच्या सेवांचे कौतुक केले. पक्ष आणि कर्नाटकच्या जनतेसाठी त्यांनी दिलेल्या वशिष योगदानाचा गौरव करत त्यांचे आभार मानण्यात आले.

काँग्रेस नेते सतीश जारकीहोळी यांनी स्पष्ट केले की, डी. के. शिवकुमार हेच राज्याचे पुढील मुख्यमंत्री असतील. माजी मुख्यमंत्री सिद्धरामैया यांच्या राजीनाम्यानंतर आता याबाबीत कोणतीही शंका उरलेली नाही. हायकमांडने निर्णय घेतला आहे की डी. के. शिवकुमार हेच आमचे पुढील मुख्यमंत्री असतील. याची घोषणा आधीच झाली आहे आणि सिद्धरामैया यांनीही तसे जाहीर केले आहे. सिद्धरामैया सरकारच्या काळातील चांगली कामे पुढेही सुरू राहतील, अशी आम्हाला आशा आहे. ही एक मोठी जबाबदारी असून आमचे नवीन मुख्यमंत्री ती यशस्वीपणे पार पाडतील,' असे जारकीहोळी म्हणाले.

# सिंधू पाणीवाटप करार स्थगितीमुळे पाकिस्तानात जलसंकट?

## कराचीचा ७०% भाग तहानेने व्याकुळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सिंधू पाणीवाटप करार स्थगित अवस्थेत असताना पाकिस्तानची आर्थिक राजधानी कराची भीषण पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करत आहे. उन्हाळ्याच्या कडाक्यात शहरातील सुमारे ७० टक्के भागात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.या पार्श्वभूमीवर जमात-ए-इस्लामीचे प्रमुख हाफिज नईम-उर-रहमान यांनी यांनी पाकिस्तान पीपल्स पार्टीच्या नेतृत्वाखालील सिंध सरकारवर जवळपास दोन दशकांपासून प्रांतात सत्तेत असूनही कराचीच्या दीर्घकालीन पाणी समस्या सोडवण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे.एआरवायच्या अहवालानुसार, गेल्या काही आठवड्यांत कराचीच्या जवळपास ७० टक्के लोकसंख्या ताहनेने व्याकुळ झाली आहे. गुलिस्तान-ए-जौहर, गुलशन-ए-इकबाल, अझीझाबाद, लियाकतबाद, उत्तर नाझिमाबाद आणि उत्तर कराची या भागांमध्ये दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळापासून तीव्र टंचाई जाणवत आहे.

ईदच्या दिवशी हाफिज नईम-उर-रहमान यांनी कराचीतील वाढत्या पाणीटंचाईबाबत चिंता व्यक्त करताना सांगितले की, ईदच्या सुट्ट्यांदरम्यान हजारो नागरिकांना पिण्याचे पाणी आणि इतर मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागत आहे.






# माजलगावात २०० हून अधिक गोवंशांची कत्तल झाल्याचा आरोप

## सखोल चौकशीची मागणी, पोलीस प्रशासनाच्या निष्क्रियतेवर सामाजिक कार्यकर्त्यांचा संताप

**माजलगाव /वृत्तसंस्था-:** बकरी ईदच्या दिवशी माजलगाव शहरात २०० हून अधिक गोवंशांची बेकायदेशीर कत्तल करण्यात आल्याचा गंभीर आरोप विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी एका निवेदनाद्वारे प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या घटनेमुळे शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, शहरात मोठ्या प्रमाणावर गोवंश कत्तल होणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्यांनी गेल्या आठ दिवसांपासून पोलीस प्रशासनाला दिली होती. अगदी बकरी ईदच्या पहिल्या दिवशीही शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना संशयित ठिकाणांचे 'लाइव्ह लोकेशन' पाठवण्यात आले होते. तसेच शहरातील विविध भागांतील सीसीटीव्ही



कॅमेऱ्यांचे फुटेज आणि इतर पुरावेही पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी यावर कोणतीही ठोस कारवाई केली नाही, असा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे.

शनिवारी शहरात काही ठिकाणी गोवंशाचे कातडे आणि इतर अवशेष आढळून आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. हे अवशेष शासनाने मंजूर केलेल्या अधिकृत रेंडरिंग प्रकल्पाच्या जागेव्यतिरिक्त इतरत्र उघड्यावर आढळल्याने कत्तल झाल्याचा संशय अधिक बळावला आहे.

सध्या सोशल मीडियावर शहराबाहेरील रोडवरील एका चौकाच्या आजूबाजूला जनावरांच्या कत्तलीचे अवशेष पडल्याचे व्हिडिओ आणि फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर हा प्रकार घडला असतानाही स्थानिक पोलिसांनी साधी दखलही घेतली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. उलट, याबाबी पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांनी दखल घेण्याऐवजी माहिती देणाऱ्यांवरच आरोप केल्याचा दावाही काही कार्यकर्त्यांनी केला आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## कर्नाटकातील नवा अध्याय

**आजवरची परंपरा पाहता काँग्रेसचा कर्नाटकातील मुख्यमंत्री बदलाचा घोळ आणखी काही दिवस चालेल, असे सगळ्यांनाच वाटत होते. पण, केरळातील विजयाने काँग्रेस श्रेष्ठींना बराच आत्मविश्वास दिलेला दिसतो. त्या आत्मविश्वासाच्या बळावर श्रेष्ठी निश्चित निर्णयाच्या दिशेने पाऊल टाकतात आणि आपले अंतिम ठिकाण गाठतात, असे दिसू लागले आहे. केरळ आणि त्यापाठोपाठ कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांबाबत त्यांनी घेतलेले निर्णय त्यातला नेमका ठामपणा आणि यशस्वी अंमलबजावणी यामुळे काहींना एकदम काँग्रेसच्या जुन्या दिवसांची आठवण येऊ लागली आहे. इंदिरा आणि राजीव गांधींच्या काळात नेतृत्वाची पक्षसंघटनेवर जशी पकड होती, तशी पकड पुन्हा दिसू लागली असल्याचे अनेकजण म्हणू लागले आहेत. आम्हाला काही ते तेवढे खरे वाटत नाही. इतक्या घाईघाईने एवढ्या मोठ्या निष्कर्षापर्यंत येण्याची काही गरज नाही. दोन निर्णय नीट घेता आले, म्हणून जनता आता राहुल गांधी यांना पंतप्रधान पदासाठी निवडून देईल, असा निष्कर्ष काढणे जेवढे हास्यास्पद ठरेल, तेवढाच वरचा निष्कर्षही विवेकशून्य आहे, असे म्हणावे लागेल. ज्यांना काँग्रेस आणि गांधी परिवाराला प्रशस्तीसपत्र देण्यासाठी निमित्त हवे आहे, त्यांची गोष्ट वेगळी. अन्यथा, यावरून थेट इंदिरा आणि राजीव गांधी यांच्या काळातील काँग्रेसपर्यंत जाण्याचे काही कारण नाही. केरळमध्ये मुख्यमंत्री पदाचा निर्णय घेताना पक्षश्रेष्ठींनी के. सी. वेणुगोपाल किंवा रमेश चेन्नीथला यांच्यापेक्षा व्ही. डी. सतीशन यांची केलेली निवड उजवी आहे, यात वाद नाही. आपल्या भोवतीच्या कोंडाळ्यापलीकडे श्रेष्ठींची नजर गेली, हे विशेष; शिवाय निवड करताना दरबारी चाणक्क्यांपेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर काम करणाऱ्या नेत्याला न्याय देण्याची बुद्धी त्यांना झाली, शिवाय निवड करताना दरबारी चाणक्क्यांपेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर काम करणाऱ्या नेत्याला न्याय देण्याची बुद्धी त्यांना झाली, हे आणखी विशेष.हे आणखी विशेष. अगदी त्याच चालीवर सिद्धरामय्यांना योग्य वेळी बाजूला करून डी. के. शिवकुमार यांच्या हाती राज्याची सूत्रे देण्याची गरज त्यांच्या लक्षात आली, हेही विशेष. आणखी दोन वर्षांनी कर्नाटकात विधानसभेच्या निवडणुका आहेत. भारतीय जनता पक्ष आणि एच. डी. देवगौडा यांच्या जनता दलाला (धर्मनिरपेक्ष) एकाचवेळी तोंड द्यायचे,तर काँग्रेसला शिवकुमार यांच्यासारख्या सर्वसंपन्न,आक्रमक लोकसंख्येत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या वोक्कलीग जातीतल्या नेत्याची गरज होतीच. सिद्धरामय्या यांची समजूत काढून शिवकुमार यांच्या हाती राज्याची सूत्रे देऊन काँग्रेसने हेच विचारपूर्वक साधले आहे.यात अर्थातच काही धोके आहेत. येती निवडणूक लढवण्यासाठी पक्षाला जी साधनसामग्री गोळा करावी लागणार आहे, ती राज्यातूनच गोळा करण्याची जवाबदारी शिवकुमार यांच्यावर येणार आहे. सिद्धरामय्या सुरुवातीची साधारण तीन वर्ष राज्य करून गेले. आता पुन्हा राज्य आणण्याची जबाबदारी शिवकुमार यांच्यावर आहे. शिवकुमार स्वतः देशातल्या आघाडीच्या सर्वात श्रीमंत राजकारण्यांच्या पंक्तीतले आहेत. त्यांची एकूण संपत्ती १ हजार ४१३ कोटी रुपये आहे. पण, २०१७मध्ये आयकर विभागाने त्यांच्यावर धाड टाकली होती. बेकायदेशीर पैसे कायदेशीर करण्याच्या प्रक्रियेत त्यांच्यावर ईडीचे दोन खटलेही सुरू आहेत ! २०२३मध्ये कर्नाटकात काँग्रेसला बहुमत मिळाले, तेव्हांच 'मुख्यमंत्री कोण?' असा प्रश्न केवळ उपस्थित झाला नव्हता, तर कठीण झाला होता. सिद्धरामय्या आणि शिवकुमार हे दोन स्वतंत्र गट तेव्हांपासूनच प्रदेश काँग्रेसमधे उघडपणे काम करत आहेत. काल सिद्धरामय्या यांनी मनाच्या मोठेपणाचा देखावा करून राजीनामा दिला असला आणि शिवकुमार यांनी साष्टांग दंडवत घालून सिद्धरामय्या यांचा आशीर्वाद घेतला असला, तरी हे खरे चित्र नाही, याची माहिती पूर्ण कर्नाटकाला आहे. 'पक्षश्रेष्ठी (म्हणजे राहुल गांधी) सांगतील तेव्हा राजीनामा देईन, असे मी आधीच सांगितले होते. त्यानुसार राजीनामा दिला', असे निष्ठावंत कार्यकर्त्यासारखे बोलणाऱ्या सिद्धरामय्या यांनी पक्षश्रेष्ठींनी सांगूनही राज्यसभेवर जायला ठाम नकार दिला आहे हे यासंदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. 'मला दिल्लीत काही रस नाही. मी राज्याच्या राजकारणातच थांबणार' हे त्यांचे पालुपद आगामी धोक्याची घंटाच आहे. शिवकुमार यांना हे सांभाळावे लागणार आहे. अन्यथा, आणखी दोन वर्षांनी कर्नाटकातूनही काँग्रेस हद्दपार झालीच, असे समजा ! सिद्धरामय्या ज्या अन्य मागास कुरुवा जातीतून येतात, त्या जातीभोवती त्यांनी अन्य मागास जातीतील आणखी बऱ्याच जाती, दलित आणि मुस्लीम जनसमुदायाची मोठी फळी उभी केली आहे. शिवकुमार यांची वोक्कलिग जात कर्नाटकात प्रभावी आहे. या दोन नेत्यांच्या एकत्र असण्यात जे सामाजिक समीकरण जुळते, त्याआधारेच कर्नाटकात काँग्रेसचे बस्तान आहे. मल्लिकार्जुन खरगे आणि अन्य नेत्यांची या समीकरणाला केवळ जोड आहे. सिद्धरामय्यांना कर्नाटकात मुख्यमंत्रीपदाची संधी दोनदा मिळाली. २०१३ आणि त्यानंतर २०२३. या दोन्ही वेळी मिळून एकूण २ हजार ७९२ दिवस ते मुख्यमंत्रीपदी होते. कर्नाटकात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहण्याचा देवराज अर्स यांचा विक्रम त्यांनी यावेळी मोडला. डॉ. राममनोहर लोहिया यांच्या प्रभावाखालील सिद्धरामय्या यांचे मूळ 'जनता परिवारात'ले आहे. २०२५ मध्ये जनता दलातून (धर्मनिरपेक्ष) बाहेर काढल्यानंतर त्यांनी काँग्रेसचा रस्ता धरला. त्यामुळे, त्यांच्या राजकारणाचा अजेंडा नेहमीच सामाजिक राहिला. राज्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षणाचा अहवाल स्वीकारून त्यांनी जणू आपल्या पुढच्या कार्यक्रमाचं बीज पेरून ठेवले आहे. शिवकुमार यांचा शपथविधी उद्यापर्यंत होण्याची शक्यता आहे. खरगेपुत्र प्रियांक खरगे त्यात उपमुख्यमंत्री असतील, असाही अंदाज आहे. सिद्धरामय्या प्रियांका यांना स्वीकारतात, की आपल्या मर्जीतल्या नांवाचा आग्रह धरतात, ते आज कळेल. कर्नाटकातल्या राजकारणाच्या नव्या अध्यायाची तीच सुरुवात असेल.**

## जिंदादील कवी

कवी नव्वदीच्या घरात आहे. घरात बसला आहे. शेजारी त्याची साथीदार बसली आहे. ती त्याला त्याच्याच ओळी ऐकवते आहे. कवीला अंधुकसे स्मरते आहे आणि काहीसे विसरतेही आहे. स्मृतीभ्रंशाने ग्रासलेला कवी दोन शब्द बोलतो आणि मनमोकळे हसतो. मन हेलावून जाते.

सुरेश भटांची आठवण येते..

**'स्मरल्या मला न तेव्हा माझ्याच गीत पंक्ती**

मग ओळ शेवटाची सुचवून रात्र गेली !'

स्वतःचीच कविता आठवू नये,हाच खरे तर मरणाचा क्षण.पुढे जिवंत असते ते शरीर. बशीर बद्र यांच्या काटेरी आयुष्यातला अखेरचा टप्पा. ते सोसूनच तर ते म्हणाले,

**'ये फूल मुझे कोई विरासत में मिले है तुमने मिरा काँटों भरा बिस्तर नहीं देखा'**

आयुष्यभर अशा दुःखाचा सामना करताना बशीर यांची कविता उमलते. कवितेच्या एकेक ओळीसाठी वेदनेचा असा भयंकर प्याला रिचवावा लागतो.मेरठच्या १९८७ च्या दंग्यांमध्ये कवीचे घर जाळले जाते तेव्हा हरगोपाल सिंह आणि धर्मपाल सिंह हे त्याचे हिंदू शेजारी त्याच्या कुटुंबियांना, घराला वाचवण्याचा प्रयत्न करतात. कवी म्हणतो,

**'अगर मेरे पास दमकल होती तो आग को भड़कने का मौका ही नहीं देता.'**

पण घर गमावतोच कवी, तेव्हा कुठे त्याला ओळी स्फुरतात,

**'लोग टूट जाते हैं एक घर बनाने में तुम तरस नहीं खाते बस्तियाँ जलाने में'**

नुसते घर जळून खाक होत नाही तर त्यासोबत जळतात जपून ठेवलेल्या कवितेच्या वह्या, डायरीज, पुस्तके, पत्रे अक्षरे विरघळून नाहीत जात, जळून जातात. अशा वेळी किती भयंकर यातना झाल्या असतील; पण कवी म्हणतो

**'ये दर्द कितने अजीब है सभी मौसमों मे हरे रहते है !'**

या ओल्या हिरव्याकंच वेदना उराशी घेऊन कवी धावतो उरल्यासुरल्या शब्दांनिशी. त्याला माहिती असते भौतिक गोष्टी जाळल्या तरी आपल्या नेणिवेतून पाझरणारा झरा अडवू शकत नाही कोणतीही मदांध शक्ती. म्हणून तर दंगे झाल्यावर एका मासिकात कवीचा फोटो छापून येतो. एका हातात सूटकेस, दुस-या हातात पिशवी आणि त्याखाली कवीचे शब्द आहेतः

**'आप घर तोड सकते है, हौसला नहीं !'**

आणि आश्चर्य म्हणजे दंगे करणा–



त्याच्या मनात द्वेष नसतो. तो त्यांनाही मोहोब्बत शिकवू पाहतो. भारत पाक संबंधांमध्ये ताण दूर व्हावा म्हणून दुश्मनी दूर करणारे शब्द तो सांगत राहतो. सीमा ओलांडून त्याची कविता हस्तांदोलन करते. दुर्दैवी हादसे घडत राहतात; पण या हादश्यांनीच मला 'हसीन' बनवले आहे, असे तो म्हणतो तेव्हा हा कवी कोणत्या मातीचा बनला आहे, असा प्रश्न पडतो.

कवीला पुरस्कार मिळतात. मान सन्मान मिळतात; पण हे सारे किती फोल आहे, याची त्याच्या मनाच्या तळाशी जाणीव असते म्हणून तर तो म्हणतोः

**'शोहरत की बुलंदी भी एक पल का तमाशा है**
**जिस डाल पर बैठे हो, वो टूट भी सकती है !'**

हे सारे लौकिक किती कवडीमोल आहे, हे कवीला माहिती असते म्हणून तर १९७३ ला मिळालेल्या पीएचडीचे प्रमाणपत्र घ्यायला तब्बल ४८ वर्षे उशीर करतो !

डॉ. बशीरसाब,फक्त कवितेच्या ओळीतूनच भेटलात. त्या ओळी अशाच सोबत राहतील; पण तुम्ही कधीच प्रत्यक्ष भेटणार नाही. तुमच्याच ओळी उधार घेऊन बोलायचे तर

**'ये मौसम फरिश्तो जैसा है**
**तुम्हारे बाद ये मौसम बडा सताएगा !'**

डॉक्टरसाब, तुमच्या नावाचा अर्थच आहे शुभवार्ता घेऊन येणारा; पण तुम्ही बुरी खबर देऊन निघून गेलात.

काय बोलू !

आदाब !

**श्रीरंजन आवटे**

## अलविदा बशीर साहब...

बशीर बद्र गेले. विख्यात शायर, कवी बशीर बद्र आजारी असल्याचे ऐकून वाचून होतो. मध्यंतरी काही महिन्यांपूर्वीच काही नतद्रष्ट लोकांनी त्यांच्या निधनाची खोटी बातमी व्हायरल केली होती,वास्तवात मागील काही वर्षे ते गंभीर आजारी होते. काही दिवसापूर्वी त्यांचा एक व्हिडिओ पाहण्यात आला होता, ज्यात बद्र सरांच्या पत्नी राहत बद्र, त्यांची शुश्रूषा करताना दिसतात, बशीर सरांची याददाश्त चांगली राहावी म्हणून त्यांच्या शेरो शायरीबद्दल बोलताना दिसतात, बद्र सरांना डिमेन्शिया आणि अल्झायमरने ग्रासले होते. त्यांचा भूतकाळ ते हळूहळू विसरत गेले,त्यांच्या माणसांची त्यांना ओळख लागेनाशी झाली होती. त्यांचे स्वतःचं अस्तित्वही ते काही काळ विसरत चालले होते. त्यांचा जीव की प्राण असणारी शायरीदेखील त्यांच्या स्मरणनोंदीतून लुप्त होईल की काय असे वाटत होते. ते ब्लँक झाले होते. उरली होती केवळ, त्यांची मंद गतीतली धडधडती नब्ज!बशीर बद्र सरांच्या प्रकृतीच्या घसरणीचा वेग केवळ त्यांच्या शायरीमुळेच कमी होता, कारण त्यांच्या पत्नी राहतजी, रोज त्यांच्याशी त्यांच्या शायरीविषयी बोलत असत.

बद्र सर आता एक्क्याण्णव वर्षांचे झाले होते, माझ्यासारखे अनेक जण त्यांच्या शायरीवर प्रेम करत वाढले आहेत! त्यांच्या शायरीने अनेकांना दिलासा दिलाय, अनेकांना आधार दिलाय! राहतजी खऱ्या अर्थाने बशीर सरांच्या गझल झाल्या आहेत! जी क्लीप, मी पाहिली होती त्यात त्यांच्या बेगमजान त्यांना जो शेर ऐकवत होत्या, त्याची पंक्ती अशी होती - खुदा़ ऐसे एहसास का नाम है..,ही पंक्ती त्या वारंवार सांगत होत्या आणि बशीर सरांना पुढची ओळ नाहीतर रदीफ़ ऐकवावा म्हणून गळ घालत होत्या, तीन चार रिपिटेशन्सनंतर बशीर सरांना त्याची पुढची ओळ आठवली, ते काहीसे अडखळत उत्तरले - रहे सामने और दिखाई न दे!

आपल्या शोहरकडून शेर पूर्ण होताच लहान मुलांसारख्या त्या खुदखुदून हसल्या! बशीरजींच्या गालावरून हात फिरवत आपल्या कापऱ्या आवाजात त्यांनी संपूर्ण शेर अर्ज केला -



**खुदा़ ऐसे एहसास का नाम है**
**रहे सामने और दिखाई न दे..**

बशीर बद्र सरांचा खुदा़ त्यांच्या पत्नीच्या रूपाने त्यांची काळजी घेत होता,खुदा त्यांच्या समोरच होता मात्र ते महसूस करू शकत नव्हते कारण ते या गोष्टींच्या पुढे गेले होते! मध्येच त्यांना भास होत असत की मुशायरा सुरु आहे! मग घराच्या दिवाणखान्यात ते एकटेच बसून असले तरी त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज येई आणि स्वतःच्या नकळत ते म्हणत, इर्शाद इर्शाद! हे दृश्य डोळे पाणावणारे असे!

आता लौकिक अर्थाने, ते पाण्याची लिखावट वाचण्यास रवाना झाले आहेत, त्यांना ठाऊक आहे की, हरेक नदी हजारो वर्षांच्या कथा बयान करते! त्या कथांच्या, व्यथांच्या साम्राज्यात ते अलगद हरवून जातात!

**अगर फ़ुर्सत मिले पानी की तहरीरों को पढ़ लेना**
**हर इक दरिया हज़ारों साल का अफ़साना लिखता है..**

एक नोंद सांगावीशी वाटते.

डॉक्टरसाब अगदी बेशकिंमती शेर सहजतेने सांगत असत, पैकी हा एक शेर विलक्षण रसाळ आहे-

**अगर तलाश करूँ कोई मिल ही जाएगा**
**मगर तुम्हारी तरह कौन मुझ को चाहेगा..**

हा शेर राहतजी,जेव्हा बशीर सरांना ऐकवत असतील तेव्हा ते राहतजींच्या प्रेम जाणिवांच्या परिघात, परिपूर्णतेने परतत असतील असे राहून राहून वाटते! आता मात्र बशीर सर कधीही परतून येणार नाहीत, ते अनंताच्या प्रवासाला रवाना झाले आहेत! अलविदा बशीर साहब, तुम्ही कोट्यवधी रसिकांच्या हृदयात सदैव सचेत असाल!

**- समीर गायकवाड**

## मुखवट्यांच्या बाजारात हरवत चाललेली माणुसकी !

'माणूस ओळखायला वर्षे लागतात,' असे अनेकदा म्हटले जाते. कारण प्रत्येक चेहरा हा खरा असेलच असे नाही. समाजात वावरताना आपल्याला अनेक प्रकारची माणसं भेटतात. काही मनाने स्वच्छ, प्रामाणिक आणि स्पष्ट असतात; तर काही अशीही असतात जी समोर काही आणि मागे काही असतात. त्यांच्या चेहऱ्यावर हसू असते, शब्दांत गोडवा असतो; पण मनात मात्र स्वार्थ, मत्सर आणि कपट दडलेले असते. अशी माणस म्हणजे जणू 'मुखवटा' घालून जगणारी माणस आजच्या समाजात ही प्रवृत्ती इतकी वाढली आहे की खरे आणि खोटे यातील फरक ओळखणे कठीण झाले आहे.



पूर्वीच्या काळात माणसांची ओळख त्यांच्या शब्दांवरून आणि वागणुकीवरून व्हायची. 'शब्द म्हणजे वचन' असे मानले जायचे. पण आज परिस्थिती बदलली आहे. अनेक लोक परिस्थितीनुसार चेहरे बदलतात. गरज असेल तेव्हा जवळ येतात आणि काम संपले की दूर जातात. समोर गोड बोलणारी हीच माणस मागे आपली निंदा करतात. अशा लोकांच्या वागण्यात एक प्रकारची दुटप्पी वृत्ती दिसून येते. त्यांच्यासाठी नाती, भावना किंवा विश्वास यांना काही किंमत नसते; त्यांच्यासाठी महत्त्वाचा असतो तो फक्त स्वतःचा स्वार्थ.

'आजच्या स्पर्धात्मक युगात ही प्रवृत्ती अधिक तीव्र होताना दिसते. पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी आणि यश मिळवण्यासाठी अनेक जण खोटेपणाचा आधार घेतात. कार्यालयांमध्ये, राजकारणात, व्यवसायात आणि अगदी वैयक्तिक नात्यांमध्येही लोक मुखवटे घालून वावरताना दिसतात. सोशल मीडियाने तर या मुखवट्यांना अधिक रंग दिला आहे. अनेक लोक इंटरनेटवर स्वतःची एक 'आदर्श प्रतिमा' निर्माण करतात; पण वास्तव जीवनात ते अगदी वेगळे असतात. चेहऱ्यावर आनंद दाखवणारी ही माणस अनेकदा आतून रिकामी असतात.

दोन तोंडी लोकांची सर्वात मोठी ओळख म्हणजे त्यांचा बदलता स्वभाव. ते प्रत्येक व्यक्तीसमोर वेगवेगळे रूप धारण करतात. एखाद्याच्या समोर कौतुक करायचे आणि त्याच व्यक्तीच्या अनुपस्थितीत त्याच्यावर टीका करायची, ही त्यांची सवय असते. अशा लोकांच्या शब्दांवर विश्वास ठेवणे धोकादायक असते. कारण त्यांचे बोलणे हे मनापासून नसते, तर परिस्थितीनुसार बदलणारे असते. ते नात्यांचा उपयोग स्वतःच्या फायद्यासाठी करतात आणि वेळ आली की सहजपणे साथ सोडतात.

अशा प्रवृत्तीमुळे समाजात विश्वास कमी होत चालला आहे. आज माणूस माणसावर सहज विश्वास ठेवत नाही. प्रत्येकजण समोरच्याच्या वागण्यात लपलेला हेतू शोधू लागला आहे. यामुळे नात्यांमधील प्रामाणिकपणा हरवत चालला आहे. मैत्री, प्रेम, नातेसंबंध आणि सामाजिक व्यवहार यामध्ये कृत्रिमपणा वाढत आहे. लोक आता चेहऱ्यावरचे हसू पाहतात; पण त्या हास्यामागील भावना खरी आहे का, याबद्दल साशंक राहतात.

परंतु या सर्व परिस्थितीत एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, प्रत्येक माणूस सारखा नसतो. अजूनही समाजात प्रामाणिक, स्पष्टवक्ते आणि मनाने स्वच्छ लोक आहेत. मात्र अशा खोट्या आणि मुखवटाधारी लोकांमुळे खरी माणसेही संशयाच्या भोवऱ्यात अडकतात. त्यामुळे आपण स्वतः तरी प्रामाणिक राहणे अत्यंत गरजेचे आहे. दुसऱ्यांना फसवून किंवा खोटे रूप दाखवून मिळणारे यश हे तात्पुरते असते. शेवटी माणसाचा खरा चेहरा एक ना एक दिवस समोर येतोच.

जीवनात आपल्याला अनेक अनुभव येतात. काही अनुभव आपल्याला माणसं ओळखायला शिकवतात.त्यामुळे प्रत्येक गोड बोलणारी व्यक्ती आपलीच आहे, असा गैरसमज करून घेणे चुकीचे आहे. माणसांची ओळख त्यांच्या शब्दांपेक्षा कृतीतून होते. जो माणूस संकटात साथ देतो, पाठीमागेही आपल्याबद्दल चांगले बोलतो आणि स्वार्थाशिवाय नाते जपतो, तोच खरा माणूस असतो.

आज समाजाला सर्वात जास्त गरज आहे ती मुखवट्यांची नव्हे, तर प्रामाणिक चेहऱ्यांची. लोकांनी दिखाव्यापेक्षा सत्याला महत्त्व दिले पाहिजे. कारण खोटेपणाचे आयुष्य फार मोठे नसते. मुखवटे काही काळासाठी माणसाचे खरे रूप लपवू शकतात; पण कायमचे नाही. शेवटी सत्य हे समोर येतेच. म्हणूनच प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे. आपण खऱ्या चेहऱ्याने जगतोय का, की एखादा मुखवटा घालून?

समाज बदलायचा असेल तर सुरुवात स्वतःपासून करावी लागेल. स्पष्टवक्तेपणा,प्रामाणिकपणा आणि नात्यांमधील पारदर्शकता जपली, तरच माणुसकी टिकून राहील. अन्यथा मुखवट्यांच्या या गर्दीत खरे चेहरे कायमचे हरवून जातील.

**कुमार व्यंकटेश नेरकर**
मो.७६२०६८७३०३

## आरटीईच्या ओझ्याखाली स्वयं-अर्थसहाय्य शाळांचा संघर्ष

आरटीई कायद्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली; मात्र स्वयं-अर्थसहाय्य शाळा आर्थिक संकटात सापडल्या आहेत. निधी विलंब, शिक्षकांची असुरक्षितता, सेवा संरक्षणाचा अभाव आणि वाढता प्रशासकीय ताण यामुळे शिक्षण व्यवस्थेचे संतुलन ढासळत आहे. विद्यार्थ्यांचा अधिकार जपत शिक्षक आणि संस्थांचे अस्तित्व सुरक्षित ठेवणारे संतुलित धोरण आता काळाची गरज बनली आहे.

शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे. आरटीई कायदा हा ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्रातही या कायद्याच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. परंतु या कायद्याच्या अंमलबजावणीमागे उभे असलेले स्वयं-अर्थसहाय्य आणि कॉन्व्हेंट शाळांचे वास्तव आज अत्यंत वेदनादायक बनले आहे.खासगी विनाअनुदानित आणि स्वयं-अर्थसहाय्य शाळांमध्ये २५% जागा राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आले. शासनाने या विद्यार्थ्यांच्या फी ची परतफेड शाळांना वेळेवर करणे बंधनकारक असावे ते मनमर्जी नसावे. कारण वास्तवात अनेक संस्थांना तीन-तीन, चार-चार वर्षे त्या परताव्याची प्रतीक्षा करावी लागते. परिणामी संस्थेचे संपूर्ण आर्थिक चक्र विस्कळीत होते.

स्वयं-अर्थसहाय्य शाळा कोणत्याही मोठ्या सरकारी अनुदानाशिवाय चालतात. शिक्षकांचे वेतन, इमारतींचे देखभाल खर्च, वीजबिल, डिजिटल सुविधा, प्रयोगशाळा, प्रशासकीय खर्च हे सर्व प्रवेश शुल्का आणि माहेवारी फी यावर आधारित व्यवस्थेमधून चालवले जाते. अशा परिस्थितीत शासनाकडून येणारा शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत येणारा निधी थांबला किंवा उशिरा मिळाला, तर त्याचा थेट परिणाम शिक्षकांवर आणि शाळांच्या अस्तित्वावर होतो.

आजही स्वयं-अर्थसहाय्य आणि कॉन्व्हेंट शाळांमधील शिक्षकांसाठी अधिकृत 'स्कूल कोड' नाही. शासनाच्या दृष्टीने त्यांची सेवा पूर्णपणे नोंदलेली नसते.




परिणामी शासकीय योजना, सेवा लाभ आणि प्रशासकीय अधिकारांपासून ते वंचित राहतात. शिक्षक म्हणून आयुष्य दिल्यानंतरही अधिकृत ओळखीचा अभाव ही केवळ प्रशासकीय त्रुटी नाही; तो शिक्षकांच्या सन्मानावर झालेला अन्याय आहे.आरोग्य आणि सामाजिक सुरक्षिततेची परिस्थिती तर आणखी गंभीर आहे. वैद्यकीय सुविधा नाही, आरोग्य विमा नाही, निवृत्ती संरक्षण नाही. एखादा शिक्षक गंभीर आजारी पडला तर उपचारासाठी कर्ज घ्यावे लागते. अनेक शिक्षक आयुष्यभर सेवा करूनही वृद्धापकाळात आर्थिक असुरक्षिततेत जगतात.

दुसरीकडे संस्थाचालकांच्याही अडचणी दुर्लक्षित करून चालणार नाहीत. शासनाच्या नियमांचे पालन करणे, शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत येणारा प्रवेश प्रक्रिया राबवणे, डिजिटल शिक्षणव्यवस्था उभारणे, स्पर्धात्मक सुविधा निर्माण करणे आणि त्याचवेळी आर्थिक ताण सहन करणे, हे सर्व अनेक संस्थांसाठी दिवसेंदिवस कठीण होत आहे. आर्थिक पाठबळाशिवाय या सुविधा टिकवणे शक्य नसते. शिक्षण व्यवस्थेतील एका घटकावर अन्याय करून दुसऱ्या घटकाला (विद्यार्थ्याला) न्याय देता येत नाही.

आज गरज आहे ती संतुलित आणि वास्तववादी धोरण निर्माण करण्याची आहे. स्वयं-अर्थसहाय्य आणि कॉन्व्हेंट शाळांसाठी स्वतंत्र सेवा नियमावली असणे आवश्यक आहे. शिक्षकांना विनाकारण सेवेतून कमी करण्यावर कायदेशीर निर्बंध असले पाहिजेत. शिक्षकांसाठी आरोग्य विमा, सामाजिक सुरक्षा आणि निवृत्ती संरक्षणाची स्पष्ट योजना तयार झाली पाहिजे. शासनाने शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत स्वयं-अर्थसहाय्य आणि कॉन्व्हेंट शाळांमधील निधी वर्षातून दोन वेळा देण्याची तरतूद बंधनकारक असताना दिले जात नाही, तसेच संस्थाचालकांना आर्थिक व प्रशासकीय सहाय्य देणारे दीर्घकालीन धोरणही आवश्यक आहे.

स्वयं-अर्थसहाय्य शाळांमधील सर्वात मोठा प्रश्न केवळ वेतनाचा नाही; तर नोकरीच्या सुरक्षिततेचाही आहे. स्वयं-अर्थसहाय्य आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये स्पष्ट आणि बंधनकारक सेवा नियमावली नसल्यामुळे शिक्षक सतत असुरक्षित वातावरणात काम करत आहेत. न्याय मागण्यासाठी प्रभावी यंत्रणा नसल्यामुळे अनेक शिक्षक नाईलाजाने अन्याय सहन करतात. ही परिस्थिती शिक्षण व्यवस्थेसाठी अत्यंत धोकादायक आहे. कारण असुरक्षित शिक्षक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकत नाहीत. शिक्षक आणि संस्थाचालक दोघांनाही कायदेशीर संरक्षण देणारी सक्षम व्यवस्था उभी करावी लागेल.

निवृत्तीबाबतची परिस्थितीही चिंताजनक आहे. भविष्य निर्वाह निधीची ठोस व्यवस्था नाही, निवृत्तीची हमी नाही, विमा संरक्षण नाही. अनेक शिक्षक १५-२० वर्षे सेवा करूनही असुरक्षित आयुष्य जगत आहेत. शिक्षण क्षेत्रासाठी आयुष्य खर्च करणाऱ्या शिक्षकांना जर मूलभूत सुरक्षितताच मिळत नसेल, तर ही संपूर्ण व्यवस्थेची शोकांतिका आहे.या निधीविलंबाचा थेट परिणाम शाळांच्या आर्थिक व्यवस्थेवर होतो. शिक्षकांचे वेतन थकते, शाळांचे मेंटेनेस अडचणीत येते आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

स्वयं-अर्थसहाय्य शाळांतील वाढत्या समस्यांवर बाबींवर गंभीरपणे कोणी विचार करत नाही आहे. स्वतंत्र आणि स्पष्ट सेवा नियमावली आवश्यक आहे. शिक्षकांना विनाकारण सेवेतून कमी करण्यावर कायदेशीर निर्बंध, 'स्कूल कोड' निर्माण झाला पाहिजे.शिक्षकांसाठी आरोग्य विमा, सामाजिक सुरक्षा आणि निवृत्ती संरक्षणाच्या योजना राबवल्या पाहिजेत. यासोबतच तक्रार निवारणासाठी स्वतंत्र शिक्षण न्याय प्राधिकरण, संस्थांना आर्थिक सहाय्य वेळेवर दिला गेला पाहिजे आणि राईट टू एज्युकेशन निधीचे वेळेवर वितरण ही काळाची गरज बनली आहे.

**डॉ. प्रशांत विघे**
सिनेट सदस्य
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
मो. ९३२६८७७४९०००

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# आश्वासनांचा ढिगारा, घाणीचे साम्राज्य कायम!

## 'एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिका'त डुकरांचा मुक्त संचार, विद्यार्थ्यांचा संताप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

**यवतमाळ, दि. ३० : स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेली शहरातील डॉ. एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिका पुन्हा एकदा दुर्लक्ष आणि निष्काळजी कारभारामुळे चर्चेत आली आहे.**





अभ्यासिकेतील अस्वच्छता, घाणीचे साम्राज्य आणि डुकरांचा मुक्त संचार याबाबत वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी या समस्यांबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कविता महाजन यांनी संबंधित ठेकेदाराला सूचना देऊन स्वच्छता, वाय-फाय, पिण्याचे पाणी आणि इतर सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येईल, अशी ग्वाही दिली होती. मात्र प्रत्यक्षात आजही अभ्यासिकेच्या परिसरात कचऱ्याचे ढिगारे, झुडपे आणि डुकरांचा वावर कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामीण भागातून एमपीएससी, यूपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी मोठ्या अपेक्षेने विद्यार्थी या अभ्यासिकेत येतात. मात्र मूलभूत सुविधा, स्वच्छ वातावरण आणि इंटरनेट सेवा यांचाच अभाव असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, जिल्हा नियोजन विभागाच्या माध्यमातून या अभ्यासिकेसाठी दरवर्षी निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र हा निधी नेमका कुठे आणि कसा खर्च होतो, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. अभ्यासिकेच्या व्यवस्थापनावर जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण असताना त्यांनी स्वतः या ठिकाणी भेट देऊन वस्तुस्थिती जाणून घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील विविध ठिकाणी आकस्मिक पाहण्या करणाऱ्या प्रशासनाने आता या अभ्यासिकेकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उभारलेली ही वास्तू दुर्लक्षामुळे ओळख गमावत असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

### करार संपला, तरी समस्या कायम

**डॉ. एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिकेच्या देखभालीसाठी देण्यात आलेल्या संस्थेचा मूळ करार संपुष्टात आला असून त्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र या कालावधीतही अभ्यासिकेची स्थिती सुधारलेली नाही. त्यामुळे नवीन निविदा प्रक्रिया राबवून स्थानिक आणि सक्षम संस्थांना प्राधान्य देण्यात यावे, तसेच विद्यार्थ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून व्यवस्थापनाची जबाबदारी सोपवावी, अशी मागणी विद्यार्थ्यांमधून जोर धरत आहे.**

# यवतमाळ शहर पोलिस ठाण्यातून विनायक राऊत यांचा सन्मानपूर्वक निरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**गडचिरोलीच्या नक्षलग्रस्त भागात १३ वर्षे सेवा**



**यवतमाळ, दि. ३० :** पोलिस दलात तब्बल ३३ वर्षांहून अधिक काळ कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिक सेवा बजावणारे पोलिस कर्मचारी विनायक राऊत हे यवतमाळ शहर पोलिस ठाण्यातून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी राऊत यांचा सहकुटुंब शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.१५ नोव्हेंबर १९९२ रोजी पोलिस सेवेत रुजू झालेल्या विनायक राऊत यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात विविध ठिकाणी जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. विशेषतः नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात तब्बल १३ वर्षे सेवा देत त्यांनी धाडस, संयम आणि कर्तव्यपरायणतेचा आदर्श निर्माण केला. त्यानंतर विविध ठिकाणी सेवा बजावत त्यांनी अखेर यवतमाळ शहर पोलिस ठाण्यातून सेवानिवृत्ती स्वीकारली. यावेळी पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी राऊत यांच्या उल्लेखनीय सेवाकार्याचा गौरव करत त्यांच्या समर्पित वृत्तीचे कौतुक केले. कर्तव्य बजावताना त्यांनी विभागाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी दिलेले योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास पोलिस विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी राऊत यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना निरोगी, सुखी व आनंदी निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. मनोगत व्यक्त करताना विनायक राऊत यांनी सेवाकाळात लाभलेल्या सहकाऱ्यांच्या सहकार्याबद्दल आणि

# टोल चुकविणाऱ्या जड वाहनावर कारवाईची मागणी..!

## वणी शहराचा वापर जड वाहनांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**वणी, दि. ३० :** टोलचा खर्च वाचविण्यासाठी शहरातील अंतर्गत रस्त्यांचा सर्रास वापर करणाऱ्या जड अवजड वाहनांमुळे वणीकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून या प्रकाराला तातडीने आळा घालण्याची मागणी युवासेनेने केली आहे.

युवासेना शहर प्रमुख तुलसी राजेंद्र तेवर यांनी शिष्टमंडळासह उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार यांना निवेदन देऊन कठोर कारवाईची मागणी केली. निवेदनानुसार, ट्रक, हायवा, ट्रेलर आणि इतर जड वाहने टोल टाळण्यासाठी शहरातील अरुंद व लोकवस्तीच्या रस्त्यांचा वापर करीत आहेत. परिणामी वाहतूक कोंडी, ध्वनी व वायू प्रदूषण, रस्त्यांची झपाट्याने होत असलेली दुरवस्था आणि अपघातांचा धोका वाढला आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. दीपक टॉकीज रोड, जंगली पीर बाबा दर्गा परिसर, ब्राम्हणी रोड, पंचशील नगर तसेच दारूल मदिना इंग्रजी शाळा ते मंजुषा चौपाटी मार्ग या भागातून मोठ्या प्रमाणात जड वाहतूक सुरू असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. युवासेनेने शहरातील जड वाहतूक तात्काळ बंद करणे, टोलचुकवेगिरी करणाऱ्या वाहनांवर कठोर दंडात्मक कारवाई करणे, शहराबाहेरील पर्यायी मार्गाचा वापर सक्तीचा करणे तसेच संवेदनशील भागांत हाइट बॅरिगेट्स उभारण्याची मागणी केली आहे. याशिवाय नियमित वाहतूक नियंत्रण आणि पोलीस बंदोबस्त ठेवण्याचीही मागणी करण्यात आली. यावेळी प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# नाल्यांच्या साफसफाईची मागणी हवेतच..!

## ८-९ दिवस उलटूनही नगर परिषदेची कारवाई शून्य

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. ३० :** शहरातील उत्तरवार ले-आऊट परिसरातील गटार व नाल्यांच्या साफसफाईबाबत नागरिकांनी केलेल्या मागणीकडे नगर परिषद प्रशासनाने अद्याप दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. परिसरातील रहिवासी अजयकुमार बाबाराव शामकुवर यांनी यासंदर्भात नगर परिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना निवेदन देऊन तातडीने नाल्यांची साफसफाई करण्याची मागणी केली होती.

मात्र निवेदन दिल्यानंतर तब्बल ८ ते ९ दिवस उलटूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. उत्तरवार ले-आऊट परिसरातील अनेक नाल्या व गटारे गाळ, माती, प्लास्टिक तसेच इतर कचऱ्याने भरून गेली आहेत. अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये गवत, झुडपे व लहान झाडे उगवली असून त्यामुळे सांडपाण्याचा प्रवाह अडथळाग्रस्त झाला आहे. पावसाळा तोंडावर आला असताना या नाल्यांची स्थिती चिंताजनक बनली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यात नाल्यांमध्ये पाणी तुंबल्यास परिसरात दुर्गंधी पसरू शकते. तसेच डासांचे प्रमाण वाढून मलेरिया, डेंग्यूसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत पावसाचे संकेत दिल्यामुळे नागरिकांची चिंता अधिक वाढली आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप साफसफाईचे कोणतेही काम सुरू झाले नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्यांमधील गाळ व कचरा काढून संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी रहिवाशांनी पुन्हा एकदा केली आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन नगर परिषद प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी व संभाव्य पूरस्थिती आणि साथीच्या रोगांचा धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी उत्तरवार ले-आऊटमधील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### दिग्रसमध्ये 'शिवछत्रपती' कबड्डी स्पर्धेसाठी संजय राठोड यांचा पुढाकार



**दिग्रस :** यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे राज्यस्तरीय "शिवछत्रपती कबड्डी स्पर्धा" आयोजित करण्यात याव्यात, अशी मागणी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री यांनी उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. २५ मे रोजी पाठविण्यात आलेल्या पत्रात दिग्रस तालुक्यातील कबड्डीप्रेम, ग्रामीण भागातील खेळाडूंची गुणवत्ता आणि स्पर्धा आयोजनासाठी उपलब्ध सुविधा यांचा उल्लेख करण्यात आला आहे.कबड्डी हा महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीशी जोडलेला लोकप्रिय खेळ असून राज्याने देशाला अनेक नामवंत कबड्डीपटू दिले आहेत. शासनाच्या विविध स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळत असल्याचे मंत्री राठोड यांनी नमूद केले. दिग्रस शहरात कबड्डी खेळ मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असून येथील अनेक खेळाडूंनी राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे "शिवछत्रपती" स्पर्धा दिग्रसमध्ये झाल्यास ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांना मोठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्पर्धेसाठी आवश्यक क्रीडांगण, निवास, वाहतूक व्यवस्था, स्वयंसेवक तसेच स्थानिक प्रशासन व क्रीडा संस्थांचे सहकार्य सहज उपलब्ध होऊ शकते, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. या स्पर्धेमुळे विदर्भातील खेळाडूंना संधी मिळून दिग्रसची राज्यभर स्वतंत्र क्रीडा ओळख निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### महाविकास आघाडीचा उमेदवार निश्चित, महायुतीत अद्यापही तिढा कायम!



**यवतमाळ :** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीची उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत जवळ येत असताना महायुतीमध्ये उमेदवार निवडीचा तिढा अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीने आपला उमेदवार निश्चित केल्याची अधिकृत घोषणा केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

यवतमाळ येथे काँग्रेसचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून साहेबराव कांबळे यांच्या नावाची घोषणा करत विजयाचा ठाम दावा केला. यावेळी बोलताना त्यांनी महायुतीवर जोरदार निशाणा साधला.

महाविकास आघाडीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मतदारांची भक्कम ताकद आहे. एवढेच नव्हे तर विरोधी पक्षातील काही मतदार आणि पदाधिकारीही आमच्या संपर्कात आहेत. महायुतीमध्ये बाहेरून उमेदवार आयात करण्याच्या प्रयत्नांमुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्या गोटात अंतर्गत कलह वाढला असून त्याचा थेट फायदा महाविकास आघाडीला होणार आहे," असा दावा नाईक यांनी केला.

शिवसेना शिंदे गटावर टीका करताना त्यांनी, नेहमीच बाहेरील उमेदवारांना संधी दिली जाते. त्यामुळे स्थानिक नेतृत्व आणि कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला आहे. स्थानिकांना डावलण्याच्या भूमिकेमुळे महायुतीची एकजूट कमकुवत झाली असून त्याचे परिणाम निवडणुकीत दिसून येतील असे सांगितले.

साहेबराव कांबळे यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा उल्लेख करताना नाईक म्हणाले की, "त्यांच्या कार्याची माहिती सर्व मतदारांना आहे. त्यामुळे त्यांना व्यापक पाठिंबा मिळत असून आमचा विजय निश्चित आहे.यावेळी काँग्रेसचे नेते अनिल गायकवाड यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, महायुतीकडून उमेदवार निश्चितीबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा न झाल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

# 'मासिक पाळीचा जागर' महिला आरोग्य जनजागृतीला नवी दिशा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**महागाव, दि. ३० :** मासिक पाळीबाबत समाजात आजही अनेक गैरसमज आणि संकोचाचे वातावरण असताना तिवरंग ग्रामपंचायतीने पुढाकार घेत राबविलेला 'पाळीचा जागर' उपक्रम महिला आरोग्य जनजागृतीसाठी आदर्श ठरला आहे.

जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त आयोजित या अभियानाने महिलांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि जागरूकतेचा प्रभावी संदेश पोहोचविला. तालुक्यातील एकमेव ग्रामपंचायत म्हणून तिवरंगने हा उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. कार्यक्रमात गावातील महिला, गर्भवती व स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुलींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. मासिक पाळी स्वच्छता, योग्य आहार, रक्तक्षय प्रतिबंध आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा ग्रामपंचायत प्रशासक प्रा. जयश्री राठोड यांनी महिलांचे आरोग्य सुदृढ असेल तर कुटुंब व समाजही निरोगी राहील, असे प्रतिपादन केले. यावेळी महिलांसाठी आणि किशोरवयीन मुलींसाठी रक्त तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत सचिव जी.जी. ढाकरे, ग्रामपंचायत कर्मचारी, आशा सेविका आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. स्वच्छ पाळी निरोगी भविष्य सक्षम महिला" हा संदेश देणारा तिवरंगचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

# शाळा व अंगणवाडी शौचालय बांधकामांतील निकृष्ट कामांची चौकशी करा - सतीश आदेवार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. ३० :** तालुक्यात सुरू असलेल्या शाळा व अंगणवाडी शौचालय बांधकामांमध्ये मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पंचायत समितीकडे चौकशीची मागणी केली आहे.

यासंदर्भात तालुका प्रमुख सतीश आदेवार यांच्या नेतृत्वाखाली गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, शासनाकडून प्रत्येक शौचालयासाठी सुमारे ४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात येत असताना प्रत्यक्षात केवळ १ ते दीड लाख रुपयांमध्ये कामे उरकली जात असल्याचा संशय आहे. अनेक ठिकाणी बांधकामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून काही कामे अल्पावधीत पूर्ण करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तालुक्यातील येदलापूर येथे उभारण्यात आलेल्या शौचालयांच्या कामांची पाहणी केल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत संपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यात आल्याचे निदर्शनास आले. तसेच या बांधकामात अनेक त्रुटी आढळल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. काही ठिकाणी बांधकाम पूर्ण झाल्यानंतर साहित्यही परत काढून नेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित ठेकेदार आणि अभियंत्यांच्या कामांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली आहे. या संदर्भात तालुका संघटक दयाकर गेडाम यांनीही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती आमदार संजय देरकर, मुख्य कार्यपालन अधिकारी तसेच संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत. निवेदनावर दयाकर गेडाम, अशोक पंधरे, शेख हसन आणि बाबू दुधकोळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मान्सून दारात,पुसद नगरपरिषदेची पूर्वतयारी कुठे?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**नागरिकांचा संतप्त सवाल**

**पुसद, दि. ३० :** पावसाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना पुसद नगरपरिषदेच्या मान्सूनपूर्व तयारीचा अद्यापही ठोस आराखडा दिसून येत नसल्याने शहरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शहरातील नाले गाळ आणि कचऱ्याने तुडुंब भरलेले असताना, अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडलेले असताना तसेच पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था अपुरी असताना प्रशासनाकडून कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप होत आहे. पुसद नगरपरिषद हद्दीत १५ प्रभाग आणि ३१ वार्ड असून शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र त्यानुसार मूलभूत सुविधांचे नियोजन आणि देखभाल करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील मुख्य सांडपाणी वाहून नेणारे नाले अनेक ठिकाणी गाळ आणि कचऱ्याने भरले असून पावसाळ्यात पाणी तुंबण्याचा धोका वाढला आहे. दरवर्षी मान्सूनपूर्व नालेसफाई आणि इतर प्रतिबंधात्मक कामांसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध होत असल्याची माहिती असतानाही यंदा अद्याप व्यापक स्वरूपात साफसफाई मोहीम राबविण्यात आलेली दिसत नाही. शहरातील अनेक भागांमध्ये गटारांमध्ये गाळ साचलेला असून सखल भागांमध्ये पाणी साचण्याची समस्या कायम आहे. पावसाळ्यात घरांमध्ये पाणी शिरणे, दुर्गंधी पसरून डासांचा प्रादुर्भाव वाढणे तसेच साथीच्या रोगांचा धोका निर्माण होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. तरीही प्रशासनाकडून या गंभीर प्रश्नांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याची टीका होत आहे.याशिवाय पुसद-बोरगडी रोडसह शहरातील अनेक प्रमुख मार्गांवर मोठमोठे खड्डे पडले असून पावसाळ्यात अपघातांची शक्यता वाढली आहे. काही भागांमध्ये अनेक महिन्यांपासून स्ट्रीट लाईट बंद असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. वाकलेले विद्युत खांब, धोकादायक झाडे आणि इतर संभाव्य धोके दूर करण्यासाठीही कोणतीही व्यापक मोहीम हाती घेण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी नगरपरिषदेकडून अद्याप कोणतीही महत्त्वाची बैठक झाल्याचे दिसून येत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंनी या विषयावर अपेक्षित पुढाकार न घेतल्याबद्दलही नागरिकांमध्ये नाराजी आहे. नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेशी संबंधित असलेल्या या प्रश्नांकडे प्रशासनाने केवळ औपचारिकतेच्या दृष्टीने न पाहता तातडीने नालेसफाई, रस्ते दुरुस्ती, पाणी निचरा व्यवस्था, विद्युत खांबांची तपासणी, बंद स्ट्रीट लाईट सुरू करणे आणि धोकादायक झाडांची छाटणी यांसारखी कामे युद्धपातळीवर हाती घ्यावीत, अशी मागणी शहरातील नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. अन्यथा पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य समस्या आणि त्यातून होणाऱ्या नुकसानीसाठी जबाबदार कोण, असा संतप्त सवाल आता पुसदकरांकडून उपस्थित केला जात आहे.

# मोदी सरकारच्या १२ वर्षपूर्ती अभियाना निमित्त जिल्हा कार्यशाळा उत्साहात..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३० :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोदी सरकारची १२ वर्षे विकास,विश्वास व जनकल्याणाची या अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा केमिस्ट भवन, शिवाजीनगर येथे उत्साहात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण होते. कार्यशाळेचे उद्घाटन माजी मंत्री मदन येरावार यांच्या हस्ते झाले. यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज भैय्या अहिर, आमदार राजू तोडसाम, माजी आमदार अण्णासाहेब पारवेकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण यांनी अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. पर्यावरण दिनानिमित्त स्वच्छता अभियान, प्लास्टिक निर्मूलन, ई-कचरा संकलन, वृक्षारोपण तसेच आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रत्येक मंडळात योग शिबिरे आयोजित केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय जनसंवाद, जनकल्याण शिबिरे, निबंध, चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे आयोजनही करण्यात येणार आहे. उद्घाटनपर भाषणात मदनभाऊ येरावार यांनी केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांशी संपर्क साधून त्यांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. समारोपप्रसंगी हंसराज भैय्या अहिर यांनी विविध समाज घटकां पर्यंत मोदी सरकारची विकासगाथा पोहोचविण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

**महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग**

**तहसिलदार वणी यांचे कार्यालय, वणी**

रा.मा.क्र./ / एम. आर. सी.- ८१ / २०२५ २०२६ मौजा नायगांव बु. ता.
क्रमांक/म. सहा./प्रस्तु-३/कावि/८२५ २०२६ दिनांक:- २५/०५/२०२६

वाचा- १. मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे आदेश क्रं./गृहशाखा/डेस्क-१२/कावि/१८०६/२०२३

**जाहीर - नोटीस**

**अर्जदार :-** **श्री. शांताराम रामचंद्र कडुकर रा. जैन लेआउट वणी ता.वणी जि. यवतमाळ**

**गैरअर्जदार :-** **निबंधक, उपनिबंधक जन्माची नोंद- ग्रामपंचायत कार्यालय- नायगांव बु तावणी**

**विषय :-** **जन्माची नोंद / मृत्यूची नोंद आदेश मिळण्याबाबतब.**

ज्याअर्थी, शांताराम रामचंद्र कडुकर रा. जैन लेआउट वणी ता. वणी जि. यवतमाळ यांनी स्वतःची जन्म नोंद/ मृत्यू नोंद दिनांक-०१/०७/१९६९ रोजी, ग्रामपंचायत कार्यालय- नायगांव बु येथे झाला परंतु त्यांचे जन्माची नोंद /मृत्यूची नोंद नोंदणी अभिलेखामध्ये उपलब्ध नसल्यामुळे सदर नोंद, ग्रामपंचायत कार्यालय-नायगांव (बु) ता.वणी येथील जन्माची नोंद / मृत्यूची नोंद नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याचा आदेश पारीत करण्याकरिता जन्म मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ चे कलम (३) अन्वये यांनी विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे. करिता सर्व नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार उपरोक्त व्यक्ती याचे नोंद ग्रामपंचायत कार्यालय- नायगांव बु ता. वणी येथील जन्माची नोंद / मृत्युची नोंद नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत ज्या कोणासही काही सांगावयाचे असल्यास अथवा काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुरावे तसेच उपलब्ध असलेल्या दस्तऐवजासह आपले आक्षेप दाखल करावे.

याद्वारे पुढे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाला काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जावर सुनावणी करण्यात येवुन आदेश पारीत करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**तहसिलदार वणी**

# सातरगाव येथे २१ जणांना अन्नातून विषबाधा

## तिवसा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी लागली रीघ

**तिवसा/वार्ताहर**

तेरविचा कार्यक्रमातील शिल्लक राहिलेले अन्न सायंकाळी जेवल्यानंतर त्या अन्नातून तब्बल २१ जणांना विषबाधा झाल्याची घटना तिवसा तालुक्यातील सातरगाव येथे घडली.आज शनिवारी सकाळी एक-एक करीत २१ जणांना तिवसा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल होण्याची वेळ आली.ज्यामुळे एकच गोंधळ निर्माण झाला होता.



सातरगाव येथील स्व.प्रवीण धानोरकर यांचा तेरविचा कार्यक्रम शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला कुटुंबीय व नातेवाईक दाखल झाले होते.शुक्रवारी तेरवी च्या कार्यक्रमात सकाळी जेवण आटोपल्यावर काही अन्न हे शिल्लक राहिले होते. मात्र सध्या उष्णतामान मोठ्या प्रमाणात असल्याने याचा सर्वत्र परिणाम जाणवत असून त्यामुळे सकाळचे अन्न हे काही तासांनी नासल्याने खाण्यायोग्य राहत नाही.नेमके तेरवीतील काही अन्न शिल्लक राहिले असता कुटुंबातील काहींनी रात्री ते अन्न प्राशन केले आणि काही तासातच कुटुंबीय व नातेवाईकांना मळमळ, उलटी,शौचाचा त्रास जाणवू लागला.त्रास वाढत असल्याचे पाहता आज सकाळी एक-एक करीत २१ जणांनी तिवसा ग्रामीण रुग्णालय गाठले.परिस्थिती पाहता सर्वांना उपचारासाठी दाखल व्हावे लागले.यामध्ये सातरगाव येथील कुटुंबीय नितीन धानोरकर(वय ४५),किशोर धानोरकर(वय ४५),तेजस धानोरकर(वय २३),अमोल धानोरकर (वय ३७),सार्थक धानोरकर(वय १८),गायत्री धानोरकर(वय ३०),राणी धानोरकर(वय २८),स्नेहल धानोरकर(वय ३०),रामभाऊ धानोरकर(वय ६२),वैशाली धानोरकर, अदविका धानोरकर यांचा तर नातेवाईकामध्ये राहुल बोरकर(वय २८ उत्तमगाव),तनु निंभोरकर(वय २०,काटोल), राजकन्या अतकरे(वय ६०,चांदुर बाजार), युगांत नागपुरे(वय ७,गव्हानकुंड), माऊली मैदानकर(वय १३,अमरावती), स्वरा मैदानकर(वय १० अमरावती),श्री मैदानकर(वय ६,अमरावती),विमल धानोरकर(वय ५०,अमरावती), रामदास अतकरे(वय ६०, चांदुर बाजार) व महेश उंबरकर(वय १० जरूड) यांचा समावेश आहे.

तिवसा ग्रामीण रुग्णालयात सर्व रुग्णांना सलाईन,इंजेक्शन व औषधोपचार देण्यात आला असून या ऊष्णतामानात सकाळचे अन्न सायंकाळी खाऊ नये,असा वैद्यकीय सल्ला नागरिकांना देण्यात आला आहे.

# विद्यापीठात 'नो व्हिकल डे'ला पर्यावरणस्नेही प्रतिसाद

**अमरावती/का.प्र.**



पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विशेष आवाहनाला प्रतिसाद देत, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये 'नो व्हिकल डे' (वाहनमुक्ती दिन) अत्यंत काटेकोरपणे पाळण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि प्रदुषणमुक्तीचा संदेश देण्यासाठी विद्यापीठातील वरिष्ठ अधिका-यांपासून ते कर्मचा-यांपर्यंत सर्वांनीच 'नो व्हिकल डे' पाळला.या मोहिमेचे नेतृत्व स्वत: विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. 'नो व्हिकल डे' चे औचित्य साधत कुलगुरू डॉ. बारहाते हे विद्यापीठ कार्यालयात ई - बाईकने दाखल झाले.विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व इतर वरिष्ठ अधिका-यांनी सुद्धा सायकल चालवत या आवाहनाला पूर्ण पाठिंबा दिला.

# प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष; आरटीओ कर्मचाऱ्यांचा पुन्हा बेमुदत संपाचा इशारा

## २ व ९ जून पासून आंदोलनाची मालिका
## १६ जूनपासून राज्यव्यापी बेमुदत संपाचा निर्णय

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांवर शासनाने अद्याप ठोस निर्णय न घेतल्याने महाराष्ट्र राज्य मोटार वाहन विभागकर्मचारी संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेने परिवहन आयुक्तांना निवेदन सादर करून २ व ९ जून आणि १६ जूनपासून आंदोलनाची घोषणा केली आहे.

संघटनेच्या निवेदनानुसार, यापूर्वी सप्टेंबर २०२४ मध्ये राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी तीन दिवसांचा ऐतिहासिक बेमुदत संप पुकारला होता. त्या आंदोलनानंतर परिवहन आयुक्त कार्यालयाकडून सेवा प्रवेश नियम व पदोन्नती प्रक्रियेबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. काही पदांवर तीन महिन्याकरिता तात्पुरत्या पदोन्नती देण्यात आल्या. मुदत संपल्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांना पूर्ववत त्याच पदावर कायम ठेवण्यात आले. बहुतांश मागण्या अद्याप प्रलंबितच असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या पार्श्वभूमीवर २ जून रोजी निदर्शने, ९ जून रोजी एकदिवसीय लाक्षणिक संप आणि १६ जूनपासून बेमुदत संप पुकारण्यात येणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. तीन टप्प्यांमध्ये आंदोलन उभारले जाईल २ जून दोन तासांची निदर्शने,९ जून एक दिवसाचा लाक्षणिक संप,दि.१६जून बेमुदत संप.प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत तातडीने प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे, राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागाचे अध्यक्ष अनिल मानकर, संदीप खवले, गजानन तनपुरे, सुनील गुल्हाने, दीपक पोटे, अमोल खिरोडकर,राहुल शिरसाठ, किशोर देशमुख, अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल गंगाखेडकर, प्रमोद राजनेकर,अमोल माटोडे, साजिद अली, श्वेता वैद्य, रोहिणी दातार,मीनल गिऱ्हे, लता कानडे, अश्विनी चव्हाण, अमोल गंगाखेडकर, उमेश तिवारी,हर्षदा चव्हात, वृषाली महल्ले, वैशाली निंभोरकर, स्मिता सिरमलवार, प्रीती डोंगरे, मनोज खोब्रागडे, जयसिंग राठोड, नितीन मुखे,अनिल मेश्राम, अरुण वाघमारे, संदीप अडागडे, राजेश राऊत, आशिष माथुरकर, देवेंद्र कळमकर, उज्वल ठाकरे, राजेश पाटील रवींद्र रुद्रकार, संतोष घ्यार, सुनील सोळंकी, प्रवीण तायवाडे, समीक्षा वारकरी, किशोर आडे,मीना मडावी, विनोद पिंगे,रामकृष्ण खंडारे, गजानन धुर्वे,संदीप राठोड, डेविन जुमळे, नितीन भेंडारे, शारदा हेडाऊ,रस्मिता पवार, प्रवीण मुंगळे, देवानंद खंडारे, आदी राज्यातील कर्मचारी वर्गाने दिलेला आहे.

# मुलींच्या निवासी संस्कार शिबिराचा समारोप



**अमरावती/का.प्र.**

विश्व जागृती मिशन व रामाश्रयी राम प्रिया जनकल्याण ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, सुश्री रामप्रियाश्रीजी (माई) यांच्या प्रेरणेने मयूरेश भवन, साईनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय निवासी मुलींच्या संस्कार शिबिराचा समारोपीय कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

समारोपीय कार्यक्रमाला दिव्य ज्योती जागृती संस्थानच्या साध्वी प्रश्मा भारतीजी, सनातन संस्थेचे पूज्य अशोक पात्रीकर काका, ज्येष्ठ समाजसेवक सुदर्शन गांग, श्री रामकथा प्रवक्ता देवी मंगलाश्रीजी, उपमहापौर सचिन भेंडे ज्योती राठोड,मनोहर देशपांडेजी, सीताराम खंडेलवाल तसेच युवा कीर्तनकार ह.भ.प. ज्योती धनाडे आणि दादाराव अढाऊ व बबिता अढाऊ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिबिराच्या दहा दिवसांच्या कालावधीत मुलींसाठी विविध व्यक्तिमत्त्व विकास व संस्कारवर्धक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. संगीताचे प्रशिक्षण अतुल अमृतकर यांनी दिले, तर संस्कृत प्रशिक्षण भारता देशमुख यांनी घेतले. स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण अर्चना मावळे यांनी दिले.संचालन तसेच धर्माचरणाचे महत्त्व याविषयी निलेशदादा टवलारे यांनी मार्गदर्शन केले. तसेच 'लव्ह जिहाद आणि त्यावरील उपाय' या विषयावर अनुभूता टवलारे यांनी मुलींना मार्गदर्शन केले.

दहा दिवसात शिकल्याप्रमाणे शिबिरार्थी मुलींनी लाठी-काठी, नानचकू, कराटे, योगासने, सूर्यनमस्कार, संस्कृत नाटिका तसेच नृत्य यांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. मुलींमधील आत्मविश्वास, शिस्त, संस्कार आणि कौशल्यांचे दर्शन या कार्यक्रमातून घडले.६० मुलींनी याचा लाभ घेतला.

# शिरजगांव कसबा येथे अप्पर तहसीलदार कार्यालय द्या

## आमदार प्रवीण तायडे यांचा पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुक्यातील शिरजगांव कसबा व करजगाव ही दोन गावे, चांदूरबाजार शहराच्या बरोबरीची किंबहुना त्यापेक्षा जास्त लोकसंख्येची गावे आहेत.नव्हे तर हा ब्रिटिश कालीन प्रगणा ही आहे.चांदूर बाजार शहरापासून ही गावे लांब ही पडतात.महसूलच्या कामासाठी शहराच्या तहसील कार्यालयात येणे. या दोन गावांसह परिसरातील गावांना त्रासदायक ठरते.त्या अनुषंगाने शिरजगांव कसबा परिसरातील १३ गावांनी, शिरजगाव कसबा येथे अप्पर तहसीलदार यांचे कार्यालय देण्यात यावे. अशी मागणी केली आहे.या मागणीचे लेखी निवेदन, आमदार प्रवीण तायडे यांना देण्यात आले आहे.

विशेष बाब म्हणजे तत्कालीन जिल्हाधिकारी शिवाजीराव पाटील यांचे आदेशानुसार,२००२ मध्ये शिरजगांव कसबा येथे नायब तहसीलदार यांचे कार्यालय सुरू करण्यात आले होते.मात्र मागिल काही वर्षांपासून तांत्रिक अडचणी दाखवून, नायब तहसीलदार यांचे शिरजगाव कसबा येथील कार्यालय बंद करण्यात आले आहे. त्यामुळे शिरजगांव कसबा,करजगांव,वुर्हा, लाखनवाडी, कारंजा बहिरम, पाळा, अलमपूर, बोदड, रतनपूर,सायखेडा,सर्फापूर, देऊरवाडा,काजळी,या १३ गावांनी ,शिरजगाव कसबा येथे अप्पर तहसीलदार कार्यालयाची मागणी केली आहे.गावातील नागरीकांची फेरफार, विविध दाखले, महसूल विषयक इतर कामे, तसेच वाळू तस्करीवर लक्ष ठेवणे.ही कामे पूर्वी नायब तहसिलदार कार्यालय असतांना वेळेत व्हायची.आता मात्र या कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणे येणे.तसेच त्याच दिवसी काम न झाल्यास दुसऱ्या दिवशी पुन्हा येणे. ही बाब या मागणी करणाऱ्या गावातील, नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. हा त्रास कायम स्वरूपी दूर व्हावा यासाठी माजी जिल्हा परिषद सभापती मनोहर सुने यांच्या नेतृत्वाखाली, १३ गावातील नागरिकांनी शिरजगाव कसबा येथे अप्पर तहसीलदार कार्यालय देण्यात यावे. या मागणीचे निवेदन आमदार प्रवीण तायडे यांना दिले आले. एकंदरी परिस्थिती पाहता या १३ गावातील नागरीकांची, शिरजगांव कसबा येथील अप्पर तहसीलदार कार्यालयाची मागणी रास्त आहे.

# मतदारयाद्यांची एसआयआर मॅपिंग प्रक्रियेत सहभाग नोंदवावा-आ.खोडके

**अमरावती** - भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) अंतर्गत अमरावती मध्ये वर्ष २००२ च्या मतदार यादी सोबत सद्याची वर्ष २०२४ च्या मतदार यादीची पडताळणी करून मॅपिंग करण्यात येत आहे. या मोहिमेत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी ( बीएलओ ) मार्फत घरोघरी जाऊन अथवा ऑनलाईन पद्धतीने मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात जास्तीत जास्त एसआयआर मॅपिंग प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी संबंधित बीएलओंना भेटून स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवावा. असे आवाहन आ.सुलभा खोडके यांनी केले.



# तंबाखू मुक्त व्हा, निरोगी रहा

## जागतिक तंबाखू विरोधी दिनाच्या निमित्ताने...

सुदृढ आणि निरोगी शरीर ही निसर्गाची अनमोल देणगी आहे. जेव्हा आपल्याला गंभीर आजार जडतो तेव्हा आपल्याला निरोगी असण्याचे महत्त्व कळते. तेव्हा धनसंपत्ती सुद्धा अशा गंभीर आजारातून मुक्त करण्याच्या कामी पडत नाही. अशाच गंभीर आजारांना आमंत्रण देणारे व्यसन म्हणजे तंबाखूचे व्यसन. तंबाखूच्या सेवनाने हळूहळू शरीरावर दुष्परिणाम होऊन माणसाला मृत्यूकडे ओढवल्या जाते. त्यामुळेच संपूर्ण जगातील तंबाखूचे सेवन करणाऱ्या लोकांना तंबाखूमुक्त करून निरोगी बनविण्यासाठी आणि तंबाखूचे आरोग्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी जनजागृती म्हणून दरवर्षी ३१ मे हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक तंबाखू विरोधी दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनाची सुरुवात जागतिक आरोग्य संघटनेच्या वतीने ३१ मे १९८७ साली करण्यात आली. या दिनाचे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे, तंबाखूचा वापर थांबविण्यासाठी जगभरातून प्रयत्न करणे व तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी जागतिक पातळीवर लोकांची जनजागृती करणे हा आहे.

आजच्या काळात तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे अनेक विपरीत परिणाम होतात हे माहिती असूनही तंबाखूचे व्यसन करणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढतच आहे. त्यातच आजची युवापिढी, जे उद्या देशाचे भविष्य घडवणार आहे. ही युवापिढी सुद्धा अशा व्यसनांच्या आहारी असल्याचे दिसून येतात. याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या परिणाम देशाच्या विकास प्रक्रियेवरही होतो. कारण तंबाखूमुळे मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्तींमुळे त्या देशांना मनुष्यबळाला मुकावे लागते. अनेक कुटुंबे उघड्यावर पडतात. त्यामुळे तंबाखूचे व्यसन देशाच्या विकासातील मोठा अडथळा ठरतो. हा विकासातील अडथळा वेळीच दूर करण्यासाठी त्याची कारणे शोधून उपाययोजना केल्या पाहिजे. तंबाखूच्या सेवनाची सुरुवात कुटुंब, परिसरातून होते. म्हणूनच कुटुंबातील मोठ्या व्यक्तींची जबाबदारी फार मोठी आहे. कारण लहान बालके मोठ्यांचे अनुकरण करतात. त्यामुळे घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींनी तंबाखू तथा तंबाखूजन्य पदार्थांचे घरातील लहान बालकांसमोर सेवन करणे तसेच त्यांना अशा वस्तू विकत आणायला लावणे हानीकारक ठरते. शिवाय लहान मुलांना तंबाखू विकत आणायला लावणे म्हणजे त्यांच्या तंबाखू सेवनाचा आरंभबिंदू ठरतो. ज्या तंबाखूचे त्यांना ज्ञानच नाही त्याविषयी आपण त्यांना जाणीव करून देतो. त्यातूनच तेही पुढे व्यसनाच्या आहारी जातात. सोबतच मोठ्यांच्या वर्तनाविषयी उत्सुकता म्हणून अनेकदा अशा गोष्टींचा आस्वाद घेण्याचे प्रकार घडतात व त्यातून व्यसन जडते. कधी-कधी तर मित्रमंडळीत चला मजा करू या, एक वेळ केले तर काय होते? म्हणून सहज या गोष्टी केल्या जातात व तेच व्यसनाचे कारण ठरते. एवढेच नव्हे, तर आता सिनेमातील नायक कशा प्रकारच्या स्टाईलने व्यसन करतो, ती सिनेस्टाईल जोपासण्यातुनही अनेक व्यक्ती व्यसनाकडे वळतांना दिसतात.परंतु सिनेमांमध्ये असे काही दाखवतांना पडद्यावर 'धूम्रपान शरीरास हानिकारक आहे' असे लिहून येते.पण त्याकडे मात्र चक्क दुर्लक्ष केले जाते. त्याचप्रमाणे तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या पाकिटावर सुध्दा 'तंबाखूमुळे तोंडाचा कर्करोग होतो' असे लिहून ग्राहकांना तंबाखू हा एक प्रकारचा हानिकारक पदार्थ असल्याचे सांगितले जाते. परंतु व्यसनाच्या हव्यासापायी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्षच केले जाते व शरीरास हानिकारक पदार्थ ग्रहण केले जातात. तंबाखू सेवनाच्या विविध प्रकारांनी जडलेल्या या सवयी खूप घातक ठरतात. नव्हे तर आयुष्याची माती करतात. तंबाखूच्या सेवनातून मेंदूला जी निकोटीनची सवय जडते ती खूप हानिकारक आहे. कारण नियमित तंबाखूचे सेवन करणाऱ्या व्यक्तीला तंबाखूचे सेवन न केल्यास अस्वस्थ होणे,थरथरणे, काम करण्यास मन न लागणे, मनात वाईट विचार येणे अशा अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. ज्या व्यक्ती विकासातील बाधा आहेत. तसेच या व्यसनांमुळे भूक न लागणे, आतड्यांची कार्यक्षमता मंदावने, छातीत दुखणे, मेंदूचा विकार, फुफ्फुस व श्वसन संस्थेचे वारंवार आजार होणे, श्वसनलिका आणि पोटात व्रण होणे, रक्तदाब वाढणे, प्रदीर्घ धूम्रपानामुळे फुफ्फुसाचा; तोंडाचा; घशाचा कर्करोग होतो, त्याचप्रमाणे तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या अर्कामुळे तोंडातील त्वचेवर दुष्परिणाम होते. एवढेच नव्हे तर तंबाखूजन्य पदार्थांचे अतिसेवन करणाऱ्यांना काही दिवसांनी तोंड उघडणेही अशक्य होते. मानवाला मृत्यूच्या दाढेत ओढणारे हे सर्व आजार मानवनिर्मित आणि तंबाखूच्या सेवनामुळे होणारे आहेत. त्यामुळे तंबाखूच्या सेवनाचा त्याग करून व तंबाखूवर बंदी घालून आपल्याला यापासून सुटका मिळवता येते. त्यामुळेच जागतिक स्तरावर तंबाखूच्या वापरावर बंदी घालणे व त्यावर अंकुश ठेवणे फार महत्त्वाचे आहे. याच दृष्टिकोनातून 'तंबाखूमुक्त युवक संदेश' अभियान तथा सन २००८ चा जागतिक तंबाखू विरोधी दिवस साजरा करतांना जागतिक आरोग्य संघटनेने तंबाखूचे उत्पादन, प्रचार, जाहिरात अशा गोष्टींवर बंदी घातली आहे. याच धर्तीवर महाराष्ट्रातही सरकारने गुटखा बंदीचा निर्णय घेऊन अतिशय चांगले व लोकहिताचे पाऊल उचलले आहे. तरीपण तंबाखूची पाळे-मुळे संपूर्णतः नष्ट झालेली नाही. त्यामुळे त्यासाठी निरंतर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कोणत्याही गोष्टीबाबत एका व्यक्तीचा परिणाम संपूर्ण कुटुंब, समाज आणि देशावर होतो. म्हणूनच एका व्यक्तीचे तंबाखू सेवन हे सुध्दा व्यक्तीच्या स्वतःच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या हितासाठी चांगले नाही. विकसित देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भावी पिढी व्यसनमुक्त, सुदृढ व आरोग्यसंपन्न असणे गरजेचे आहे. म्हणूनच भावी नागरिक असणारा आजचा विद्यार्थी, तरुणवर्ग, ज्येष्ठ व्यसनापासून दूर राहणे गरजेचे आहे. म्हणूनच जनजागृतीसाठी जागतिक तंबाखू विरोधी दिन संपूर्ण देशभर आणि जगभर राबविणे तंबाखूमुक्ती साठी महत्वपूर्ण ठरतो.

**डॉ. निलेशकुमार इंगोले**
शिरजगाव कसबा,
जि.अमरावती
मोब.
९३७११४५१९५

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर:स्वाभिमानी राज्यकर्ती

शौर्याचे प्रतीक बनून मराठ्यांच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी ज्यांच चरित्र लिहावं असं एक तेजस्वी व्यक्तीमत्व म्हणजे पुण्यश्लोक, लोकराज्ञी, लोकमाता अहिल्याबाई होळकर होय. अहिल्याबाई होळकर यांचे जीवन म्हणजे शौर्य आणि सात्विकता यांचा सुरेख संगम होय. एका तेजस्वी कर्तृत्वाचा प्रेरणादायी जीवनपट असे त्यांचे जीवनकार्य उल्लेखनिय आहे. आज त्यांची जयंती.अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या छोट्याशा गावी झाला.त्यांचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी म्हणजेच खंडेरावांशी झाले आणि त्या होळकर घराण्याच्या सूनबाई झाल्या. त्यांचे बुद्धिकौशल्य व चातुर्य पाहून मल्हारराव महत्त्वाचा पत्रव्यवहार तसेच मोहिमेवर असतांना राज्यांची चोख देखरेख ठेवणे अशी विश्वासाची कामे अहिल्याबाईंवरच सोपवत असत. मालेराव आणि मुक्ता ही अहिल्याबाईंची दोन अपत्ये होय. संसाराबरोबरच चाणाक्ष बुद्धीने आणि व्यवहार कौशल्याने त्यांनी राज्यकारभाराची तंत्रे लवकर शिकून घेतली. पण अगदी लहान वयातच त्यांच्यावर नियतीने घाला घातला. एका लढाई दरम्यान इ.स. १७५४ ला त्यांचे पती खंडेराव यांना वीरमरण आले. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. परंतु सासऱ्यांच्या म्हणण्यानुसार प्रजाहितासाठी पती मागे सती न जाता आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा मान ठेवून त्यांनी इंदोर संस्थानातील राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. तेथून पुढे इंदोर संस्थानचा राज्यकारभार अहिल्याबाईंनी सांभाळला आणि तेथूनच एक राज्यकर्ती म्हणून त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात झाली.



एकीकडे लढायांचे शौर्य गाजवून त्या रणरागिनी बनल्या, तर दुसरीकडे तीर्थस्थानांचा जीर्णोद्धार करून त्या महान योगीनी सुद्धा बनल्या. अन्नछत्रे उघडणे, दानधर्म करणे, पाणपोया, धर्मशाळा, आश्रयशाळा बांधने अशी समाजहिताची कामे त्यांनी केली. जनावरांसाठी, पशुपक्ष्यांसाठी उपचाराची व्यवस्था केली. जलचर असो वा मुंग्या त्यांच्या राज्यात कुणीही उपाशी राहू नये म्हणून त्यांनी सढळ हाताने दानधर्म केला. सुबत्ता व शांततापूर्ण राज्य निर्माण करणारी ती स्त्री-शक्ती होती. स्त्री कर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टीने त्यांचे कार्य किती महान होते हे त्यांचे आयुष्यच सांगते. इतिहासाच्या पानावरती शौर्य आणि मांगल्य यांची आभा त्यांचे जीवन व्यापून टाकते.


प्रत्येक स्त्रीला जगण्याचे, लढण्याचे, स्वतःचे सत्त्व टिकवण्याचे धारिष्ट देणारे प्रेरणास्त्रोत म्हणजे अहिल्याबाईंचे जीवन आहे. आजच्या काळात स्त्रियांपुढे असणारी अनेक संकटे, अनेक आव्हाने यांना स्वाभिमानाने सामोरे जाऊन स्त्री जीवनाचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी समस्त स्त्री वर्गासाठी अहिल्याबाई होळकर यांचे जीवन व विचार प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे. अशा या कर्मयोगी तपस्विनीची महेश्वर येथे १३ ऑगस्ट १७९५ रोजी वृद्धापकाळाने प्राणज्योत मालवली. ही तत्वज्ञानी, स्वाभिमानी राज्यकर्ती समस्त स्त्री वर्गाला आदर्श ठरणारी आहे. इतिहासकारांनीही त्यांना The Philosopher Queen म्हटले आहे. समस्त स्त्रियासाठी प्रेरणास्त्रोत असलेल्या स्वाभिमानी राज्यकर्ती पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना विनम्र अभिवादन !

**राजश्री शेषरावजी खाजोने**
चांदूर बाजार, जि. अमरावती
मोब. ९६६५६८०६३९

मा.श्री हर्षवर्धन देशमुख आणि मा.श्री दिलीपबाबू इंगोले यांच्या संयुक्तिक अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्यानिमित्त...



# प्रेरणादायी नेतृत्व, शिक्षणसेवा आणि समाजकारणाचा तेजस्वी प्रवास



**मोठेपण हे केवळ पदांमध्ये नसते; ते वागण्यात, विचारांत आणि लोकांशी जोडून घेण्याच्या वृत्तीत असते. मा.श्री हर्षवर्धन देशमुख यांचा सर्वसामान्यांशी असलेला आत्मीय संवाद, त्यांची वैचारिक पकड आणि विकसनशील दृष्टीकोण आणि मा. श्री दिलीपबाबू इंगोले यांची शांत, विश्वासार्ह आणि संयमी कार्यशैली या दोन्ही गोष्टी समाजाला प्रेरणा देणाऱ्या आहेत. यासोबतच श्री शिवाजी शिक्षण संस्थेने गेल्या ९ वर्षाच्या कार्यकाळात जी उंची गाठली त्यासाठी या दोनही व्यक्तींचे संयुक्तिक प्रयत्न त्यासाठी लाभदायी ठरले आहे.**

इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे कार्य हे केवळ एका काळापुरते मर्यादित राहत नाही, तर पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणेचा दीप बनून कार्य करत राहते. काही लोक पदांमुळे मोठे होतात, तर काही आपल्या विचारांनी, कार्याने आणि समाजासाठी जगण्याच्या वृत्तीने जनमानसात अढळ स्थान निर्माण करतात.आज आपण अशाच दोन आदरणीय, कर्तृत्ववान आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वांच्या संयुक्तिक अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्याचे साक्षीदार राहणार आहोत.ते म्हणजे मा.श्री हर्षवर्धनजी देशमुख आणि मा.श्री दिलीपबाबू इंगोले यांच्या समाजाधिष्ठित जीवनप्रवासानिमित्त केलेल्या सत्कार सोहळ्याचे.

हा सोहळा केवळ दोन व्यक्तींच्या जीवनातील पंचाहत्तरीचा उत्सव नाही; तर तो एका प्रदीर्घ संघर्षमय, मूल्यनिष्ठ, समाजहितवादी आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाचा गौरव आहे. आजचा हा क्षण त्यांच्या कार्याचा सन्मान करणारा, त्यांच्या विचारांना अभिवादन करणारा आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा आहे.

श्री हर्षवर्धन देशमुख हे नाव महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत आदराने घेतले जाते. माजी कृषिमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या कृषी क्षेत्रात काम करताना शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवला. ग्रामीण भागातील प्रश्न, शेतीसमोरील आव्हाने, बदलते वातावरण आणि शेतकऱ्यांच्या अडचणी यांचा सखोल अभ्यास करून त्यांनी अनेक विधायक उपक्रम राबविले. त्यांच्या नेतृत्वात प्रशासनिक कौशल्याबरोबरच मानवी संवेदनशीलतेचा सुंदर संगम दिसून येतो. राजकारण हे केवळ सत्तेचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे माध्यम आहे, हा विचार त्यांनी आपल्या कार्यातून सातत्याने अधोरेखित केला. सामान्य माणसांच्या अडचणी समजून घेणारा नेता, कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा मार्गदर्शक आणि संस्थेच्या विकासाच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण व कणखर भुमिका प्रगट करणारे हर्षवर्धन देशमुख सर्वांनाच माहिती आहेत.

त्यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे शिक्षण क्षेत्रातील त्यांची दूरदृष्टी. श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी ग्रामीण व सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे अधिक व्यापक केली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेला लाभलेल्या प्रत्येकच अध्यक्षाने संस्थेच्या वाढीसाठी योगदान दिलेले आहे. परंतू हर्षवर्धन देशमुख यांची दूरदृष्टी अधिकच व्यापक होती. आज संस्थेच्या भौतिक विकासासोबतच संस्थेचा आर्थिक विकास, शैक्षणिक प्रगती लक्षात घेतली असता ती अधिक सरस असल्याचे दिसून येते. आज संस्थेच्या शाळा महाविद्यालयांना मिळालेला लौकिक ही त्यांच्या कार्याची पावती आपल्याला देतो आहे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, या विश्वासातून त्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर न बनवता जबाबदार नागरिक घडविण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यपद्धतीतून दिसून येतो. आज हजारो विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशस्वी होत आहेत. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून संस्कारांचा ठेवा देखील असतो त्यामुळे कागदी शिक्षणासोबतच संस्काराधिष्ठित उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना चांगल्या विचारांशी जोडण्याचे काम हर्षवर्धन देशमुख यांनी करून दाखविले आहे.

संस्थेच्या यशामागे जसे प्रभावी नेतृत्व आवश्यक असते, तसेच निःशब्दपणे, प्रामाणिकपणे आणि सातत्याने काम करणारे आधारस्तंभही आवश्यक असतात.ते म्हणजे संस्थेचे कोषाध्यक्ष मा.श्री दिलीपबाबू इंगोले. ज्यांनी आपल्या संयमी स्वभावाने, आर्थिक शिस्तीने आणि संस्थेप्रती असलेल्या निष्ठेने एक वेगळा आदर्श निर्माण केला.श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे कोषाध्यक्ष म्हणून त्यांनी संस्थेच्या आर्थिक व्यवस्थापनात पारदर्शकता, शिस्त आणि विश्वासार्हता निर्माण केली. कोणतीही संस्था सक्षमपणे उभी राहण्यासाठी आर्थिक नियोजन, काटेकोर व्यवस्थापन आणि प्रामाणिकता अत्यंत महत्त्वाची असते. ही जबाबदारी त्यांनी अत्यंत यशस्वीपणे सांभाळली.त्यांचे कार्य हे केवळ आकडेमोडीपुरते मर्यादित नाही; तर संस्थेच्या विकासाशी, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि समाजाच्या प्रगतीशी जोडलेले आहे.शांतपणे काम करत राहणे, प्रसिद्धीपासून दूर राहून संस्थेच्या प्रगतीसाठी योगदान देणे आणि प्रत्येक कार्यात प्रामाणिकपणा जपणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे. संस्थेच्या प्रत्येक कार्याची, विकासात्मक बाबींची खडानखडा माहिती ठेवत असतानाच संस्थेचे आर्थिक गणित बिघडणार नाही याची काळजी घेणारे काळजीवाहू म्हणून ते सदैव कार्य करतात. संस्थेच्या कार्यालयात सतत कार्य करून, प्रत्येक कामकाजाची पाहणी, ते सुनियोजितपणे करून घेण्याची जबाबदारी त्यांनी समर्थपणे निभावली आहे. त्यामुळे दिलीपबाबू इंगोले यांचे व्यक्तिमत्व इतरांपेक्षा निश्चितपणे वेगळे दिसून येते.



✍ हेमंत वासुदेवराव काळमेघ
सचिव ,स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानकार्यकारिणी
सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

मा.श्री हर्षवर्धन देशमुख आणि मा. श्री दिलीपबाबू इंगोले या दोन्ही मान्यवरांनी आपल्या कार्यातून एक गोष्ट स्पष्ट केली आहे. समाजात टिकणारे कार्य हे निस्वार्थी विचारांमधूनच निर्माण होते. आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात मूल्यांची जपणूक करणे ही मोठी जबाबदारी आहे. परंतु या दोन्ही व्यक्तिमत्त्वांनी शिक्षणसंस्था ही केवळ ज्ञान देणारी जागा नसून संस्कार घडविण्याचे केंद्र असावे, हा विचार जपला. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सामाजिक जाणीव, राष्ट्रीय भावना आणि मानवतावादी दृष्टिकोन विकसित व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

या दोनही व्यक्तींच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना दिशा मिळाली, अनेक कुटुंबांच्या आशा बळकट झाल्या आणि समाजात सकारात्मक परिवर्तनाची प्रेरणा निर्माण झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्था केवळ वाढली नाही; तर गुणवत्तेच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या नव्या उंचीवर पोहोचली आहे.

मोठेपण हे केवळ पदांमध्ये नसते; ते वागण्यात, विचारांत आणि लोकांशी जोडून घेण्याच्या वृत्तीत असते. मा.श्री हर्षवर्धन देशमुख यांचा सर्वसामान्यांशी असलेला आत्मीय संवाद, त्यांची वैचारिक पकड आणि विकसनशील दृष्टीकोण आणि मा. श्री दिलीपबाबू इंगोले यांची शांत, विश्वासार्ह आणि संयमी कार्यशैली या दोन्ही गोष्टी समाजाला प्रेरणा देणाऱ्या आहेत. यासोबतच श्री शिवाजी शिक्षण संस्थेने गेल्या ९ वर्षाच्या कार्यकाळात जी उंची गाठली त्यासाठी या दोनही व्यक्तींचे संयुक्तिक प्रयत्न त्यासाठी लाभदायी ठरले आहे.

'परोपकाराय फलन्ति वृक्षाः
परोपकाराय वहन्ति नद्यः।
परोपकाराय दुहन्ति गावः
परोपकारार्थमिदं शरीरम्?'

म्हणजे वृक्ष इतरांसाठी फळ देतात, नद्या इतरांसाठी वाहतात, गायी इतरांसाठी दूध देतात; त्याचप्रमाणे हे मानवी शरीरही परोपकारासाठीच आहे. हे सुभाषित मा.श्री हर्षवर्धन देशमुख आणि मा. श्री दिलीपबाबू इंगोले यांच्या समाजसेवा, शिक्षणसेवा आणि जनहिताच्या कार्याला अत्यंत समर्पक ठरेल.

या दोघांचेही संयुक्तिक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अधिकार आहे; पण अहंकार नाही.

कार्याचा विस्तार आहे; पण प्रसिद्धीची अपेक्षा नाही.समाजासाठी काम करण्याची तळमळ आहे; पण त्यामागे स्वार्थ नाही.म्हणूनच आज त्यांच्याविषयी समाजाच्या मनात असलेला आदर हा केवळ त्यांच्या पदांमुळे नाही, तर त्यांनी जपलेल्या मूल्यांमुळे आहे.

खरे तर अमृत महोत्सव हा केवळ वयाचा टप्पा नसतो; तो अनुभवांचा, संघर्षांचा, कर्तृत्वाचा आणि समाजाने दिलेल्या प्रेमाचा उत्सव असतो. आजचा हा संयुक्तिक सत्कार सोहळा म्हणजे दोन प्रेरणादायी जीवनप्रवासांना दिलेली सामूहिक मानवंदना आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या, अनेक आव्हाने पेलली आणि प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला. त्यांच्या कार्यामुळे संस्थेचा विस्तार झाला, प्रगती झाली, समाज प्रगत झाला, विद्यार्थी घडला आणि अनेकांना प्रेरणा मिळाली.

या मंगल प्रसंगी आपण सर्वजण मा.श्री हर्षवर्धन देशमुख आणि मा. श्री दिलीपबाबू इंगोले यांना उत्तम आरोग्य, निरामय आयुष्य, दीर्घायुष्य आणि अखंड कार्यशक्तीच्या मनःपूर्वक शुभेच्छा अर्पण करतो.त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा प्रकाश पुढील अनेक वर्षे समाजाला दिशा देत राहो, शिक्षणसेवेची आणि समाजकारणाची त्यांनी निर्माण केलेली परंपरा अधिक बळकट होत राहो,हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## वर्तनातील घरंदाजपण!

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.हर्षवर्धन उपाख्य भैयासाहेब देशमुख यांच्या अमृत महोत्सवाचे आयोजन ही शिव परिवारासाठी उत्साहवर्धक घटना आहे.श्री.भैय्यासाहेबांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली तेव्हा लोकांच्या मनात संमिश्र भावना होत्या. राजकारणात सक्रिय असणारे भैय्यासाहेब शिवाजी शिक्षण संस्थेला तेवढा वेळ देऊ शकतील का?संस्थेत पक्षीय राजकारण येईल का?आणि संस्थेत काम करणारे कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य यांच्या मनावर एक प्रकारचे दडपणही होते.श्री.भैय्यासाहेबांचा स्वभाव परखड व तापट आहे,त्यात आपला निभाव लागेल का? अशा विविध भावना होत्या . याशिवाय शिक्षण संस्थेचा अनुभव नसलेली व्यक्ती शिक्षण संस्था त्याच गतीने पुढे नेईल का? अशा विविध पातळ्यांवर विविध संमिश्र भावना होत्या. श्री भैय्यासाहेबांनी आपल्या कृतीनेच या सर्व विचारांना उत्तर दिले?

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कारभार खूप लक्ष आणि वेळ देऊन पारदर्शकपणे केला. प्रत्येक गोष्टीसाठी त्यांनी चर्चा, संवाद आणि प्रयत्न याचा अंगीकार केला. संस्थेच्या कामासाठी त्यांनी कधीही लहान-मोठे पणाचा भाव किंवा इगो बाळगला नाही.संस्थेच्या कामासाठी ते आपले मंत्रीपद विसरले आणि प्रत्येक अधिकाऱ्याच्या टेबलवर जाऊन त्यांनी प्रश्नांची सोडवणूक केली. मग तो रोस्टरचा प्रश्न असो,संस्थेत पदमंजुरीचा प्रश्न असो की संस्थेच्या इमारतींचा, जमिनीचा प्रश्न असो त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन ते प्रश्न तडीस नेले. त्यांच्या काळात अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न व समस्या तडीस गेल्या याचे कारण त्यांचा रुतबा, संपर्क, काम करण्याची पद्धत आणि स्वतः पुढाकार घेऊन मंत्रालयापासून तो एखाद्या शासकीय कार्यालयापर्यंत जाण्याची तयारी हे होय.त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा सर्वांगीण विकास झालेला आपणास दिसून येतो.

श्री भैय्यासाहेबांचे व्यक्तिमत्त्व घरंदाज. जरुडकर देशमुखांच्या प्रख्यात घराण्याचे ते वारसदार. श्री.भैय्यासाहेबांनी हा वारसा केवळ जन्माने जपला नाही तर आपल्या कर्तृत्वानेही जपला आहे. आपल्या वागण्या-बोलण्यात त्यांनी हा घरंदाजपणा तर जपलाच पण आचरणानेही तो सिद्ध केला. श्री. भैय्यासाहेब महाराष्ट्र शासनात कृषिमंत्री होते. कृषी मंत्री म्हणून महाराष्ट्राच्या, वऱ्हाडच्या



शेतकऱ्यांसाठी त्यांनी अनेक योजना सुरू केल्या. मोर्शी -वरूडच्या संत्रा उत्पादकांसाठी आणि एकूणच विदर्भाच्या शेतकऱ्यांसाठी त्यांनी संत्रा परिषद त्यावेळी आयोजित केली. त्यातून संत्रा पिकांची विविधता, त्यातील नवनवीन प्रयोग, त्याची बाजारपेठ, त्यावरील प्रक्रिया अशा सर्व अंगाने संत्रा उत्पादकांना लाभ झाला. स्वतः भैय्यासाहेब शेतकरी असल्याने शेतकऱ्यांचे दुःख त्यांनी अनुभवले आहे. त्यामुळे मंत्री असताना शेतकरी हिताच्या अनेक योजना त्यांनी राबविल्या.

इतकेच नव्हे तर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाल्यावर राष्ट्रीय कृषी प्रदर्शनीचे भव्य आयोजन,आंबा लागवडीवर चर्चासत्र,केळी उत्पादनासाठी मार्गदर्शक कार्यक्रम अशा विविध योजना त्यांनी राबविल्या. विशेष म्हणजे मंत्रीपदावर आणि राजकारणात इतके वर्षे राहूनही भ्रष्टाचाराचा शिंतोडा त्यांच्या अंगावर उडाला नाही. आज राजकारणात एखादे नगरसेवकासारखे पदही प्राप्त झाल्यावर नखशिखांत हुलिया बदलून गेलेले अनेक लोक आपण पाहतो पण मंत्रिपदावर राहूनही मोहाचे क्षण टाळणारी घरंदाज नैतिकता भैय्यासाहेबांनी दाखविली. ही सचोटी आणि कसोटी पाळणे भल्या भल्यांना जमत नाही. हा तोल सांभाळणारे भैय्यासाहेबांसारखे व्यक्तिमत्त्व विरळेच म्हटले पाहिजे. स्वतः एका विशिष्ट पक्षाचे नेते असताना सुद्धा भैय्यासाहेबांनी शिवाजी शिक्षण संस्थेत हे पक्षीय राजकारण येऊ दिले नाही.राजकारणातील सर्व राजकीय प्रवाहांना त्यांनी संस्था विकासासाठी आपलेसे केले. त्यामुळे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विकासाचा परीघ विस्तारला.

मा.श्री. नितीनजी गडकरी आणि मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी डॉ पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार गौरवाने स्वीकारला आणि भाऊसाहेबांच्या स्वप्नांना साकारण्यासाठी शासकीय पाठबळ उभे केले त्याचे श्रेय श्री. भैय्यासाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला, प्रयत्नांना आणि निष्पक्ष वर्तणुकीला जाते. श्री भैय्यासाहेबांचा एकूणच जीवन प्रवास हा दिमाखदार आहे. या दिमाखदार जीवन प्रवासात त्यांना अत्यंत तन्मयतेने साथ देणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनी सौ. निर्मलाताई यांचे योगदानही महत्त्वाचे आहे.श्री भैय्यासाहेबांनी राजकारण, समाजकारण सांभाळले आणि सौ. निर्मलाताईंनी संसार तोलून धरला.श्री. भैय्यासाहेबांच्या कार्यकाळात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा वेलू गगनावरी गेला आहे. ही पताका अशीच फडकत राहावी आणि त्यांचे सक्षम नेतृत्व संस्थेला भविष्यकाळातही प्राप्त व्हावे हीच या

✍ डॉ. किशोर फुले
सचिव, डॉ. पंजाबराव देशमुख
साहित्य, कला आणि संस्कृती अकादमी.
मो.९४२३१२४६०८

## दिलखुलास दिलीपबाबू!


श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. दिलीपबाबू इंगोले यांचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. म्हणजे त्यांनी वयाची पंच्याहत्तरी गाठली आहे.दिलीपबाबूंचे व्यक्तिमत्त्व,त्यांचा उत्साह, काम करण्याची उमेद,स्वभावातला मिश्किलपणा पाहिला की दिलीपबाबूंनी पंच्याहत्तरी गाठली असे वाटत नाही. दिलीपबाबूंचे व्यक्तिमत्त्व दिलखुलास आहे. काही आत-बाहेर नाही. आपल्या बोलण्यातून चौके- छक्के मारण्याची त्यांची सवय आहे. एखाद्या व्यक्तीवर व्यक्त व्हायचे तर दिलीपबाबू आपला बेधडक अभिप्राय देऊन टाकतात. 'अरे बदमास आहे न तो! मी ओळखतो न त्याले.' हे बाउंड्रीपार वाक्य ते फेकून देतात.

दिलीपबाबू मैदानावर घडलेले व्यक्तिमत्त्व आहे.अंबापेठ क्रीडा मंडळाच्या क्रीडांगणावर त्यांचे आयुष्य गेले.ते मंडळाचे अध्यक्ष होते.

दिलीपबाबू बास्केटबॉलचे खेळाडू आहेत. बास्केटबॉलचे राज्यस्तरीय,राष्ट्रीय सामने त्यांनी आयोजित केले आहेत.अजूनही मैदानावर त्यांचा राबता असतो. दिलीपबाबू बास्केटबॉलचे खेळाडू असले तरी सर्वच खेळांची त्यांना माहिती आहे. ॲड. शेळकेसाहेबांच्या काळात शिव परिवारात शिवाजी ऑलिंपियाड सुरू करण्यात आले.

त्याची सर्व जबाबदारी दिलीपबाबुंवर असे. प्रत्येक ग्राउंड,त्याच्या टीम, रेफ्री,लॉट्स, खेळाडूंची व्यवस्था या सर्वांची त्यांना बारीकसारीक माहिती असे.या स्पर्धांना ते पूर्णवेळ उपस्थित राहत. खेळाडूंचा, आयोजकांचा उत्साह वाढवीत.

दिलीपबाबू एक उत्तम क्रीडा संघटक आहेत, मार्गदर्शक आहेत. महाराष्ट्र शासनाचा क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च शिवछत्रपती पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला आहे.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेने जलतरण तलाव बांधला. या जलतरण तलावाची जबाबदारी दिलीपबाबूकडे. शिवाजीचा हा जलतरण तलाव नावारुपाला आणण्यात व त्याची चोख व्यवस्था ठेवण्यात दिलीपबाबूंच्या प्रशासनाचा मोठा वाटा आहे. संस्थेचा कोणताही लहान मोठा कार्यक्रम असो त्याची संपूर्ण माहिती दिलीपबाबूंना असते. अगदी राष्ट्रपतीच्या कार्यक्रमापासून तो पालकमंत्र्याच्या कार्यक्रमापर्यंत.

स्टेज, बैठक व्यवस्था, पाहुण्यांची व्यवस्था या सर्व आयोजनात दिलीपबाबूंचा पुढाकार असतो. स्टेज किती बाय कितीचा लागेल, खुर्च्या कोणत्या, किती व कशा लागतील, स्टेज प्रोग्राम कसा राहील याची खडानखडा त्यांना माहिती असते. ही सर्व व्यवस्था कॉन्ट्रॅक्टरकडून करून घेण्याचे कसब फक्त दिलीपबाबूंकडे आहे.

मुख्य म्हणजे ते पदाधिकारी असूनही एखाद्या कार्यकर्त्यासारखे काम करत असतात; हे त्यांचे वैशिष्ट्य.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारणीत जवळपास पंचवीस वर्षांपासून दिलीपबाबू आहेत. संस्थेच्या साडेतीनशे शाळा -महाविद्यालयातील प्रत्येक कर्मचारी, शिक्षकाची कुंडली दिलीपबाबूंना पाठ आहे.कुठे जागा खाली आहे, कोणाची अपॉइंटमेंट कुठे केली, कोण कोणाचा आहे, कोणाची बदली कुठे झाली, प्रत्येक शाळेची, महाविद्यालयाची स्थिती काय आहे, किती खर्च झाला, कोणाला किती निधी दिला याची माहिती दिलीपबाबूंना मुखपाठ असते. त्यामुळे कोषाध्यक्ष म्हणून चेकवर सही करताना हा स व मागोवा ते घेत असतात.

दिलीपबाबूंचे तीर्थरूप स्व.रावसाहेब इंगोले हे संस्थेचे अध्यक्ष होते.त्यांच्याच काळात मेडिकल कॉलेज आले. रावसाहेबांचे व्यक्तिमत्त्व अतिशय घरंदाज पण साधे, सरळ होते.त्यांचा जनसंपर्क दांडगा होता.आपल्या माणसासाठी झटणे हा त्यांचा स्वभाव होता. कुंड सर्जापूर हे त्यांचे गाव.

या गावाची जमीनदारीच इंगोले कुटुंबाकडे होती. कुंडचे वाडे याची साक्ष आहेत. प्रभू श्रीराम हे या घराण्याचे दैवत.

त्यांचे राम मंदिर आहे.रामनवमीचा उत्सव दरवर्षी थाटात साजरा केला जातो. श्री. दिलीपबाबू या घराण्याचे संस्कार घेऊन आले आहेत.श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वाटचालीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांना उत्तम दीर्घायुरारोग्य लाभो ही अमृत महोत्सवानिमित्त शुभकामना.

# प्रेमजाळं, पैशांचा खेळ आणि सत्तेच्या दालनातील 'अणुबाँब'!

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोला :** राजकारणाच्या रंगमंचावर सत्तेचे खेळ, निष्ठेचे दावे आणि पडद्यामागील सौदे यांची चर्चा नेहमीच रंगत असते. मात्र गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात एका वेगळ्याच कथानकाची कुजबुज सुरू आहे. ही कथा आहे एका प्रभावशाली लोकप्रतिनिधीच्या स्वीय सहाय्यकाची, एका रहस्यमय महिलेची आणि प्रेम, पैशांचा दबाव तसेच प्रतिष्ठेच्या संघर्षातून **'नील'** झालेल्या नाट्यमय घडामोडींची.

- एका स्वीय सहाय्यकाची महागात पडलेली जवळीक
- पद, प्रतिष्ठा अनब पैसा तिन्हीतून झाला 'नील'
- राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण

कथेला सुरुवात होते एका देखण्या, आत्मविश्वासपूर्ण आणि आपल्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाने अनेकांना भुरळ घालणाऱ्या महिलेपासून. ***'उघडे केस, डोळ्यांवर गॉगल आणि आत्मविश्वासाने ओसंडून वाहणारी तिची अदा अन् अनेक झाले फिदा...'*** राजकीय कार्यालयांच्या परिसरात तिची वर्दळ वाढू लागली होती. कामानिमित्त ये-जा करणाऱ्या या महिलेची ओळख हळूहळू एका लोकप्रतिनिधीच्या स्वीय सहाय्यकाशी झाली.

सुरुवातीला केवळ औपचारिक संवाद होता. मात्र काही दिवसांतच तो संवाद जवळकीत बदलला. स्वतःला लोकप्रतिनिधीचा सर्वात विश्वासू माणूस म्हणून मिरवणाऱ्या त्या स्वीय सहाय्यकाने आपल्या प्रभावाच्या गोष्टी सांगायला सुरुवात केली. 'कार्यालयातील सर्व निर्णय माझ्या माध्यमातूनच होतात', 'आर्थिक व्यवहारही मीच पाहतो', अशा बढाया मारत त्याने स्वतःचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. महिलेवर प्रभाव पडला असे त्याला वाटत होते. पण प्रत्यक्षात कोण कोणाला प्रभावाखाली आणत होते, याचा अंदाज त्याला नव्हता.

काळ पुढे सरकत गेला. भेटी वाढल्या. एकत्र प्रवास सुरू झाले. मुंबईच्या फेऱ्या, डोंगर-दऱ्यांतील रम्य ठिकाणांचे दौरे, निसर्गाच्या सानिध्यातील असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या फार्महाऊसवरील मुक्काम आणि गुप्त भेटींचे सत्र सुरू झाले. या सर्व घडामोडींमध्ये स्वीय सहाय्यक स्वतःला विजेता समजत होता. मात्र त्याला हे कळलेच नाही की, ज्या जाळ्यात तो दुसऱ्यांना अडकवण्याची सवय ठेवत होता, त्याच जाळ्यात तो स्वतः अलगद अडकत चालला होता.

राजकीय वर्तुळात चर्चा अशी आहे की, संबंधित महिलेने प्रत्येक पाऊल अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने टाकले. विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. जवळीक वाढली. आणि जेव्हा योग्य वेळ आली, तेव्हा तिने अचानक आपली भूमिका बदलली.

एका भेटीत तिने स्वीय सहाय्यकासमोर गंभीर आरोपांची शक्यता मांडली. पोलिसांत तक्रार, गुन्हा दाखल आणि सार्वजनिक बदनामी यांचा उल्लेख होताच त्या स्वीय सहाय्यकाच्या पायाखालची वाळू सरकली. प्रतिष्ठा, राजकीय संबंध आणि सामाजिक प्रतिमा धोक्यात येण्याची शक्यता त्याला स्पष्ट दिसू लागली.

चर्चेनुसार, सुरुवातीला तब्बल १५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. ही रक्कम ऐकताच स्वीय सहाय्यकाच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास नाहीसा झाला. प्रकरणाची माहिती लोकप्रतिनिधीपर्यंत पोहोचल्यावर परिस्थिती आणखी गंभीर बनली. आधीच विविध वादांच्या भोवऱ्यात सापडलेल्या त्या लोकप्रतिनिधीला आणखी एका वादाची भर परवडणारी नव्हती. त्यामुळे पडद्यामागे हालचाली सुरू झाल्या. काही प्रभावशाली व्यक्तींना मध्यस्थीची जबाबदारी देण्यात आली. बैठका झाल्या. चर्चा रंगल्या. आणि अखेर कथित तोडगा निघाला. १५ लाखांवर सुरू झालेली मागणी पाच लाखांपर्यंत खाली आल्याची चर्चा आहे. मात्र या संपूर्ण व्यवहाराची किंमत फक्त पैशांत मोजली गेली नाही. आर्थिक फटका बसलाच, पण त्याहून मोठा धक्का प्रतिष्ठेला, पदाला बसला. अनेक वर्षे स्वतःला लोकप्रतिनिधीचा सर्वात जवळचा आणि प्रभावशाली सहकारी म्हणून सादर करणाऱ्या त्या स्वीय सहाय्यकाची अचानक राजकीय वर्तुळातून घसरण सुरू झाली. त्याची पदावरून हकालपट्टीही करण्यात आली. कार्यालयातील त्याचा प्रभाव संपुष्टात आला. त्याच्या जागी लोकप्रतिनिधीने आपल्या विश्वासातील एका कर्मचाऱ्याची तातडीने नियुक्ती करीत **'हात'** मजबूत केल्याचे बोलले जात आहे.

### 'सुझ्रू' चर्चेने वाढवली खमंग रंगत

दरम्यान, या कथित प्रकरणानंतरही काही पदाधिकारी धडा घेण्यास तयार नसल्याची चर्चा आहे. याच राजकीय गटातील काही पदाधिकारी आणि एक अध्यक्ष एका **'सुझ्रू'** नावाने ओळखल्या जाणाऱ्या युवतीच्या सहवासात रमल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. गावाबाहेरील फार्महाऊस, गुप्त भेटी आणि वाढती जवळीक यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा कुजबुज सुरू झाली आहे. **'पहिल्या प्रकरणातूनही कोणी शहाणे झाले नाही का?'** असा सवाल आता चर्चांमधून उपस्थित होत असल्याचे बोलले जाते.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाबाबत कोणतीही अधिकृत तक्रार, पोलिस नोंद किंवा संबंधित पक्षांकडून सार्वजनिक भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे राजकीय वर्तुळात फिरणाऱ्या चर्चांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळली जाऊ शकलेली नाही. मात्र या कथित घटनाक्रमाने जिल्ह्याच्या राजकीय दालनात एकच खळबळ उडवली असून, **'प्रेमजाळं की सापळा?'** हा प्रश्न सध्या अनेकांच्या चर्चेचा विषय ठरला आहे.

राजकारणात सत्ता, पैसा आणि प्रतिष्ठा यांचे समीकरण कधी बदलते, हे सांगता येत नाही. पण या कथित प्रकरणाने एक गोष्ट मात्र अधोरेखित केली आहे की सत्तेच्या दालनात प्रत्येक खेळी दिसते तितकी साधी नसते; काही खेळींचा शेवट थेट 'चेकमेट'मध्येच होतो. याठिकाणी संबंधित स्वीय सहाय्यक तर पद, प्रतिष्ठा आणि पैसा या तिन्हीतून **'नील'** झाल्याची चर्चा आहे.

# दहिहांडा सेवा सहकारी सोसायटीच्या नव्या इमारतीचे उद्घाटन

## युवकांनी शेतीपूरक व्यवसायांकडे वळावे : डॉ. जयराज कोरपे



■ प्रतिनिधी | अकोला ■

बदलत्या कृषी व्यवस्थेत केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता दुग्ध व्यवसाय, पशुपालन, मत्स्यपालन, कृषी प्रक्रिया उद्योग यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांकडे युवा शेतकऱ्यांनी वळण्याची गरज आहे. अशा उपक्रमांना अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच सेवा सहकारी सोसायट्यांचे भक्कम पाठबळ मिळेल, असे प्रतिपादन अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी केले.

दहिहांडा येथील सेवा सहकारी सोसायटीच्या नव्या इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी शनिवारी (दि. ३०) आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. कोरपे म्हणाले की, दहिहांडा सेवा सहकारी सोसायटीची स्थापना १९५९ मध्ये झाली असून, त्या काळातील सभासदांनी संस्थेच्या प्रगतीसाठी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे उभारलेल्या सहकाराच्या भक्कम पायावर आजची प्रगती उभी आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात सेवा सहकारी सोसायट्यांची भूमिका महत्त्वाची असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल व्यवहार, पारदर्शक कारभार आणि सुलभ कर्जपुरवठा यामुळे या संस्थांवरील विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे यांनी मार्गदर्शन करताना सेवा सहकारी सोसायट्यांनी पारंपरिक कामकाजाच्या चौकटीबाहेर जाऊन आधुनिक उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार क्षेत्राने नवे आयाम स्वीकारावेत, असे ते म्हणाले. कार्यक्रमात दहिहांडा सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाच्या वतीने डॉ. जयराज कोरपे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती निळकंठ खेडकर, सोसायटीचे अध्यक्ष अ. मुतलीब अ. गफूर, भीमराव कोलटक्के, दिगंबर कासमपुरे, संचालक अजय आठवले, सुनील गायगोळ, अ. जावेद अ. हमीद, रूपराव डहाके, राजेंद्र गासे, आशिष मगर, निरंजन पळसपगार यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, सभासद, शेतकरी व खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपमुख्याधिकारी रविंद्र थोरात यांनी केले. सूत्रसंचालन दिलीप भुईभार यांनी तर आभार म. इद्रीस अ. मुतलीब यांनी केले.

# संघ कार्यालय हल्ला प्रकरणात आ. पठाण यांच्यासह सर्व संशयित निर्दोष

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात २०१० मध्ये गाजलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) कार्यालयावरील कथित हल्ला प्रकरणात विद्यमान आमदार साजिद खान पठाण, माजी महापौर मदन भरगड यांच्यासह काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. तब्बल १६ वर्षांपासून सुरू असलेल्या या बहुचर्चित खटल्याचा निकाल प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी ए. जे. गिऱ्हे यांच्या न्यायालयाने दिला.

प्रकरणानुसार, १२ नोव्हेंबर २०१० रोजी शशांक शरदचंद्र जोशी यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तत्कालीन सरसंघचालक के. एस. सुदर्शन यांनी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आंदोलन करताना गांधी चौक परिसरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यालयावर जमावाने हल्ला केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता. तक्रारीनुसार, मदन भरगड, साजिद खान पठाण, मब्बा पहलवान, प्रकाश तायडे आणि अन्य काँग्रेस कार्यकर्त्यांनी हातात लाठ्या, जळते पुतळे, फटाके व दगड घेऊन संघ कार्यालयावर हल्ला केला होता. या घटनेत एक पोलिस कर्मचारी तसेच संघाचे दोन कार्यकर्ते जखमी झाल्याचे नमूद करण्यात आले होते.या प्रकरणी पोलिसांनी दंगल, बेकायदेशीर जमाव, मारहाण, मालमत्तेचे नुकसान, घरात घुसखोरी, जाळपोळ करण्याचा प्रयत्न आदी गंभीर स्वरूपाच्या आरोपांखाली भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन सिटी कोतवालीचे ठाणेदार विलास पाटील यांनी या प्रकरणाचा तपास करून आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले होते.

खटल्यादरम्यान सरकार पक्षाने एकूण १० साक्षीदारांची साक्ष नोंदविली. मात्र, बचाव पक्षाचे वकील ॲड. दिलदार खान यांनी साक्षीदारांची सखोल उलटतपासणी करत त्यांच्या जबाबांमधील विसंगती, घटनास्थळी उपस्थितीबाबतचे संशय तसेच तपासातील त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. साक्षीदारांच्या जबाबांतील तफावत आणि उपलब्ध पुराव्यांतील कमतरता यावर बचाव पक्षाने जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सरकार पक्षाला आरोप सिद्ध करण्यात अपयश आल्याचे नमूद करत आमदार साजिद खान पठाण, माजी महापौर मदन भरगड तसेच या प्रकरणातील सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करण्याचा आदेश दिला. या खटल्यात आरोपींच्या वतीने ॲड. दिलदार खान, ॲड. दुष्यंत चव्हाण, ॲड.राजेश जाधव, ॲड.अमीन खान, ॲड. शर्मा आणि ॲड.दिपेश धायडे यांनी काम पाहिले. या निकालामुळे अकोल्यातील राजकीय व सामाजिक वर्तुळात पुन्हा एकदा या बहुचर्चित प्रकरणाची चर्चा रंगली असून, दीर्घकाळ न्यायप्रविष्ट राहिलेल्या खटल्याचा शेवट अखेर आरोपींच्या निर्दोष मुक्ततेने झाला आहे.

## जाहीर नोटीस

### वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ७०१/२०२६ — प्रोसेस नं.६५०७/२०२६
चौ.ता. ०३/०७/२०२६ — दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** १. मंदा लक्ष्मण इंगळे २. रितेश लक्ष्मण इंगळे दोन्ही रा. यशोदा नगर, नागे लेआउट, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मण श्रीराम इंगळे
**पत्ता :-** रा. यशोदा नगर, नागे लेआउट, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मण श्रीराम इंगळे यांचे दि. ०४/०३/२०२५ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



# इतिहासाच्या सावलीत राहिलेल्या 'त्या तिघी'...



## सावरकर कुटुंबातील वीरांगनांना डॉ. शुभा साठेंचा भावपूर्ण सलाम

**वर्धा/ जनमाध्यम**

स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास लिहिताना वीर सावरकरांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले जाते; मात्र त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिलेल्या बाई, माई आणि ताई यांच्या त्यागाचा इतिहास अजूनही पुरेशा प्रमाणात समोर आलेला नाही. राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या या तीन स्त्रिया हिंदुत्व, त्याग आणि राष्ट्रभक्तीचा मूर्तिमंत आदर्श असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा सावरकर साहित्याच्या अभ्यासिका डॉ. शुभा साठे यांनी केले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सावरकर कुटुंबातील यशोदा, यमुना आणि शांता यांनी तलवार हाती घेतली नव्हती, रणांगण गाजविले नव्हते;

मात्र कारावास, उपासमार, जप्ती, सामाजिक उपेक्षा आणि असंख्य संकटांचा सामना करत त्यांनी आपल्या कुटुंबासह राष्ट्रकार्याची ज्योत तेवत ठेवली. त्यांच्या त्यागाची तुलना झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर आणि राणी दुर्गावती यांच्या पराक्रमाशी केली जाऊ शकते, असे डॉ.साठे म्हणाल्या.

यावेळी समाजसेवा आणि राष्ट्रसेवेसाठी उल्लेखनीय योगदान देणारे नितीन पजई दाम्पत्य तसेच कारगिल युद्धातील माजी सैनिक मेजर शशिकांत देशपांडे यांचा गौरव करण्यात आला.

सावरकर स्मारक आणि ग्रंथालय उभारणीसाठी देणगी घोषणाही करण्यात आली.राष्ट्रभक्ती, त्याग आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# रक्तदानातून जपली २७ वर्षांची मैत्री

## गडकरींच्या वाढदिवसानिमित्त मुस्लिम मित्राचा हृदयस्पर्शी सलाम

**नागपूर/ जनमाध्यम**

धर्माच्या भिंतीपलीकडे जाऊन जपलेली मैत्री किती पवित्र असते, याचे भावनिक उदाहरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि त्यांचे जिवलग मित्र रियाज अली सय्यद यांनी समाजासमोर ठेवले आहे. ठाणे येथील रियाज सय्यद यांची गडकरी यांच्याशी १९९९ मध्ये ओळख झाली. कालांतराने ही ओळख घट्ट मैत्रीत बदलली.

दरवर्षीप्रमाणे गडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी रियाज नागपुरात आले होते. यावेळी काटोल येथे आयोजित रक्तदान शिबिराची माहिती मिळताच त्यांनी थेट शिबिरस्थळी जाऊन रक्तदान केले. माझ्या मित्राला मोठी भेट देता येत नसेल, तर समाजासाठी रक्तदान करून त्यांचा वाढदिवस साजरा करावा, या भावनेतून त्यांनी हा उपक्रम केला.रक्तदानानंतर भावना



व्यक्त करताना रियाज म्हणाले, गडकरी साहेबांसाठी रक्तच काय, गरज पडली तर जीवही देईन. त्यांच्या या शब्दांनी उपस्थितांचे डोळे पाणावले.एका मुस्लिम मित्राने हिंदू मित्राच्या वाढदिवसानिमित्त केलेले रक्तदान हे केवळ मैत्रीचे नव्हे, तर सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक ठरले आहे. या कृतीतून 'माणुसकी हाच खरा धर्म' असल्याचा संदेश समाजाला मिळाला.

# गुन्हेगारी वार्ता

## दुचाकीचा धक्का लागल्याने युवकाला मारहाण

**पुलगाव -** किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका युवकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना नागपूर फैल परिसरात घडली. या घटनेत सोनू मसराम (२९) हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, सोनू मसराम हे पानठेल्याजवळ उभे असताना जगदीश ढोक यांच्या दुचाकीला त्यांचा धक्का लागला. यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होत जगदीश ढोक यांनी शिवीगाळ करत सोनू यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करून वाद शांत केला. जखमी सोनू मसराम यांनी दिलेल्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास सुरू असून पोलिसांकडून अधिक चौकशी केली जात आहे.

## भरधाव ट्रकची दुचाकीला धडक  महिला गंभीर जखमी

**वर्धा -** भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार महिला गंभीर जखमी झाल्याची घटना बरबडी-वर्धा मार्गावरील एमआयडीसी परिसरात घडली. या अपघातात गीता वाटगुळे (५६, रा. बरबडी) यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गीता वाटगुळे या दुचाकीने वर्धेकडे जात होत्या. त्यावेळी मागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे त्या रस्त्यावर फेकल्या गेल्या व गंभीर जखमी झाल्या. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी मिळालेल्या तक्रारीवरून ट्रक चालक सुरेश सोयाम (रा. बोरगाव मेघे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## शेतीच्या वादातून साळभाऊकडून फावड्याने हल्ला

**आष्टी -** शेतीच्या जुन्या वादातून एका व्यक्तीवर फावड्याने हल्ला करून जखमी केल्याची घटना किन्ही आबाद येथे घडली. या प्रकरणात सचिन भागवत (४६) हे जखमी झाले आहेत. माहितीप्रमाणे, सचिन भागवत यांच्या पत्नीच्या नावावर गावात शेती असून त्यासंदर्भात साळभाऊ सुनील हावरे यांच्याशी वाद सुरू होता. दरम्यान, भागवत यांच्या कामाच्या ठिकाणी सुनील हावरे व त्यांचा मुलगा रोहित हावरे आले. तेथे दोन्ही पक्षांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. वाद वाढताच आरोपींनी फावड्याने हल्ला करून सचिन भागवत यांना जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## शस्त्रासह दहशत माजविणाऱ्या युवकाला अटक

**वर्धा -** सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या युवकाला शहर पोलिसांनी अटक केली. यश पराते (२६, रा. न्यू रेल्वे कॉलनी) असे अटक करण्यात आलेल्या युवकाचे नाव आहे. विकास विद्यालय परिसरात एक युवक शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. संशयिताची झडती घेतली असता त्याच्याकडे शस्त्र आढळून आले. त्यामुळे त्याला ताब्यात घेण्यात आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून शस्त्र कुठून आणले आणि त्याचा उद्देश काय होता, याचा तपास सुरू आहे.

## उष्माघाताने महिला मजुराचा दुर्दैवी मृत्यू

**गिरड -** वाढत्या तापमानाचा आणखी एक बळी गेल्याची घटना समोर आली आहे. शेतात काम करून परतत असताना उष्माघातामुळे महिला मजुराचा मृत्यू झाला. मंदा बारेकर (५०, रा. खेक) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या गावातील एका शेतात भाजीपाला काढण्याचे काम करण्यासाठी गेल्या होत्या. दिवसभराचे काम पूर्ण करून त्या घराकडे परतत असताना रखरखत्या उन्हामुळे त्यांना अचानक भोवळ आली आणि त्या रस्त्यावर कोसळल्या. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. या प्रकरणी गिरड पोलिसांनी नोंद करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

## अतिमद्यप्राशनामुळे युवकाचा मृत्यू

**हिंगणघाट -** अतिमद्यप्राशनामुळे प्रकृती बिघडून एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना शहरातील तुकडोजी वॉर्ड परिसरात घडली. राहुल महाजन (३५) असे मृत युवकाचे नाव आहे. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, राहुल यांना मद्यपानाचे व्यसन होते. अतिप्रमाणात मद्यप्राशन केल्याने त्यांची प्रकृती अचानक खालावली. त्यानंतर त्यांना उपचारासाठी नेण्यात आले; मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी मृतदेहाचे पंचनामा करून पुढील कार्यवाही केली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली

# अहिल्यादेवीं जयंतीतून समाजसेवेचा जागर

**वर्धा/ जनमाध्यम**

लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श उभा करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त वर्धा शहरात आज आणि उद्या या दोन दिवसांत भरगच्च सामाजिक, सांस्कृतिक आणि गौरव सोहळ्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, यंदाचा जयंती उत्सव केवळ मिरवणुकीपुरता मर्यादित न राहता समाजप्रबोधन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा ठरणार आहे.

धनगर समाजसेवा मंडळ तथा जयंती उत्सव समितीच्या वतीने ३० मे रोजी सकाळी ७.३० वाजता पवनार येथील धाम नदी घाटावर एक दिवस माझ्या समाजासाठी या ब्रीदवाक्याखाली



स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. समाजकार्याला प्रत्यक्ष कृतीची जोड देत अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.सायंकाळी ५ वाजता समाजातील सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी, नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा सत्कार तसेच दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा होणार आहे. यावेळी सतीश महाराज देशमुख यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्या हस्ते होणार असून भाजप नेते जयंत कावळे, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मी घोडके यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ३१ मे रोजी सकाळी पूर्णाकृती पुतळ्याचे दुग्धाभिषेक व हारार्पण करण्यात येणार असून सायंकाळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या उपस्थितीत भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. लेझीम, चित्ररथ, भजन मंडळांनी सजणारी ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गाने फिरणार असून समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# खासदार अमर काळेंच्या मायेचा स्पर्श

# चिमुकल्यासोबत खेळताना भावुक झाले कार्यकर्ते

**वर्धा/ जनमाध्यम**

आकोली-जामनी येथे गुणवंत विद्यार्थिनीच्या सत्कारासाठी जात असताना खासदार अमर काळे यांनी राजकारणापलीकडील माणुसकीचे दर्शन घडवत कार्यकर्त्या संगीता धुरट यांच्या घरी अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान घडलेला एक हृदयस्पर्शी प्रसंग उपस्थितांच्या मनाला चटका लावून गेला.

घरातील चिमुकले बाळ पाहताच खासदारांनी कोणताही औपचारिकपणा न ठेवता त्याला प्रेमाने कडेवर घेतले. काही क्षणांसाठी राजकीय कार्यक्रम, भाषणे आणि गडबड विसरून ते त्या निष्पाप बाळासोबत हसत-



खेळत रमून गेले. सुमारे पाच मिनिटे सुरू असलेला हा जिव्हाळ्याचा क्षण पाहून उपस्थित कार्यकर्त्यांनाही आश्चर्याचा सुखद धक्का बसला.सामान्य कार्यकर्त्यांच्या घरात जाऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा लोकप्रतिनिधी पाहून गावकऱ्यांनीही समाधान व्यक्त केले. पद मोठे झाले तरी माणुसकी विसरली नाही, अशा भावना उपस्थितांमध्ये उमटल्या.यावेळी अभ्युदय मेघे, संजय काकडे, विजय घवघवे, प्रमोद काकडे, बालू वरकड, अविनाश अंबूलकर, कैलास बुधबावरे, राजू झाडे, विशाल गोमासे, साहेबराव चोपडे,

विष्णु ठाकरे, रमेश काकडे, सुनील काकडे, सचिन गोमासे, अरुण इंगोले, बाबा जाधव, बंडू पाळेकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. खासदारांच्या या साध्या पण मनाला भिडणाऱ्या कृतीने उपस्थितांच्या डोळ्यांत कौतुक तर ओठांवर एकच शब्द उमटला हीच खरी लोकप्रतिनिधी आणि जनतेतील नात्याची ऊब!

# शिक्षणही महागाईच्या विळख्यात!

## पुस्तकांपासून दप्तरापर्यंत दरवाढीचा पालकांना जबर फटका

**आर्वी/ जनमाध्यम**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या उंबरठ्यावरच महागाईने पालकांच्या खिशाला कात्री लावली आहे.

इंधन दरवाढ, वाढलेला वाहतूक खर्च आणि कच्च्या मालाच्या किंमतीतील वाढ यामुळे शालेय साहित्याच्या दरात १० ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली असून शिक्षणाचा खर्च आणखी वाढला आहे. पुस्तकांपासून वह्या, दप्तर, पेन, पेन्सिल आणि चित्रकला साहित्यापर्यंत सर्वच वस्तूंवर महागाईची छाया पडली आहे.

विशेष म्हणजे अनेक साहित्यांच्या छापील किमती कायम असल्या तरी त्यावरील सवलतीत मोठी कपात झाल्याने पालकांना प्रत्यक्षात अधिक पैसे मोजावे लागत आहेत. गेल्या काही वर्षांत सराव संच आणि अभ्यासक्रमपूरक पुस्तकांवर मिळणारी सवलत यंदा अनेक ठिकाणी पूर्णपणे बंद झाली आहे. वह्यांवरील २० ते २५ टक्के सवलत घटून अवघ्या १० टक्क्यांवर आली आहे.व्यापाऱ्यांच्या मते, आखाती युद्धामुळे कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून कागद व



प्लास्टिकजन्य साहित्याच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे पूर्वी सारख्या सवलती देणे शक्य नसल्याचे ते सांगत आहेत.दरम्यान, आधीच घरगुती खर्च, वीजबिल, इंधन आणि दैनंदिन गरजांच्या वाढत्या किंमतींनी त्रस्त असलेल्या पालकांसमोर आता मुलांच्या शिक्षणाचा खर्चही मोठे आव्हान बनला आहे. मुलांना शिकवायचे कसे आणि वाढता खर्च भागवायचा कसा असा प्रश्न अनेक पालकांकडून उपस्थित केला जात असून शिक्षण क्षेत्रालाही महागाईची झळ बसल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

# दारूच्या नशेत सुसाट वाहनचालकांना पोलिसांचा लगाम

## वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवरही धडक मोहीम

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली असून दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या चालकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. शुक्रवारी झालेल्या तपासणीत दोन वाहनचालकांच्या रक्तात अल्कोहोलचे प्रमाण आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेकडून ही मोहीम राबविण्यात येत आहे. वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अमोल लगड व त्यांच्या पथकाने पेट्रोलिंगदरम्यान विविध वाहनांची तपासणी केली.तपासणीदरम्यान मंगेश श्रीधरराव काचोळे (रा. गाडगेनगर मसाळा, वर्धा) यांच्यात अल्कोहोलचे प्रमाण आढळले. तसेच रमेश रामदास



गुरव (रा. केजाजी चौक, वर्धा) यांच्यात अल्कोहोल आढळून आले. दोघांविरुद्ध मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अन्वये दारू पिऊन वाहन चालविल्या प्रकरणी कारवाई करण्यात आली.दरम्यान, जिल्हाभर सुरू असलेल्या विशेष मोहिमेत हेल्मेटविना दुचाकी चालविणे, विनापरवाना वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे तसेच सीटबेल्टचा वापर न करणे अशा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवरही कारवाईचा धडाका सुरू आहे.वर्धा जिल्ह्यात अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याने वाहतूक पोलिसांनी नियमभंग करणाऱ्यां विरुद्ध शून्य सहनशीलतेचे धोरण स्वीकारले आहे. दारूच्या नशेत वाहन चालविणे हे अनेक भीषण अपघातांचे प्रमुख कारण ठरत असल्याने अशा चालकांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी वाहनात सीटबेल्ट बांधावा, मद्यपान करून वाहन चालवू नये तसेच सर्व वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखेकडून करण्यात आले आहे. सुरक्षित प्रवास आणि अपघातमुक्त वर्धासाठी नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षाही पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# ३५ वर्षांच्या संघर्षाला न्याय मिळणार





## 'पट्ट्यांच्या' आशेने गोरगरिबांच्या डोळ्यांत पुन्हा उजेड

**मोझरी (शेकापूर)/ जनमाध्यम**

तीन दशकांहून अधिक काळ स्वतःच्या घराच्या हक्कासाठी झगडणाऱ्या मोझरी (शेकापूर) येथील अतिक्रमणधारक कुटुंबांच्या आशा अखेर पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या मासिक बैठकीत अतिक्रमणधारकांचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्याने गोरगरिबांच्या संघर्षाला न्याय मिळण्याची शक्यता बळावली आहे.मागील ३५ वर्षांपासून दोन डझनहून अधिक कुटुंबे गावठाण व महसूल जागेवर वास्तव्यास आहेत. मात्र मालकी हक्काचे पट्टे नसल्यामुळे ही कुटुंबे आजही सरकारी योजनांपासून, विशेषतः घरकुल योजनेपासून वंचित आहेत. स्वतःचे घर असावे, मुलांना सुरक्षित छप्पर मिळावे, या साध्या स्वप्नासाठी अनेकांनी आयुष्य घालवले पण प्रशासनाच्या दारात त्यांची केवळ फरफटच झाली.

अखेर तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी अतिक्रमणधारकांचे प्रस्ताव मागविल्याने आशेचा किरण दिसू लागला आहे. आमदार राजेश बकाने यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने हालचाल सुरू केल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे झुडपी व वनविभागाच्या जागेवरील कुटुंबांनाही न्याय मिळावा यासाठी नव्याने प्रस्ताव सादर करण्याच्या हालचाली सुरू झाल्याची माहिती आहे.तीन दशकांपासून टिनाच्या घरात संसार मांडला आहे. सरकारने पट्टा दिला तर घरकुलाचे स्वप्न पूर्ण होईल, अशी व्यथा अतिक्रमणधारक सुरेश कांबळे यांनी व्यक्त केली.आता प्रश्न एकच आहे, वर्षानुवर्षे न्यायासाठी भटकणाऱ्या या गोरगरिबांच्या डोक्यावर हक्काचे छप्पर उभे राहणार की पुन्हा आश्वासनांचाच पाऊस पडणार जिल्हा प्रशासन आणि शासनाच्या निर्णयाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १८३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# कांडलीतील तुंबलेल्या नाल्या व काटेरी झुडपांमुळे नागरिक धास्तावले

## -सामाजिक कार्यकर्त्या मुन्नी बेलकर यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** पावसाळा तोंडावर असताना अचलपूर तालुक्यातील कांडली येथील एकता नगर झोपडपट्टी परिसरात स्वच्छतेच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या असून, तुंबलेल्या नाल्या व सार्वजनिक ठिकाणी वाढलेल्या काटेरी झुडपांमुळे नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या मुन्नी श्याम बेलकर यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना लेखी निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, एकता नगर परिसरातील बहुतांश नाल्या गाळाने पूर्णपणे भरून गेल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्यात नाल्यांमधील पाणी रस्त्यांवरून वाहण्याची शक्यता असून, मुसळधार पाऊस झाल्यास झोपडपट्टीतील अनेक घरांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान होऊ शकते. या परिसरात प्रामुख्याने हातावर पोट असलेले गोरगरीब नागरिक वास्तव्यास असल्याने त्यांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



तसेच परिसरात जागोजागी काटेरी झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली असून, पावसाळ्यात पाणी साचल्याने ही झुडपे दिसत नाहीत. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरात अस्वच्छता वाढल्यामुळे साप व इतर विषारी किटकांचा वावरही वाढला असून, जवळच शाळा असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

रोगराईचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीच प्रशासनाने सर्व नाल्यांमधील गाळ काढून स्वच्छता मोहीम राबवावी तसेच सार्वजनिक ठिकाणी वाढलेली काटेरी झुडपे तातडीने हटवावीत, अशी मागणी मुन्नी बेलकर यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी, पंचायत समिती अचलपूर तसेच ग्रामपंचायत कांडलीचे सचिव व सरपंच यांनाही पाठविण्यात आल्या असून, पावसाळ्यापूर्वी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा परिसरातील रहिवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### ३१ मे २०२६ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विशेष लेख

# महाराष्ट्राची लोकमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक थोर संत, समाजसुधारक आणि आदर्श राज्यकर्त्यांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. त्या तेजस्वी परंपरेतील एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. लोककल्याण, न्यायप्रियता, धर्मपरायणता आणि सक्षम प्रशासन यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच इतिहासाने त्यांना 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' ही उपाधी बहाल केली.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी अहिल्यादेवींना धार्मिक, नैतिक आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण दिले. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये करुणा, परोपकार आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. असे सांगितले जाते की, मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी एका मंदिरात लहान अहिल्यादेवींना भक्तिभावाने पूजा करताना पाहिले आणि त्यांच्या गुणांनी प्रभावित होऊन आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्या माळवा प्रांतातील होळकर घराण्यात आल्या. त्यांचे वैवाहिक जीवन इंदूर आणि महेश्वर परिसरात गेले.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती खंडेराव यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. या मोठ्या दुःखातून सावरत त्यांनी राज्यकारभाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यसत्ता चालवणे हे अत्यंत कठीण मानले जात होते; परंतु अहिल्यादेवींनी आपली बुद्धिमत्ता, धैर्य आणि प्रशासनकौशल्याने संपूर्ण माळवा प्रदेश सक्षमपणे सांभाळला.

सन १७६७ ते १७९५ या काळात त्यांनी राज्यकारभार केला. त्यांची राजधानी महेश्वर येथे होती. त्यांच्या प्रशासनात प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत आणि त्वरित न्याय देत. गरीब, शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.त्यांच्या न्यायप्रियतेविषयी अनेक कथा प्रसिद्ध आहेत. न्यायदान करताना त्यांनी कधीही पक्षपात केला नाही. स्वतःच्या नातलगांविरुद्धही त्यांनी न्यायाच्या तत्त्वांनुसार निर्णय दिले. त्यामुळे प्रजेमध्ये त्यांच्या विषयी अपार आदर निर्माण झाला. 'राज्यकर्त्याने प्रजेच्या सुखासाठी काम केले पाहिजे' हा त्यांचा मूलमंत्र होता.

अहिल्यादेवींची ओळख केवळ एक सक्षम प्रशासक म्हणून नाही, तर लोककल्याणकारी आणि धर्मपरायण राज्यकर्ती म्हणूनही आहे. त्यांनी भारतभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरुंसाठी निवासस्थाने बांधली. उत्तर ते दक्षिण भारतापर्यंत त्यांच्या दानशूर कार्याचा ठसा दिसून येतो. लोकांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, यात्रेकरुंना पाणवठा असा सर्वंकष विचार करुन त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया देशाच्या विविध भागात बांधल्या. ज्या काळात प्रदेशाप्रदेशात विभागणी होती त्या काळात 'बंधुता' पेरण्याचे काम तत्कालीन भारतात त्यांनी केले. त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान दिले. तसेच




सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, द्वारका, रामेश्वरम, अयोध्या आणि हरिद्वार यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या. वाराणसीतील अनेक घाट आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. राज्यात व्यापार आणि शेतीला चालना मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, बाजारपेठा आणि सुरक्षाव्यवस्था यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे माळवा प्रदेश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला थारा नव्हता.

अहिल्यादेवींचा करारीपणा आणि धाडसी नेतृत्व अनेक प्रसंगांत दिसून आले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. शत्रूंना पराभूत करताना त्यांनी धैर्य आणि रणनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. स्त्री नेतृत्वाविषयी असलेल्या समाजातील मर्यादित कल्पना त्यांनी आपल्या कार्यातून मोडून काढल्या.

भारतीय इतिहासात त्यांच्या समकालीन अनेक प्रभावी महिला होऊन गेल्या. परंतु लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक कार्य यांच्या समन्वयामुळे अहिल्यादेवींचे स्थान विशेष मानले जाते.

अहिल्यादेवींना 'पुण्यश्लोक' ही उपाधी देण्यात आली कारण त्यांनी आपल्या प्रजेला दुःखातून मुक्त करुन सुखी करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या राज्यकर्त्यालाच 'पुण्यश्लोक' म्हटले जाते. त्यांच्या कार्यामुळेच त्या आजही लोकांच्या मनात 'लोकमाता' म्हणून जिवंत आहेत.

महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याचा गौरव विविध प्रकारे केला आहे. त्यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण 'अहिल्यानगर' असे करण्यात आले. १३ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त चोंडी येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या जतन संवर्धनासाठी कोट्यवधीचा निधी दिला आहे. केंद्र शासनाने त्यांच्या ३०० व्या जयंतीला विशेष डाक तिकीट काढले. राज्य शासनाने पुण्यश्लोक ३०० हा विशेष लोगो प्रकाशित केला आहे.

आज महाराष्ट्र शासन त्यांच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वांनुसार सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. महिलांचे सक्षमीकरण, उद्योग, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना-**

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' ही महाराष्ट्रातील महिलांना उद्योग आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे आणि नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे हा आहे.या योजनेअंतर्गत महिलांना: स्टार्टअप व्यवसायासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा, उद्योग उभारणीसाठी सल्ला, नवउद्योजकांना प्रोत्साहन अशा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचा आदर्श राज्यकारभार आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक मानला जातो. लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

**-प्रवीण टाके,**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
९७०२८५८७७७

# गरीब नवाज फर्निचर वर्कला भीषण आग

## -हजारो रुपयांचा माल जळून खाक -सुदैवाने जीवितहानी टळली

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील अकोट मार्गालगत आदर्श हायस्कूलसमोरील गरीब नवाज फर्निचर वर्क येथे आज (दि.३०) ला सायंकाळी सात वाजताच्या दरम्यान अचानक आग लागली. या आगीत फर्निचर साहित्य व इतर वस्तूंसह लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. आग आटोक्यात आणण्यासाठी नगरसेवक रोशन कट्यारमल सह स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत शर्थीचे प्रयत्न केले. तसेच दर्यापूर नगर परिषदेकडून अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणेकडून तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

# अवैध गावठी दारू अड्ड्यांवर फ्रेजरपुरा पोलिसांचा छापा

## १,८२० लिटर मोहाचा सळवा, ८० लिटर गावठी दारू नष्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात अमरावती शहर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडाळी पारधीबेडा, राजुरा पारधीबेडा आणि परिहारपुरा परिसरात धडक कारवाई केली. या कारवाईत चार अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून तब्बल १,८२० लिटर मोहाचा सळवा, ८० लिटर गावठी दारू, फायबरचे ड्रम व दारू निर्मितीचे साहित्य असा एकूण १ लाख १ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार अवैध व्यवसाय, गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार ३० मे रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट व पोलीस निरीक्षक निलेश गावंडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने संयुक्त कारवाई केली. वडाळी पारधीबेडा येथील कृष्णाबाबू देविदास भोसले (वय ५६) यांच्या ताब्यातून ७२० लिटर मोहाचा सळवा, ४० लिटर गावठी दारू व दारू निर्मितीचे साहित्य जप्त करून सुमारे ४० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

त्याच परिसरातील नर्सेना अनुप भोसले (वय ३०) हिच्याकडून ३४० लिटर मोहाचा सळवा, १५ लिटर गावठी दारू व साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईत १९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. परिहारपुरा येथील संतोष भिमराव मोहकर (वय ४२) याच्याकडून ३०० लिटर मोहाचा सळवा, १५ लिटर गावठी दारू व साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणात १७ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. तर राजुरा पारधीबेडा येथील सुरशिला सुरसेल पवार (वय २२) हिच्याकडून ४६० लिटर मोहाचा सळवा, १० लिटर गावठी दारू व दारू निर्मितीचे साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईत २४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. : १२१ / २०२६ नेमलेली तारीख :- १६-०६-२०२६

**१. सुनिता प्रकाश खाटेकर**
**२. वैभव प्रकाशराव खाटेकर**
**३. प्रिया प्रकाशराव खाटेकर**
सर्व रा. लोणी टाकळी, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, मयत **प्रकाश जुंजारामजी खाटेकर** यांचा मृत्यु दि. २०.०५.२०२५ मध्ये **सोनोने हॉस्पीटल, अमरावती जि. अमरावती** येथे झाला मयताचे **अर्जदार क्र. १ हे पती, अर्जदार क्र. २ हा मुलगा तर अर्जदार क्र. ३ ही मुलगी** आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेरा सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेवर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फट हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाबी सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांकः २३ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती** **एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# आ.संजय खोडके यांची सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे आकस्मिक भेट

## प्रशासनाची उडाली तारांबळ,असुविधेबाबत नागरिकांनी मांडल्या समस्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे रुग्णसेवेसंदर्भातील असुविधांबाबत महाराष्ट्र विधानपरिषद आमदार संजय खोडके यांनी आज शनिवार दिनांक ३० मे रोजी दुपारी ०१.३० वाजता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे आकस्मीक भेट दिली असता प्रशासनामध्ये तारांबळ उडाली.

विभागाचे पाचही जिल्हासाठी आरोग्य वरदान ठरणाऱ्या अमरावती स्थित सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथील आरोग्य सेवांचा विस्तार व बळकटी मिळत असतांना सुद्धा रुग्णांची गैरसोय होत असून असुविधांनी कळस गाठला असल्याच्या तक्रारी समोर येत आहे. त्यापार्श्वभूमीवर आ. संजय खोडके यांनी हॉस्पिटलच्या वार्डमध्ये जाऊन रुग्णाशी संवाद साधला. यावेळी रुग्णांच्या नातेवाईकांनी सुद्धा आपल्या कैफियत मांडत असतांना हॉस्पिटलमधील स्वच्छता व असुविधांबाबत आमदार खोडके यांना अवगत केले.



यावेळी हॉस्पिटल प्रशासनाकडून आरोग्य सुविधांचा आढावा घेत असतांना अनेक बाबींमध्ये अनियमितता दिसून आल्याने आमदारांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. रुग्णांना आरोग्याच्या दृष्टीने सर्व शासकीय सुविधा पुरविणे हे आरोग्य यंत्रणेचे कर्तव्य आहे. त्यामुळे रुग्णाच्या आरोग्याशी हयगय खपवून घेणार नसून प्रशासनाने दिरंगाई व कुचराई केल्यास कठोर पाऊले उचलणार असल्याचा अल्टिमेटम सुद्धा आ.संजय खोडके यांनी दिला. यावेळी सुपर स्पेशालिटीमध्ये मानधनावर अतिविशिष्ट सेवा देणारे डॉक्टर, तसेच कंत्राटी परिचारिका व आरोग्यसेवक यांनी सुद्धा आपल्या समस्या आमदारांपुढे व्यक्त केल्या. यावर सुद्धा हॉस्पिटल प्रशासनाने उपाययोजना करण्यासंदर्भात आ.संजय खोडके यांनी सूचना केली.

**जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**मा. विजय जी. परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) भातकुली, जि अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी. कमांक- १७३/२०२६ ने.ता. २४/०६/२०२६

**अर्जदार : 1-Shahenaz Bano Sheikh Muslim,** Age- 60 yrs, Occu-Housewife, **2-Mohammad Mosin Mohammad Muslim,** Age- 45 yrs, Occu- Labour, **3-Sheikh Wasim Sheikh Muslim,** Age- 35 yrs, Occu- Labour, Applicant No. 1 to 3 are R/o. Asara, Tq. Bhatkuli, Dist. Amravati. **4-Shekh Mohin Sheikh Muslim,** Age-35 yrs, Occu- Govt. Service, R/o. Asara Kholapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati. 5-Nagma Wahid Beg, Age- 30 yrs, Occu- Housewife, R/o. Rinmochan, Post. Amla Tq. Bhatkuli, Dist. Amravati.

**विरुध्द- गैरअर्जदार - निरंक**

ज्यापेक्षा **Mohd. Muslim Sk. Isa** के दि. १४/११/२००९ रोजी मयत झाले, अर्जदार **Shahenaz Bano Sheikh Muslim, Age- 60 yrs, Occu-Housewife, R/o. Asara, Tq. Bhatkuli, Dist. Amravati.** व इतर यांनी बॉम्बे रेग्यूलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि. ०५/०५/२०२६ रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Mohd. Muslim Sk. Isa** यांचे वारस **Mohd. Muslim Sk. Isa** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या आहेत ते सदरछु अर्जदार पक्त ममत जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावीत. तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहु अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्या नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि. १५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे

शिक्का
**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**(कनिष्ठ स्तर) भातकुली**

**जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**मा. विजय जी. परवरे, दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) भातकुली, जि अमरावती यांच्या न्यायालयात**

आर एम जे. सी कमांक १७२/२०२६ ने.ता. -२४/०६/२०२६

अर्जदार : **1-Sheikh Arif sheikh Isa,** Age- 59 yrs, Occu- Labour, R/o. Asara, Tq. Bhatkuli, Dist. Amravati. **2-Rahisa Bi Sk Subhan,** Age- 72 yrs, Occu- Housewife, R/o. Kha Sahab Pura, Juni Basti, Kurankhed Akola. **3-Shahnaj Bi Shekh Zamir,** Age-51 yrs, Occu-Housewife, R/o. Mirza Plot, Hiwarkhed, Post. Hiverkhed Ruprao Dist. Akola. 4-Shahenaz Bano Sheikh Muslim, Age- 60 yrs, Occu-Housewife, **5-Mohammad Mosin Mohammad Muslim,** Age- 45 yrs, Occu- Labour, **6-Sheikh Wasim Sheikh Muslim,** Age- 35 yrs, Occu- Labour, Applicant no. 4 to 6 are R/o. Asara, Tq. Bhatkuli, Dist. Amravati. **7-Shekh Mohin Sheikh Muslim,** Age-35 yrs, Occu- Govt. Service, R/o. Asara Kholapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati. **8-Nagma Wahid Beg,** Age- 30 yrs, Occu-Housewife, R/o. Rinmochan, Post. Amla, Tq. Bhatkuli, Dist. Amravati.

**विरुध्द- निरंक -गैरअर्जदार**

ज्यापेक्षा **Shekh Isa Shekh Musa** हे दि. ३०/०९/१९९६ रोजी मयत झाले. आणि **Khurshid Bi Shekh Isa** हे दि. २९/०७/२०१४ रोजी मयत झाले, अर्जदार **Sheikh Arif sheikh Isa, Age-59 yrs, Occu- Labour, R/o. Asara, Tq. Bhatkuli, Dist. Amravati.** व इतर यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि. ०५/०५/२०२६ रोजी अर्ज केला आहे या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Shekh Isa Shekh Musa DeeefCe Khurshid Bi Shekh Isa यांचे वारस आहेत. ते सदरतु अर्जदार फक्त मयत **Shekh Isa Shekh Musa DeeefCe Khurshid Bi Shekh Isa** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दालल करावीत. तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरतु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरतु अर्जदारांना ममताचे वारस म्हणुन घोषित करण्यात येईल आणि त्या नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज दि. १५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे

शिक्का
**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) भातकुली**

**जाहीर नोटीस.**

१-३ सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, श्री. श्रावण लक्ष्मण रणबावळे, रा. भट्टड लेआउट, तुलसी नगर, मुर्तीजापुर, ता. मुर्तीजापुर, जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील शहर मुर्तीजापुर, ता. दु. निं. मुर्तीजापुर, जि नो. जि. अकोला यांच्या हद्दीतील नझुल प्लॉट क्र.१-३/५ शिट नं. १७ ज्याचे क्षेत्रफळ १८७चौ. मी. (२०१२ चौ.फुट) येथील घर ज्याचे दि. २१/०१/२००२ नुसार अंतिम मंजुरी मिळालेले व वि. अप्पर जिल्हाधिकारी साहेब अकोला यांनी त्यांचे फाईलावरील ज्याचा रा.मा.क्र.एन.ए.पी. ३४/मुर्तीजापुर/६-९९-२००० नुसार लेआऊट ५ कन्व्हर्शन मंजुर झालेल्या जागेतील प्लॉट ज्याची चर्तुः सिमाः-
पुर्वेस :- ९ मी. रुंदीचा रोड,
पश्चिमेस :- तिडके लेआऊट
उत्तरेस :- लेआऊट प्लॉट नं. ४,
दक्षिणेस :- लेआऊट प्लॉट नं. ६
सदर वर्णनीत मालमता ज्याचे नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५०४/२००४, दि. ०१/०३/२००४. वरील मालमत्तेचे मुळ खरेदीखत अमरावती, ता. जि. अमरावती येथे जात असतांना दि. २७/०५/२०२६ रोजी सकाळी ०१.३० वाजताच्या दरम्यान मुर्तीजापुर हद्दीत हरवले आहेत. त्याबाबत श्री. श्रावण लक्ष्मण रणबावळे, मालमत्ता धारक पोलिस स्टेशन मुर्तीजापुर, ता. मुर्तीजापुर, जि. अकोला येथे रितसर तक्रार दाखल केलेली आहे. तसेच दस्तऐवजांचा आजपर्यंत शोध लागलेला नाही. सदर प्लॉटचे मालक यांनी युनियन बँक यांच्याकडे गृहकर्ज मिळण्याकीरता मागणी अर्ज दाखल केलेला आहे. सबब वर उल्लेखीत मालमत्तेत कुणाचाही हक्क, गहाण, कर्ज, बोजा किंवा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास ती नोटीस मिळाल्यापासुन ७ दिवसात खालील पत्यावर संपर्क करावा अथवा आमची बँक कर्ज मागणी अर्ज मंजुर करुन कर्ज पुरवठा केल्यास त्यानंतर कुणाचाही उजर चालणार नाही. तरी सर्व लोकांना विनंती आहे की, वरील वर्णनीत मालमत्तेच्या खरेदीखताच्या अस्सल प्रती / दस्तऐवज कुण्याही व्यक्तीला आढळल्यास कृपया खाली नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क साधाव्यात अथवा खाली नमुद पत्यावर आणुन द्याव्यात.

स्वाक्षरीत :-
**ॲड. रेणुका एस कडु,**
मो. क्र. ७४९८४४५४९९ पत्ता :- शिवार्पण कॉलनी,
कठोरा नाका, अमराव ता. जि. अमरावती.

# लाडक्या बहिणींना मोठा धक्का!




## जिल्ह्यातील १ लाख २१ हजार महिलांना डच्चू

**अमरावती/का.प्र.**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत अटी आणि नियमांच्या नावाखाली दुसऱ्यांदा लाभार्थी महिलांना प्रशासना कडून डच्चू देण्यात आला आहे. एका कुटुंबातील केवळ एकाच महिलेला लाभ, वयोमर्यादा, घरात चारचाकी वाहन आणि केवायसी मधील त्रुटी अशा विविध कारणांमुळे अनेक महिलांना या योजनेतून अपात्र ठरवून लाभाच्या कक्षेतून बाहेर काढण्यात आले आहे. पहिल्या टप्पात २१ वर्षांपेक्षा कमी आणि ६५ वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील १२ हजार ३५१ महिलांसह एकूण ६६ ठरव हजार ८१८ महिलांना अपात्र ठरवण्यात आले होते. आता दुसऱ्या टप्प्यात ५५ हजार महिला लाभार्थी अपात्र ठरवण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे जिल्ह्यातील एकूण १ लाख २१ हजार ८१८ लाडक्या बहिणींना या योजनेतून बाहेर काढत त्यांना मिळणारा लाभ बंद करण्यात आला आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या या योजनेत समाविष्ट असलेल्या लाडक्या बहिणींची आता सरकारी स्तरावर सखोल तपासणी केली जात आहे. योजनेचा आर्थिक भार अन्य विभागांवर असल्यामुळे अपात्र लाभार्थींना यादीतून वगळण्याचे काम सुरू झाले आहे. अमरावती जिल्ह्यात या योजनेसाठी एकूण ७ लाख २० हजार ५७५ महिलांनी अर्ज केले होते. त्यापैकी २२ हजार ४७२ अर्ज बाद करत ६ लाख ९८ हजार १०३ महिलांना पात्र मानून लाभ देणे सुरू झाले होते. निवडणुकीपूर्वी सर्व महिलांना अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले विधानसभा होते, मात्र आता दिवसेंदिवस नियमांचे निकष लावत लाभार्थी महिलांची संख्या कमी केली जात आहे. अमरावती जिल्ह्यात एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त महिला या योजनेचा लाभ घेत असल्याचे तपासणी दरम्यान समोर आले आहे. एका कुटुंबात दोन लाभार्थी महिला असल्यास एक विवाहित आणि एक अविवाहित असणे आवश्यक असताना, या निकषाची पूर्तता न करणाऱ्या सर्वाधिक ४९ हजार ४९३ लाडक्या बहिणींना योजनेच्या कक्षेतून बाहेर करण्यात आल्याची माहिती महिला व बाल कल्याण विभागाच्या सूत्रांनी दिली आहे. मार्च आणि एप्रिल महिन्याचा लाभ लाभार्थी महिलांना मिळणे अपेक्षित असताना मे महिन्यात लाभार्थीच्या खात्यात ३-३ हजार रुपयांचे अनुदान जमा होण्यास सुरुवात झाली. परंतु अनेक लाभार्थी महिलांच्या खात्यात अनुदान जमा न झाल्यामुळे महिलांनी आता महिला व बाल विकास विभागाचे उंबरठे झिजवण्यास सुरुवात केली आहे.

**चारचाकी वाहनांचा अडसर**

चारचाकी वाहन असलेल्या ५ हजार ९९२ लाडक्या बहिणींची यादी सरकारने महिला व बाल विकास विभागाकडे सोपवली जी आरटीओ कार्यालयाकडे तपासणीसाठी पाठवण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ७०७होती, महिलांच्या नावावर चारचाकी वाहन असल्याचे स्पष्ट होताचे त्यांना लाभार्थी यादीतून तत्काल बाहेर करण्यात आले आहे.

## उष्णतेने कपाशी लागवडीला फटका

**अमरावती** - जिल्ह्यात दरवर्षी मेच्या शेवटच्या आठवड्यात किमान एक हजार हेक्टरमध्ये कपाशीची लागवड होते. यावर्षी मात्र १५ दिवसांपासून उष्णतेची लाट असल्याने कपाशी लागवडीला फटका बसला आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या मान्सूनपूर्व पावसानंतर या पेरण्यांना गती मिळण्याची शक्यता आहे. धामणगाव रेल्वे तालुक्यात मान्सूनपूर्व कपाशी लागवड, तर धारणी तालुक्यात धूळवाफ पेरणी केली जाते. याशिवाय इतरही तालुक्यांतील काही मोजके बागायतदार शेतकरी मान्सूनपूर्व कपाशी लागवड करतात. यंदा मात्र दोन आठवड्यांपासून असलेल्या उष्णतेच्या लाटेत कपाशीचे बीजांकुर करपण्याची भीती असल्याने अशा पद्धतीची लागवड करण्याची जोखीम सध्या कोणताही घेण्यास तयार नसल्याचे वास्तव आहे.

# संक्षिप्त

## डॉ. दिनेश दातार यांना पीएच.डी. प्रदान

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत संगणक शास्त्र व अभियांत्रिकी विषयात संशोधन कार्य यशस्वीरीत्या पूर्ण करून डॉ. दिनेश श्रावण दातार यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. डॉ. दातार यांचा संशोधन विषय 'Classification and Impact Analysis of Brain Signal Responses Using Machine Learning Techniques' हा होता.



मेंदूच्या संकेतांचे वर्गीकरण व त्यांचा प्रभाव यांचे मशीन लर्निंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विश्लेषण करण्यावर आधारित हे संशोधन असून ते आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी उपयुक्त मानले जात आहे.हे संशोधन डॉ. आर. एन. खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. तसेच संगणक शास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. मोहम्मद अतिक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संशोधन प्रबंधाचे मूल्यमापन रेवा विद्यापीठ, बेंगळुरू येथील प्रा. डॉ. अरविंद कापसे यांनी केले.या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा नियंत्रक डॉ. नितीन कोळी तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच. आर. देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.डॉ. दिनेश दातार यांनी यापूर्वी बी.ई., एम.टेक., एम.बी.ए. आणि एल.एल.बी. या पदव्या संपादन केल्या असून पीएच.डी. ही त्यांची पाचवी पदवी आहे. त्यांच्या या यशाबद्दल वडील,आई,पत्नी,बहीण यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## डॉ. सोनाली तायडे यांना शारीरिक शिक्षण विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

**अमरावती** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे शारीरिक शिक्षण विषयामध्ये डॉ.सोनाली श्रीधरराव हरणे (सद्यःस्थितीत डॉ. सोनाली सुयोग तायडे) यांना आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशामुळे शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्यांच्या संशोधनाचा विषय 'A Comparative Study of the Level of Stress and Anxiety Experienced by Judo and Wrestling Players Before Competition and Its Effect on Their Sports Performance' असा होता.



हे संशोधन त्यांनी श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथील प्रा. डॉ. पी. एस. सायर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण केले.डॉ. सोनाली तायडे या सध्या अमरावती येथील सेंट झेविअर कॅथेड्रल स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. या यशाचे श्रेय त्यांनी सेंट झेविअर कॅथेड्रल स्कूलचे मुख्याध्यापक फादर नेल्सन, सिस्टर रिबेका, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. पी. एस. सायर, आई-वडील, सासू-सासरे, कुटुंबीय, शिक्षकवृंद, सहकारी व मित्रपरिवार यांना दिले आहे.शैक्षणिक संशोधन, अध्यापन आणि क्रीडा क्षेत्रात एकाच वेळी उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या डॉ. सोनाली तायडे यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या यशामुळे अमरावतीच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# आचारसंहितेमुळे जून महिन्यातील विभागीय व महिला लोकशाही दिन रद्द

**अमरावती/का.प्र.**
महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे, आगामी जून २०२६ महिन्यातील 'विभागीय लोकशाही दिन' आणि 'महिला विभागीय लोकशाही दिन' आयोजित करण्यात येणार नाही, अशी माहिती विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या शासन परिपत्रकानुसार दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन, तसेच महिला विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. या दिवशी नागरिक व महिला आपल्या तक्रारी व समस्या थेट प्रशासनासमोर मांडतात.

परंतु,भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या १८ मे २०२६ च्या प्रसिद्धीपत्रकानुसार सध्या राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू आहे. शासन परिपत्रकातील तरतुदी नुसार, ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीची आचारसंहिता लागू असते, त्या ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करता येत नाही. या कायदेशीर तरतुदीचा दाखला देत प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जून २०२६ मध्ये अमरावती विभागातील विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिन आयोजित करता येणार नाही. तरी सर्वसामान्य नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# पी.एम.किसान लाभार्थ्यांसाठी ३० जुनपुर्वी ई-केवायसी अनिवार्य

**शिराळा/वार्ताहर**
प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी.एम.किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या अमरावती तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांसाठी वार्षिक ई-केवायसी प्रक्रिया ३० जुन २०२६ पुर्वी पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे.योजनेत पारदर्शकता राखणे गैरप्रकार रोखणे आणि पात्र लाभार्थ्यांनाच अनुदान मिळावे या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे.

ई-केवायसी न केल्यास हप्ता थांबण्याची शक्यता.तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या माहितीनुसार सन २०२५-२६ आर्थिक वर्षासाठीची ई-केवायसी निश्चित मुदतीत पूर्ण न करणा-




या लाभार्थींना पुढील हप्तापासुन वंचित राहावे लागु शकते. तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने यांनी शेतकऱ्यांना तातडीने प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. ई-केवायसीसाठी शेतकऱ्यांना दोन पर्याय उपलब्ध आहेत.लाभार्थी जवळच्या सामाईक सेवा केंद्रावर जावुन बायोमेट्रिक पद्धतीने प्रमाणीकरण करू शकता. तसेच पी.एम.किसान मोबाईल ॲपव्दारे फेस ऑर्थेटेकेशन प्रणालीचा वापर करूनही प्रक्रिया पुर्ण करता येणार आहे. वृध्द व दिव्यांग शेतकऱ्यांसाठी विशेष सुविधा वृध्द दिवांग किंवा आजारी शेतकऱ्यांना केंद्रावर जाणे शक्य नसल्यास विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.व्हिलेज नोडल अधिकारी आणि क्षेत्रिय कर्मचारी प्रत्येक्ष भेट देवून फेस ऑर्थेटेकेशनच्या माध्यमातून ई-केवायसी पुर्ण करण्यासाठी मदत करणार आहेत.

जिल्हा नोडल अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी सर्व पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदत पुर्व ई- केवायसी पुर्ण करुन शासनाच्या योजनेचा लाभ अखंडीत सुरू ठेवावा असे आवाहन केले आहे.

## काँग्रेसचे इंधन महागाईविरोधात

# मेलोडी चॉकलेट वाटून उपरोधिक आंदोलन



**तिवसा/वार्ताहर**
केंद्र सरकारकडून पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस सिलेंडर तसेच रासायनिक खतांच्या सतत वाढत असलेल्या दरवाढीच्या निषेधार्थ तिवसा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तिवसा तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार मार्फत शासनाला निवेदन सादर करण्यात आले.केंद्र सरकारने एका महिन्यात चार वेळा पेट्रोल व डिझेलच्या दरामध्ये वाढ केल्याने सर्वसामान्य जनतेचे आर्थिक बजेट कोलमडले असून वाढत्या महागाईमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

या आंदोलनादरम्यान तिवसा येथील गॅस एजन्सीसमोर लागलेल्या रांगेतील नागरिकांना प्रतीकात्मक स्वरूपात 'मेलोडी' चॉकलेट वाटप करून केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यात आला. 'महागाईने जनता त्रस्त, सरकार मात्र मस्त' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी शासनाच्या विरोधात रोष व्यक्त केला.यावेळी पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरच्या वाढलेल्या दरात तात्काळ कपात करावी, रासायनिक खतांच्या दरवाढीवर नियंत्रण आणावे तसेच वाढत्या महागाईवर शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली.हे आंदोलन तिवसा येथे शेकडो कार्यकर्ते व नागरिकांच्या उपस्थितीत पार पडले. आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष नगरसेवक वैभव वानखडे,बाजार समिती सभापती रवी राऊत, खरेदी विक्री संघ अध्यक्ष सुरेश मेटकर, प्रफुल देशमूख, शहर अध्यक्ष सेतू देशमूख, महिला काँग्रेस अध्यक्ष पूनम काळमेघ, मोहन वानखडे,अतुल गवड, रामभाऊ बोकडे, कार्याध्यक्ष सुनिल बाखडे, नगरसेवक योगेश वानखडे, राजेंद्र वानखडे, प्रमोद विघ्ने, दीपक पावडे, नगरसेवक किसन मुंदाणे, नगरसेवक अमर वानखडे, रितेश पांडव, नरेंद्र विघ्ने, गजानन भोंबे, पांडुरंग खेडकर, खरेदी विक्री संघ संचालक प्रमोद वानखडे, राजेश देशमूख, जसबीर ठाकूर, सूरज धूमनखेडे, प्रशांत प्रधान, सुनिल उतखेडे, दिलिप वानखडे , दिवाकर भुरभुरे ,अतुल खुळे, हरिदास भगत, सचिन वानखडे, प्रफुल गंधे, दिनेश वानखडे, वसंत जिरापुरे, सागर राऊत, सिद्धेश्वर जाधव, विनोद मसलदी, आशिष बायस्कर, अमोल पन्नासे, वैभव ठाकूर, अनिकेत बादशे, अनिकेत तालन, उमेश राऊत, प्रणव गौरखेडे, संजय चौधरी, गौरव चौधरी, वैभव काकडे, सुनिल सांभारे, अनंत शेंद्रे, आशिष ताथोडे, शुभम बोके, सर्जा वाघमारे, तुषार लेवटे, आकाश मकेश्वर, अनिकेत प्रधान, राज निकाळजे, आदेश वानखडे, आदर्श लांडगे, किशोर गेडाम आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृतीला चालना

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त ३१ मे रोजी देशभरात विविध उपक्रमांच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थांचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम आणि व्यसनातून बाहेर पडण्याची तीव्र गरज याबाबत जनजागृती करणे अत्यावश्यक आहे.

वाढत्या तंबाखू सेवनामुळे तरुण पिढीत निर्माण होणाऱ्या आरोग्यधोक्यांमुळे तज्ज्ञांनी इशारा दिला असून प्रतिबंधात्मक उपायांवर भर देण्याची मागणी होत आहे.स्थानिक आरोग्य कर्मचारी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील स्वयंसेवी गटांनी मिळून नागरिकांना तंबाखूचे व्यसन किती धोकादायक आहे याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. विशेषत: तरुण वर्ग, शालेय विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील नागरिक यांना उद्देशून प्रबोधनाचे प्रयत्न सुरू आहेत. तंबाखू सेवनामुळे कर्करोग, फुफ्फुसाचे आजार, हृदयरोग यांसारख्या गंभीर आजारांची वाढती उदाहरणे समोर येत असून त्याची दखल घेणे अत्यावश्यक बनले आहे.आरोग्य विभागाच्या मते, तंबाखूजन्य पदार्थांमुळे लाखो जणांचे अकाली मृत्यू होत असून, समाजाचे आर्थिक नुकसानही वाढत आहे. त्यामुळे व्यसनमुक्तीबाबत सातत्याने मोहीम




राबवणे आणि जनतेला उपलब्ध उपचार व समुपदेशनाची माहिती देणे ही काळाची गरज बनली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी शालेय परिसरात तंबाखू सेवन, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री व वापर पूर्णपणे बंद करण्याचे आदेश जारी. उल्लंघन करणाऱ्यांवर तत्काळ दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला असला तरी याचे पालण होतांना दिसत नाही.शाळा परिसर १०० मीटर अंतरात 'तंबाखूमुक्त क्षेत्र' घोषित करून निरीक्षण मोहीम सुरू; विद्यार्थी-पालक-शिक्षकांच्या संयुक्त सहभागातून व्यसनमुक्त वातावरण निर्माण करण्याचा निर्धार करावा. शाळा–महाविद्यालय परिसर तंबाखूमुक्त ठेवणे.तरुणांमधील तंबाखू सेवन रोखण्यासाठी कडक कायदे व अंमलबजावणी तंबाखू उत्पादने आकर्षक पद्धतीने विक्री करण्यावर निर्बंध.

## तरुणाईने घेतला पर्यावरण संवर्धनाचा ध्यास

**अमरावती** - 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हे अभंगापुरते मर्यादित न राहता.संकेत श्रीखंडे यांच्या नेतृत्वात गावातील प्रमुख रस्त्यावर वृक्षारोपण करून या कडक उन्हाळ्यात सुद्धा झाडे हिरवेगार व जिवंत ठेवण्याचे कार्य केले असून, वृक्ष संवर्धनाचा ध्यास त्यांनी घेतला आहे.'एक पेड मा के नाम' ही संकल्पना पुढे करत काही तरुणांनी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला. वाढते शहरीकरण, ढासळलेले पर्यावरण, जंगलाची तोड याचा परिणाम उष्णतेचा पारा अधिक निर्माण होऊ लागला आहे. ही समस्या स्थानिक न राहता जागतिक चिंता झाली आहे. वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे.त्यासाठी या तरुणांनी वृक्ष लागवड ते जतन करण्याचा पुढाकार घेतला. आणि आज पाहता पाहता सर्व तरुण एकत्र येऊन झाडे जोपासण्याचे दैनंदिन काम करत आहे. सोबत या झाडांच्या वृक्षारोपणावेळी मदतीसाठी आलेल्या गावकऱ्यांकरिता सन्मान म्हणून या तरुणांनी स्पायडर प्लांट घरोघरी वाटले जेणेकरून लोकांमध्ये झाडांविषयी प्रेम वाढावे.आज संकेत श्रीखंडे यांच्यासोबत सचिन टाकरखेडे, नितीन औंधकर, शुभम यावलीकर, मिथुन कविटकर, कैलास टाकोने या तरुणाई सोबत इतरही मंडळी गावात वृक्ष लागवड तथा वृक्ष संवर्धनाचे कार्य करीत आहे.



## चिमुकलीचा मृत्यू

**अमरावती** - पाण्याच्या ड्रमध्ये बुडून एका चिमुकलीचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना २९ मे रोजी दुपारी माहुली जहागीर ठाण्याच्या हद्दीतील कापूसतळणी येथे घडली. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे.आरुण्या शुभम बोरकर (४) रा. कापूसतळणी असे मृत चिमुकलीचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी आरुण्याचे कुटुंबीय घरी आराम करीत होते. ती बकेटवर उभी राहून ड्रममधून पाणी काढत होती. त्याचवेळी तोल जाऊन ती ड्रममध्ये पडली. त्यात पाण्यात बुडून तिचा मृत्यू झाला. दरम्यान, बराच वेळ होऊनही आरुण्या दिसून न आल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध घेतला. त्यावेळी ती पाण्याच्या ड्रममध्ये आढळून आली. कुटुंबीयांनी तिला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. त्यानंतर घटनेची माहिती माहुली जहागीर पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला.

## मंगेश वाटाणे यांचे निधन

**अमरावती** - मनपाचे सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त मंगेशराव गणेशराव वाटाणे यांचे दीर्घ आजाराने शुक्रवारी (दि. २९) सायंकाळी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षांचे होते. मनपामध्ये सहाय्यक आयुक्त, बाजार परवाना विभाग, मालमत्ता क्षेत्रीय अधिकारी आदी विविध पदावर त्यांनी काम केले होते. मनपा कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेचे सचिव म्हणून सुद्धा त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी (दि. ३०) सकाळी १० वाजता त्यांचे पूजा कॉलनी फरशी स्टॉप येथील निवासस्थानाहून निघणार असून हिंदू स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, मुलगी, जावई, नातवंडे असा आप्त परीवार आहे.

# कॉंग्रेसकडून पेट्रोल, डिझेल व गॅस दरवाढीचा निषेध

## विविध मागण्यांचे तहसिलदारांना निवेदन



**चांदूरबाजार/वार्ताहर**
पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅस सिलेंडरच्या सतत होत असलेल्या दरवाढीच्या निषेधार्थ, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या चांदूर बाजार तालुका काँग्रेस कमेटी (ग्रामीण) यांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी व विद्यार्थी विरोधी धोरणांचा निषेध करण्यात आला.

मे महिन्यात पेट्रोल, डिझेल व गॅसच्या दरामध्ये चार वेळा वाढ करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांना, महागाईचा मोठा फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच रासायनिक खतांचे वाढलेले दर आणि नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली.

तसेच शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली संपूर्ण कर्जमाफी तात्काळ लागू करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अन्यथा काँग्रेस पक्षाच्या वतीने यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.हे निवेदन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या मार्गदर्शनात, तालुका काँग्रेस कमेटी (ग्रामीण) अध्यक्ष किशोर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. निवेदन सादर करतांना काँग्रेसचे विलास शेकार, खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रताप किटुकले, निखिल काटोलकर, श्रेयस बर्वे, राजेंद्र बंड,, मनोज देशमुख, विजय राऊत, भाई देशमुख, विनोद खवले, अंकुश देशमुख, भूषण देशमुख,अभिजीत सावरकर, गोपाल रडके, संविधान मोहोड, तेजस वानखडे, वासुदेव देशमुख, मंगेश देशमुख, राहुल वाटाणेसह पदाधिकारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांचा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा आज

## सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : एक अमृत प्रवास' या संकल्पनेवर नेत्रदीपक सोहळा



**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या वैचारिक वारसाची जपवणूक करत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मूल्याधिष्ठित परंपरेत मोलाचे योगदान देणाऱ्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख तथा कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : एक अमृत प्रवास' या संकल्पनेवर आधारित हा विशेष सोहळा रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे भव्य स्वरूपात संपन्न होणार आहे.

अमृत महोत्सवी सोहळ्यास विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मविभूषण खा. शरदचंद्र पवार राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई, केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ना.डॉ. पंकज भोयर तसेच अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी उपस्थित राहणार आहेत. यासोबतच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी गण यांचीही उपस्थिती लाभणार आहे.



कार्यक्रमाच्या निमित्ताने अमरावती शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्याशी भावनिक नाते असलेल्या अनेकांसाठी हा सोहळा म्हणजे कृतज्ञतेचा आणि प्रेरणेचा उत्सव ठरणार आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास संपूर्ण विदर्भ तसेच राज्यातून हजारो मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजनासाठी शिव परिवाराच्या वतीने शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य दिव्य असा स्टेज उभारण्यात आला असून नागरिकांना कार्यक्रम बघता यावा यासाठी प्रत्येक ठिकाणी एलईडी स्क्रीन उभारण्यात येणार आहे. सोबतच हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबु इंगोले यांच्या जीवनावरील चित्रफीत देखील दाखविण्यात येणार आहे. नागरिकांची सुनियोजित बैठक व्यवस्था या प्रांगणात करण्यात येणार असून यामध्ये व्हीआयपी व्यवस्था, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, ज्येष्ठ नागरिक, महिला, पत्रकार यांच्यासाठी देखील स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येकासाठी भव्य अशी भोजन व्यवस्था, पार्किंग या सर्व गोष्टींची बारकाईने व्यवस्था करण्यात आली आहे.

शिव परिवाराच्या आनंदात भर घालणाऱ्या या कार्यक्रमासाठी सर्व वैदर्भीय नागरिकांनी मोठ्या संख्येने सायंकाळी ठीक सहा वाजता वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक 'शिव परिवार' यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण https://youtube.com/live/zMB4qXESvUg?feature=share या लिंक वरून करण्यात येणार आहे. तसेच https://shivaji.live या युट्युब चॅनलवरुन सुध्दा कार्यक्रम प्रत्यक्ष पाहता येईल.

## विधान परिषद निवडणूक

# महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### काँग्रेससह शिवसेना, राष्ट्रवादी चे पदाधिकारी उपस्थित

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार तथा काँग्रेस पदाधिकारी हर्षजीत देशमुख यांनी आज (दि.३०)आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महाविकास आघाडीतील विविध घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमेदवारी अर्ज दाखल करताना खासदार बळवंत वानखेडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी आमदार वीरेंद्र जगताप, अमरावती महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख पराग गुडद्ये, तसेच राष्ट्रवादी ☞(पान २ वर)



■ महाविकास आघाडीला कोणत्याही प्रकारच्या शक्तिप्रदर्शनाची गरज नाही. आमची ताकद रस्त्यावरच्या गर्दीत नाही, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांमध्ये असलेल्या विश्वासात आणि आमच्या मजबूत संघटनात्मक बांधणीत आहे. महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्ष एकदिलाने हर्षजीत देशमुख यांच्या पाठीशी उभे आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून जनतेच्या प्रश्नांसाठी केलेले काम, कार्यकर्त्यांचे जाळे आणि स्थानिक प्रतिनिधींचा मिळणारा पाठिंबा याच्या बळावर आम्ही ही निवडणूक लढत आहोत. मतदारांचा कौल महाविकास आघाडीच्या बाजूने राहील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

-**बबलू देशमुख,** जिल्हाध्यक्ष, काँग्रेस, अमरावती.

# बँक खात्यातून सहा लाख रुपये गायब

### दूध विक्रेत्याची ऑनलाइन फसवणूक


**अमरावती/प्रतिनिधीः-** सायबर गुन्हेगारांनी पुन्हा एकदा नागरिकांना लक्ष्य करत एका दूध विक्रेत्याच्या बँक खात्यातून तब्बल सहा लाख रुपये लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे खातेदाराला व्यवहाराची माहिती मोबाईलवरील संदेशातून मिळाल्यानंतर हा प्रकार समोर आला. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवशंकर नगर येथील रहिवासी तथा दूध व्यवसाय करणारे संतोष मेवालाल पांडे (वय ५१) यांचे बँक ऑफ बडोदामध्ये खाते आहे. २६ मे रोजी सायंकाळी त्यांच्या मोबाईलवर खात्यातून रक्कम काढल्याचा संदेश प्राप्त झाला. संशय आल्याने त्यांनी तातडीने बँकेत जाऊन चौकशी केली असता, त्यांच्या खात्यातून प्रत्येकी दोन लाख रुपये अशा तीन व्यवहारांद्वारे एकूण सहा लाख रुपये काढण्यात आल्याचे समोर आले. धक्कादायक बाब म्हणजे संबंधित ☞(पान २ वर)

# साईनगर अकोली येथे २७ वर्षीय युवकाने घेतला गळफास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील खोलापुरी गेट पोलीस स्टेशन हद्दीतील साईनगर अकोली परिसरात एका २७ वर्षीय युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (३० मे) उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, सचिन पाल (वय २७ राहणार अकोली) असे मृत युवकाचे नाव आहे. सचिन यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपविल्याची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. प्राथमिक तपासात ☞(पान २ वर)



# सारांश

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

□ रविवार, ३१ मे २०२६ □ E-paper - www.janmadhyam.com





# इंधन संकटाने महाराष्ट्र वेठीस, सरकार झोपेत



महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पेट्रोल-डिझेलच्या टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले. अनेक जिल्ह्यांतील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांना डिझेलसाठी तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे, तर अनेक पंपांवर 'डिझेल उपलब्ध नाही' अशा पाट्या झळकत आहेत. खरीप हंगामाच्या उंबरठ्यावर निर्माण झालेली ही परिस्थिती ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. मात्र सरकारकडून या संकटाची तीव्रता मान्य करण्याऐवजी 'टंचाई नाही' असा खोटा दावा करून वास्तव झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने राज्यात इंधन टंचाई नसल्याचे सांगत आहेत. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र वेगळे आहे. जर परिस्थिती नियंत्रणात असेल, तर पेट्रोल पंपांवर मध्यरात्रीपासून रांगा का लागत आहेत? शेतकरी डिझेलच्या शोधात गावोगाव का फिरत आहेत? ट्रॅक्टर, पंपसेट आणि शेती मशागतीची यंत्रे ठप्प का पडत आहेत? गेल्या आठ दिवसांत पेट्रोल, डिझेलच्या दरात प्रति लिटर ८ रुपये आणि सीएनजीच्या दरात प्रति किलो ५ रुपयांपेक्षा अधिकची वाढ झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरवाढीमुळे खाद्यपदार्थांच्या किमतीत अगोदरच वाढ झालेली आहे. त्यामुळे सरकारच्या दाव्यांपेक्षा जमिनीवरील वास्तव खूप गंभीर आहे.पंतप्रधानांनी इंधनाचा वापर जपून करण्याचे सांगितल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी एक दिवस बुलेटने फिरण्याची स्टंटबाजी केली. पण त्या बुलेटस्वारीचे फोटो आणि व्हिडीओ शूट करण्यासाठी ८-१० कॅमेरे आणि गाड्या वापरल्या जात होत्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ई कार वापरायला सुरुवात केली, पण त्यांच्या मागेपुढे डिझेल, पेट्रोलवर चालणाऱ्या किमान डझनभर गाड्या असतात. सत्ताधारी पक्षाचे बहुतांश मंत्री आणि आमदार लँड क्रुझर, रेंज रोव्हर, डिफेंडर अशा गाड्या वापरतात. ज्या एक लिटरमध्ये फक्त ३ किलोमीटरच्या आसपास चालतात. प्रचाराची नौटंकी सोडली तर सत्ताधारी पक्षाकडून उधळपट्टी सुरू आहे. राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी या परिस्थितीस 'काळाबाजार' कारणीभूत असल्याचे सांगत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या स्वत:च्या जिल्ह्यात तापी नदीपात्रात हजारो जेसीबी पोकलेन आणि डंपर दिवसरात्र वाळू उपसा आणि वाहतूक करत आहेत. त्यांना हे डिझेल कुठून मिळत आहे. काळ्या बाजारातून? काळ्या बाजारामुळे कृत्रिम टंचाई निर्माण होत असेल, तर ती रोखण्याची जबाबदारी सरकारची नाही का? साठेबाजी होत असेल तर प्रशासन काय करत होते? हे सर्व माफिया सत्ताधारी पक्षाच्या जवळचे आहेत. त्यामुळे त्यांना सरकारी आशीर्वादासोबत टंचाईच्या काळात डिझेलचा सुरळीत पुरवठाही सुरू आहे. हातात कॅन घेऊन दिवसभर पंपावर उभ्या असणाऱ्या शेतकऱ्यांना काळा बाजार करतात असे म्हणणाऱ्या गिरीष महाजनांच्या जिल्ह्यात तापी नदीतून अवैधपणे जी रेतीची लूट सुरू आहे त्यासाठी लागणारे डिझेल काळ्या मार्गाने येती की गोऱ्या मार्गाने यावर कधी चकार शब्द काढला नाही.राज्यात सगळीकडे अवैध रेती उत्खनन करणारे डंपर, जेसीबी आणि पोकलेन मशीन दिवस-रात्र सुरू आहेत. त्यांना रोज हजारो लिटर डिझेल मिळत आहे. जर पुरवठा कमी असेल, तर हा इंधन पुरवठा कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? अवैध रेती उत्खननाचा पर्यावरणावरही गंभीर परिणाम होत आहे. नदीपात्रांची

> **ग्रामीण भागाला प्राधान्याने डिझेल पुरवठा, साठेबाजीवर कठोर कारवाई आणि पुरवठा साखळीतील अडथळे दूर करणे आवश्यक आहे. अन्यथा पेट्रोल पंपांवरील रांगा उद्याच्या जनआक्रोशात परिवर्तित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवरच असेल.**

मोठ्या प्रमाणावर हानी होत असून भूजल पातळी खालावत आहे. गावांचे नैसर्गिक संतुलन बिघडत आहे. तरीही प्रशासनाकडून कठोर कारवाई होताना दिसत नाही. डिझेल टंचाईच्या काळातही माफियांची यंत्रणा खंडित न होणे हे प्रशासनातील साटेलोट्याचेच निदर्शक आहे.

खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच डिझेलची कमतरता निर्माण होणे अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्रातील बहुतांश शेती यांत्रिकीकरणावर अवलंबून आहे. मशागत, पेरणी, सिंचन आणि वाहतूक या सर्व प्रक्रियांमध्ये डिझेल महत्त्वाची भूमिका बजावते. वेळेत मशागत झाली नाही तर पेरणी उशिरा होते आणि त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे त्रस्त असलेला शेतकरी दुहेरी संकटात आहे. पंतप्रधानांनी 'खते कमी वापरा' असे आवाहन केले. बियाणे, खते, औषधे आणि इंधन यांच्या वाढत्या किमतींनी शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे. त्यात हवामानातील अनिश्चितता आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे ग्रामीण भागातील अस्वस्थता वाढली आहे. बळीराजाचा गौरव फक्त सत्ताधाऱ्यांच्या भाषणांपुरता मर्यादित राहिला असून धोरणांच्या केंद्रस्थानी शेतकरी दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे.कांदा उत्पादक शेतकरी आधीच मोठ्या आर्थिक संकटात आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव कोसळले आहेत. अनेकांना कांदा रस्त्यावर फेकण्याची वेळ आली आहे. काही ठिकाणी दहा-दहा क्विंटल कांदा विकल्यानंतरही हातात १० रुपयेही पडत नाहीत. त्यात आता डिझेल टंचाईमुळे वाहतूक खर्च वाढला असून कृषिमाल बाजारात नेणेही कठीण बनले आहे. सरकारचा आणखी एक गंभीर दोष म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. पुरवठा विस्कळीत का झाला, परिस्थिती किती गंभीर आहे आणि ती पूर्ववत होण्यासाठी किती वेळ लागणार, याबाबत सरकार स्पष्ट बोलत नाही.

परिणामी अफवा पसरून साठेबाजी वाढत आहे आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.

# वैद्यकीय शिक्षणाचा सावळा गोंधळ !

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला सध्या गैरव्यवहार, अनास्था आणि प्रशासकीय दिरंगाईचे मोठे ग्रहण लागले आहे. एकेकाळी शिक्षणाचे माहेरघर आणि पुरोगामी विचारांचे केंद्र म्हणून ओळखला जाणारा महाराष्ट्र आज नीट पेपरफुटीच्या केंद्रस्थानी येऊन पोहोचला आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंची मुदत संपून सात महिने उलटले, तरीही नवीन नियुक्ती रखडलेलीच आहे. त्यातच राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या १८ वरून ३६ झाली असली, तरी त्यांपैकी एकही महाविद्यालय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे निकष पूर्ण करू शकत नाही, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे.

देशातील वैद्यकीय प्रवेश परीक्षा घोटाळ्याच्या केंद्रस्थानी सध्या महाराष्ट्र सापडला आहे. राज्यातील आयुर्विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी पात्र व्यक्तींची नावे कुलपतींच्या कार्यालयाकडे पाठवून काही महिने उलटले, तरी कुलगुरूपदाची नियुक्ती रखडली आहे. शिवाय, राज्यातील सुमारे ६० टक्के शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत दीर्घकाळ प्रभारी अधिष्ठातापदाचा कार्यभार संपुष्टात आणण्यासाठी लोकसेवा आयोगाने मुलाखतींचा कार्यक्रम ऐनवेळी रद्द करून महिना उलटला, तरी मुलाखतींचा कार्यक्रम जाहीर होत नाही आणि राज्यातील महाविद्यालयांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

वैद्यकीय शिक्षणाच्या गंभीर दुरवस्थेचे हे




चित्र कुठे आहे? संपूर्ण देशालाच नव्हे, तर प्रगत देशातील विद्वानांनाही धक्का बसेल, असे महाराष्ट्राचे हे चित्र आहे.पुण्याला विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. परंतु, सध्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या(नीट) घोटाळ्यात या पुण्यातील काही शिक्षकांनी नैतिकतेलाच सोडचिठ्ठी दिल्याचे प्रकरण सीबीआयच्या तपासामध्ये पुढे आले. पैशाच्या मोहापायी शिक्षकांनीच पेपर फोडल्याचा आरोप आहे. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अग्रेसर असलेला पुरोगामी महाराष्ट्र सध्या ?'नीट?' घोटाळ्याच्या केंद्रस्थानी आला आहे. या अधोगतीला वा कलंकाला जबाबदार कोण? शिक्षकांनी शिकवणी घेऊ नये, इथंपासून संस्थाचालकांनी कॅपिटेशन फी म्हणजेच डोनेशन घेऊ नये, यासाठी कडक कायदा आहे.



# भाजपच्या १२ वर्षांत लोकशाहीचा ऱ्हास !

दिल्लीच्या तख्तावर २६ मे २०१४ रोजी आरूढ झालेल्या नेतृत्वाने भारताच्या लोकशाहीला एका अशा वळणावर आणून ठेवले आहे, जिथे 'प्रगती' या शब्दाची व्याख्याच पूर्णतः बदलली गेली आहे. १२ वर्षांचा हा कालखंड केवळ सत्तेचा फेरपालट नाही, तर तो आपल्या घटनात्मक मूल्यांच्या मुळावर घाव घालणारा एक प्रदीर्घ प्रवास आहे.'जागतिक प्रतिमा' उंचावल्याच्या दाव्यामागे एक पोकळपणा आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर जेव्हा भारताच्या लोकशाही निर्देशांकात घसरण सुरू होते, तेव्हा ती चिंतेची बाब असते. शेजारी राष्ट्रांशी बिघडलेले संबंध आणि जागतिक भू-राजकारणातील भारताची संदिग्ध भूमिका हे सिद्ध करते की, केवळ चमक दाखवून विश्वासार्हता टिकत नाही. प्रतिमा ही जाहिरातींनी नाही, तर देशांतर्गत मानवी हक्कांचे रक्षण आणि कायद्याच्या राज्याच्या स्थितीवरून ठरत असते. अर्थव्यवस्थेचे चित्र गुलाबी रंगवण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी वास्तवात''के-शेप्ड' दरी अधिक रुंदावली आहे. मूठभर उद्योजकांच्या संपत्तीत होणारी अमाप वाढ आणि दुसरीकडे मध्यमवर्ग अन् श्रमिकांच्या हातातली क्रयशक्ती संपणे, हे वाढत्या असमानतेचे लक्षण आहे. नोटाबंदीने असंघटीत क्षेत्राचा कणा मोडला, तर जीएसटीने लहान व्यापाऱ्यांची कोंडी केली. आर्थिक विकासाचा लाभ हा केवळ काही कॉर्पोरेट घराण्यांपुरता मर्यादित राहिला आहे, जो भारतीय अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन आरोग्यासाठी घातक आहे.संसद, न्यायालय आणि माध्यमे – सत्तेचे पालवलेले पाळीव प्राणी झाले आहेत का, असा प्रश्न पडतो. लोकशाहीचे रक्षक असणारे हे तीन खांब आज सत्तेच्या तालावर नाचताना दिसतात. संसद आता चर्चा करण्याचे केंद्र राहिलेली नाही, तर ती केवळ सरकारी विधेयके आवाजी मतदानाने मंजूर करण्याचे रबर स्टॅम्प बनली आहे.

विरोधकांचा आवाज दाबणे आणि असहमतीचा प्रत्येक स्वर देशद्रोही ठरवणे, हे नव्या संसदीय संस्कृतीचे लक्षण आहे. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांच्या भूमिकेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह चिंतेचे आहे. संवेदनशील प्रकरणांत घेतलेली सावध भूमिका आणि कार्यपालिकेच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्याची प्रवृत्ती, यामुळे न्यायदानाच्या स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.'गोदी मीडिया'चा उदय ही या १२ वर्षांची सर्वांत मोठी शोकांतिका आहे. सत्तेला प्रश्न विचारण्याऐवजी, सत्तेचे गोडवे गाणे आणि जनमताला दिशाभूल करणारी माहिती देणे, यातून माध्यमे आज लोकशाहीची कुंपणे न राहता सत्तेची लाऊडस्पीकर बनली आहेत.समाजाची विभागणी करून सत्ता टिकवण्याचा प्रयत्न हा या १२ वर्षांचा सर्वात गडद पैलू आहे. इतिहासाची सोयीस्कर मोडतोड, नेहरूंसारख्या राष्ट्रपुरुषांच्या योगदानाला नाकारणे आणि अल्पसंख्याकांना दुय्यम ठरवण्याचे धोरण, हे देशाला आधुनिकतेकडून मध्ययुगीन मानसिकतेकडे ढकलणारे आहे. जेव्हा राजकारण विकासाऐवजी द्वेषाच्या पायावर उभे राहते, तेव्हा देशाची सामाजिक वीण कायमची उसवते. आजचे सरकार हे मंत्रिमंडळ नसून एकाधिकारशाही आहे. पंतप्रधान कार्यालय इतके शक्तिशाली झाले आहे की, अन्य मंत्र्यांची भूमिका केवळ 'सही करणारे हात' अशी उरली आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेत कोणताही 'चेक अँड बॅलन्स' राहिलेला नाही. एका व्यक्तीच्या चुकीच्या निर्णयाचे परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे नोटबंदीचा निर्णय. ही लोकशाही नसून 'प्रशासकीय हुकूमशाही' आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन हे केवळ एक 'जुमला' ठरले. दिल्लीच्या वेशीवर वर्षभर बसलेल्या शेतकऱ्यांचा अपमान करणे, त्यांना 'दहशतवादी' संबोधणे, हे सरकारच्या लोकशाहीविरोधी वृत्तीचे दर्शन होते. शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे, पण या सरकारसाठी तो केवळ मतपेढीचा हिस्सा उरला आहे. हे संकट केवळ शेतीचे नाही, तर ते सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचे आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हे घोषवाक्य हा एक क्रूर विनोद ठरला आहे.

# भारतीय रेल्वेचा धडका



गेल्या काही वर्षांमध्ये देशात औद्योगिक उत्पादन, कोळसा वाहतूक, बंदरांमधील मालवाहतूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्यामुळे रेल्वेच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर भारतीय रेल्वे खासगी क्षेत्राच्या सहभागातून सहा नवीन रेल्वे प्रकल्प उभारण्याच्या योजना राबवत आहे. हा निर्णय भारतीय रेल्वेच्या धोरणात्मक बदलाचे संकेत देणारा मानला जात आहे. दीर्घकाळ भारतीय रेल्वेचा विस्तार मुख्यतः सरकारी निधीवर आधारित होता; मात्र वाढत्या लोकसंख्येचा दबाव, औद्योगिक वाढ आणि पायाभूत सुविधांवरील वाढती मागणी पाहता केवळ सरकारी निधीवर रेल्वेचा विस्तार करणे कठीण होत चालले आहे. केंद्र सरकारसमोर आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि शहरी पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. अशा परिस्थितीत रेल्वे क्षेत्रात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू झाला आहे. रेल्वे मंत्रालयाने तत्त्वतः मंजुरी मिळवलेल्या सहा प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने मालवाहतुकीसाठीचे रेल्वे कॉरिडॉर उभारले जाणार आहेत. चार कोळसा वाहतूक कॉरिडॉर, एक बॉक्साइट वाहतूक मार्ग आणि एक लोखंड धातू वाहतूक कॉरिडॉर या योजनांमध्ये समाविष्ट आहेत. या सर्व प्रकल्पांची एकत्रित लांबी सुमारे ६४० किलोमीटर असेल. हे मार्ग विशेषतः खाण, ऊर्जा आणि अवजड उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. भारतातील वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणात कोळशावर आधारित आहे. देशातील अनेक वीज प्रकल्पांना वेळेवर कोळसा पोहोचवण्यात रेल्वेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. स्वतंत्र मालवाहतूक कॉरिडॉर उभारल्यास कोळसा वाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम होऊ शकते. त्याचप्रमाणे बॉक्साइट आणि लोखंड धातू वाहतुकीमुळे स्टील आणि धातू उद्योगालाही मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पांची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ते सार्वजनिक-खासगी भागीदारी अर्थात 'पीपीपी' मॉडेलवर उभारले जाणार आहेत. रेल्वे क्षेत्रात याआधीही 'पीपीपी' मॉडेलचे प्रयोग झाले होते; पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नव्हते. खासगी कंपन्यांनी गुंतवणुकीबाबत फारसा उत्साह दाखवला नव्हता. यामागील प्रमुख कारण म्हणजे मोठा आर्थिक धोका, जमीन अधिग्रहण आणि दीर्घकालीन परताव्याबाबतची अनिश्चितता. या वेळी मात्र रेल्वे मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल केले आहेत. सर्वप्रथम, प्रकल्पांचा सवलत कालावधी ५० वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजे खासगी कंपन्यांना दीर्घकाळ महसूल मिळवण्याची संधी असेल. दुसरे म्हणजे, जमीन अधिग्रणाची जबाबदारी रेल्वे स्वतः घेणार आहे. भारतात पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जमीन अधिग्रहण हा सर्वात मोठा अडथळा मानला जातो, त्यामुळे गुंतवणूकदारांवरील धोका कमी होईल. सरकार 'व्हायेबिलिटी गॅप फंडिग' मॉडेलही वापरणार आहे.

या अंतर्गत प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य रहावेत, म्हणून सरकार प्रकल्प खर्चाच्या कमाल ४० टक्क्यांपर्यंत आर्थिक मदत देईल. यामुळे खासगी क्षेत्रासाठी गुंतवणूक अधिक आकर्षक बनण्याची शक्यता आहे. हा निर्णय रेल्वेने 'मिशन ३०००' अंतर्गत २०३० पर्यंत वार्षिक मालवाहतूक क्षमता ३००० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याच्या ध्येयाशी जोडला आहे.

# उर्वशीचा हा लूक पाहून सर्वांचे डोळे चमकले!



कान्स फिल्म फेस्टिव्हल मध्ये अभिनेत्री उर्वशी रौतेलाने आपल्या ग्लॅमरस लूकने पुन्हा एकदा चाहत्यांचे लक्ष वेधले आहे. हातात खास मार्टिनी क्लच घेत तिने रेड कार्पेटवर एकापेक्षा एक स्टायलिश पोझ दिल्या. तिचे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून तिच्या फॅशन सेन्सचे कौतुक केले जात आहे.

कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ जरी संपला असला, तरी अभिनेत्री उर्वशी रौतेला तिच्या महागड्या आणि आगळ्यावेगळ्या फॅशन निवडीमुळे आजही प्रसिद्धीच्या झोतात आहे. कान्सच्या प्रतिष्ठित मध्ये उर्वशीने रेड कार्पेटवर हजेरी लावली आणि आपल्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या सोहळ्यासाठी उर्वशीने 'जोली पॉली' या ब्रँडचा अत्यंत सुंदर आणि स्पार्कल गाऊन परिधान केला होता. या गाऊनवर करण्यात आलेले बारीक डिझाईन आणि त्याला असलेली 'फेदर ट्रेन' (पिसांची सजावट) यामुळे तिच्या सौंदर्यात भर पडत होती. मात्र, तिच्या कपड्यांपेक्षा तिच्या हातातील एका विशिष्ट बॅगने सर्वांना थक्क केले

५.५ लाखांची 'एस्प्रेसो मार्टिनी' बॅग

उर्वशीच्या या लूकचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिच्या हातात असलेला 'जुडिथ लीबर' या ब्रँडचा क्रिस्टल क्लच.

ही बॅग हुबेहूब 'एस्प्रेसो मार्टिनी' या कॉकटेल ग्लासच्या आकाराची होती. यावर क्रिस्टल्स आणि वरच्या बाजूला कॉफी बीन्सचे डिझाईन अत्यंत बारकाईने करण्यात आले होते. या लक्झरी बॅगची किंमत तब्बल ५.५ लाख रुपये इतकी आहे.

**सोशल मीडियावर व्हायरल लूक**

आंतरराष्ट्रीय रेड कार्पेटवर नेहमीच वेगळे प्रयोग करणाऱ्या उर्वशीने पुन्हा एकदा स्वतःचा एक 'व्हायरल मोमेंट' तयार केला आहे. नेटकऱ्यांनी या बॅगला 'कान्समधील आतापर्यंतची सर्वात हटके ॲक्सेसरी' असे म्हटले आहे. महागडे दागिने, ग्लॅमरस मेकअप आणि या 'कॉकटेल क्लच'सह उर्वशीने कान्स २०२६ मध्ये पुन्हा एकदा सर्वांच्या नजरा स्वतःकडे वळवून घेतल्या आहेत.

# 'लाल लाल कलरची बांगडी' ट्रेण्ड गाजतोय...



छोट्या पडद्यावरची लाडकी नायिका म्हणून अभिनेत्री जान्हवी किल्लेकरला ओळखलं जातं. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. ही अभिनेत्री 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वात देखील सहभागी झाली होती. या शोमुळे तिला प्रचंड लोकप्रियता मिळाली. जान्हवीला महाराष्ट्राच्या घराघरांत आता 'किल्लर गर्ल' म्हणूनही ओळखलं जातं. तिने नुकताच संजू राठोडच्या ट्रेंडिंग गाण्यावर डान्स केला आहे. गेल्या काही दिवसांपासून 'लाल लाल कलरची बांगडी' या संजू राठोडच्या गाण्याने सोशल मीडियावर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. संजूची आजवरची सगळीच गाणी सोशल मीडियावर सुपरहिट ठरली आहेत. सध्या नेटकऱ्यांपासून ते सेलिब्रिटींपर्यंत सगळे जण 'लाल लाल कलरची बांगडी' या गाण्यावर ठेका धरत असल्याचं पाहायला मिळत आहे. मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री जान्हवी किल्लेकरला सुद्धा या 'लाल बांगडी' गाण्याची भुरळ पडली आहे. जान्हवी किल्लेकर सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. तिने नुकताच एक डान्स व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये अभिनेत्रीने संजू राठोडच्या व्हायरल 'लाल लाल कलरची बांगडी' गाण्यावर ठेका धरल्याचं पाहायला मिळत आहे. अभिनेत्रीने यामध्ये मूळ गाण्याप्रमाणे कमाल एक्स्प्रेशन्स देत हुबेहूब डान्स स्टेप्स केल्या आहेत. या व्हिडीओमध्ये जान्हवीचा बोल्ड अंदाज पाहायला मिळतोय.

# रश्मीकाची फॅशन ...



अभिनेत्री रश्मिका मंदाना सध्या जागतिक फॅशन विश्वात आपला खास ठसा उमटवत आहे. बॉलिवूड आणि साऊथ इंडस्ट्रीतील रेड कार्पेट लूकनंतर आता रश्मिकाने जपानमधील टोकियो येथे आयोजित 'क्रंचीरोल ॲनिमे अवॉर्ड्स २०२६' मध्ये आपल्या ग्लॅमरस अंदाजाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हॉलिवूड अभिनेता विन्स्टन ड्युकसोबत स्टेज शेअर करताना रश्मिकाने एलिगन्स आणि स्टेटमेंट ज्वेलरीचा सुंदर मिलाफ सादर केला. तिच्या या लूकची सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे.

ब्लॅक गाऊनमध्ये रश्मिकाचा ग्लॅमरस लूक

२३ मे रोजी पार पडलेल्या या प्रतिष्ठित कार्यक्रमासाठी रश्मिकाने डिझायनर प्रबल गुरूंगचा ब्लॅक सिक्विन्ड गाऊन परिधान केला होता. स्ट्रॅपलेस असलेल्या या गाऊनमध्ये फिटेड स्ट्रक्चर, क्लीन नेकलाइन आणि फ्लोअर-लेंथ देण्यात आली होती. हा गाऊन तिच्या व्यक्तिमत्त्वाला अत्यंत आकर्षक दिसत होता. फ्लोरल एम्बेलिशमेंटने वाढवली लूकची शोभा

या संपूर्ण आउटफिटमधील सर्वाधिक लक्षवेधी गोष्ट म्हणजे गाऊनवरील फ्लोरल नक्षी. नाजूक डिटेलिंगमुळे ऑल-ब्लॅक लूकला सॉफ्ट आणि रोमँटिक टच मिळाला. या डिझाइनमुळे गाऊनचा मोनोक्रोम लूक अधिक उठून दिसत होता.

रश्मिकाने या गाऊनसोबत सुनिता शेखावत यांची आकर्षक ज्वेलरी परिधान केली होती. तिने घातलेला मल्टी-जेमस्टोन चोकर संपूर्ण लूकचा मुख्य आकर्षण ठरला. ऑल-ब्लॅक आउटफिटवर या रंगीबेरंगी ज्वेलरीमुळे खास कॉन्ट्रास्ट तयार झाला. याशिवाय तिने नाजूक रिंग्स परिधान करत ज्वेलरी स्टाईलिंग बॅलन्स केले.

सेलिब्रिटी स्टायलिस्ट प्रियंका कापडिया आणि नाहिदा यांनी रश्मिकाचा हा लूक स्टाईल केला होता.

रश्मिकाने मेकअप सॉफ्ट, ग्लॅमरस आणि क्लासिक ठेवला होता. ग्लोईंग ड्युई स्किन, सौम्य स्मोकी आईज, सॉफ्ट ब्लश्ड चीक्स आणि ग्लॉसी न्यूड लिप्समुळे तिचा संपूर्ण लूक अधिक खुलून दिसत होता.

# मौनी रॉयचा ग्लॅमरस लुक



टीव्हीवरील 'नागिन' मालिकेमुळे घराघरात पोहोचलेली अभिनेत्री मौनी रॉय पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मात्र यावेळी कारण ठरलं तिचं वैयक्तिक आयुष्य नाही, तर कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मधील तिचा जबरदस्त ग्लॅमरस लुक. गेल्या काही दिवसांपासून तिच्या घटस्फोटाच्या चर्चांनी सोशल मीडियावर जोर धरला होता. अशातच मौनीने कान्सच्या रेड कार्पेटवर एंट्री करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. तिच्या स्टायलिश आणि एलिगंट अंदाजाने चाहत्यांसह फॅशन विश्वालाही भुरळ घातली.

जगातील सर्वात प्रतिष्ठेचा समजला जाणारा दरवर्षी अनेक बॉलिवूड आणि आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या उपस्थितीने गाजत असतो. यंदाच्या सोहळ्यात मौनी रॉयने केलेली उपस्थिती विशेष चर्चेचा विषय ठरली. फुलांच्या नक्षीने सजवलेला ऑफ-शोल्डर गाऊन, हलकासा मेकअप आणि आत्मविश्वासपूर्ण बॉडी लँग्वेज यामुळे तिचा लुक पूर्णपणे 'रेड कार्पेट परफेक्ट' वाटत होता. मौनीच्या या गाऊनची खासियत म्हणजे त्यावरील सुंदर फ्लॉवर डिटेलिंग. पेस्टल शेड्समध्ये तयार केलेल्या या गाऊनवर थ्री-डी फ्लॉवर डिझाइन करण्यात आले होते. त्याचबरोबर गाऊनचा लांब ट्रेल तिच्या लुकला अधिक रॉयल बनवत होता.

काही क्षणातच तिचा हा लुक सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. तिच्या या लुकवर चाहते भरभरून प्रेम देत आहेत. कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये मौनी रॉयने परिधान केलेला फ्लॉवर थीम गाऊन तिच्या लुकची सर्वात मोठी खासियत ठरला. ऑफ-शोल्डर डिझाइन असलेल्या या गाऊनवर सुंदर थ्री-डी फुलांची नक्षी करण्यात आली होती. पेस्टल पिंक, पीच आणि न्यूड शेड्समुळे तिचा संपूर्ण लुक अतिशय सॉफ्ट आणि एलिगंट दिसत होता. गाऊनचा लांब ट्रेल रेड कार्पेटवर चालताना अधिक आकर्षक वाटत होता. मौनीने या लुकसोबत मिनिमल मेकअप निवडला होता. न्यूड लिपस्टिक, शार्प आयमेकअप आणि ग्लोइंग बेसमुळे तिचं सौंदर्य अधिक खुलून दिसत होतं.

मौनीने या ग्लॅमरस लुकसोबत अतिशय सिंपल आणि सॉफ्ट मेकअप निवडला होता.

न्यूड लिपस्टिक, हलका ब्लश आणि शार्प आयमेकअपने तिच्या नैसर्गिक सौंदर्याला अधिक खुलवलं. जास्त हेवी मेकअप न करता तिने ग्लोइंग बेस ठेवत एलिगंट लुक कॅरी केला.

# ऐश्वर्या रॉयला लठ्ठपणावरून सल्ले....



जगात तिच्याहून सुंदर खरंतर कुणी नाही अशी चर्चा जगानेच अनेक वर्षे केली. तिचे रुप, तिचं बोलणं, कान्स रेडकार्पेटवरचा तिचा वावर.. तिचा आबहे सारं कौतुकाने जगाने कित्येक वर्षे पाहिले. कुणी तेव्हाही नावे ठेवली, पण लेकीच्या जन्मानंतर तिचे वाढलेले वजन आणि आता वयाच्या पन्नाशीत बदललेलं शरीर, रंगरुप-वाढलेलं वजन हे सारं लोकांच्या नजरेत आले. ती विश्वसुंदरी झाल्यानंतर एका मुलाखतीत स्वत:च म्हणाली होती की, मी परिपूर्ण सुंदर आहे असं मला वाटतं का या प्रश्नाचं मी काय उत्तर देणार? हो म्हणाले तर तुम्ही म्हणाल स्वत:च्या प्रेमात बुडालेली आत्मकेंद्री आहे. ऐश्वर्या राय बच्चन म्हणजे भारतीय सौंदर्याची ओळख. मिस वर्ल्डपासून बॉलिवूडपर्यंत आणि कान्सच्या रेड कार्पेटपासून जागतिक फॅशन मंचापर्यंत तिने अनेक वर्ष स्वत:ची वेगळी छाप निर्माण केली.

एक काळ असा होता की, ऐश्वर्याची फॅशन, तिचा ड्रेसिंग सेन्स, तिच रॅम्प वॉक, तिचं हसणं, बोलणं, लाजणं. सगळं काही जगासाठी चर्चेचा विषय असायचा. कान्स चा रेड कार्पेट असो किंवा फॅशन शोमध्ये रॅम्प वॉक करणं असो जगभरातील अनेक कॅमेरे तिच्यावर खिळायचे. कान्सची क्विन म्हणूनही तिला ओळखलं जायचं.

# 'मला अपराधी वाटायचे...'

पूजा भट्ट ९०च्या काळातील बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने अनेक लोकप्रिय अभिनेत्यांसह काम करत अनेक हिट चित्रपट दिले आहे. पूजा अनेकदा तिच्या व्यावसायिक आयुष्यासह खासगी आयुष्यामुळेही चर्चेत असते. अशातच आता नुकतच तिने तिचे वडील दिग्दर्शक महेश भट्ट आणि सावत्र आई सोनी राजदान यांच्या नात्याबद्दल भाष्य केलं आहे.

पूजाने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत सोनी यांनी तिच्या आईचा (किरण भट्ट) आणि वडिलांचा संसार मोडला अशी भावना सोनी यांच्या मनात होती याबद्दल सांगितलं आहे. आलिया भट्टची आई सोनी यांनी महेश भट्ट यांच्याशी लग्न करण्यापूर्वी त्यांचं किरण भट्ट यांच्याशी लग्न झालेलं आणि त्यांना पूजा भट्ट व राहुल भट्ट अशी दोन मुलं होती.

पण, नंतर महेश भट्ट व सोनी राजदान एकमेकांच्या प्रेमात पडले आणि त्यांनी २० एप्रिल १९८६मध्ये लग्न केलं. परंतु, त्यावेळी सोनी राजदान यांच्या मनात त्यांच्यामुळे किरण आणि महेश यांचा संसार तुटला अशी अपराधी भावना होती असं सांगितलं आहे. अलीकडेच पूजा भट्टने विकी ललवाणीला मुलाखत दिली. यावेळी तिने तिचे वडील आणि दिग्दर्शक महेश भट्ट तसंच सोनी राजदान



यांच्या नात्याबद्दल सांगितलं आहे पूजाने सांगितले की, कूनूरमध्ये सोनी आणि तिने संवाद साधला होता. त्यांनी याबद्दल मनमोकळेपणाने चर्चा केली होती. सोनी यांनी तिला सांगितलं की, 'पूजा, मलाही खूप अपराधी वाटायचं.' त्यावर पूजा म्हणालेली, 'मी तिला मनापासून सांगितलं की, एखादं नातं खरोखर मजबूत असेल तर तिसऱ्या व्यक्तीला त्यात जागाच मिळत नाही. नात्यात काहीतरी कमी किंवा तडे असतील तरच दुसऱ्या कुणाला त्या नात्यात येण्यासाठी जागा मिळते.' पूजाने हेही सांगितलं की, जगाला त्यांच्या नात्याबद्दल कळण्याच्या खूप आधीच महेश भट्ट यांनी तिला सोनीबद्दल सांगितलं होतं.

# लग्न - वयावरून शमिता ट्रोल...



अभिनेत्री शमिता शेट्टीने इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर केली आहे. यामध्ये वयावरुन ट्रोल करणाऱ्यांचे प्रोफाईल स्क्रीनशॉट शेअर करत सडेतोड उत्तर दिले आहे. तसेच या ट्रोलर्सला उत्तर देण्याची ही योग्य संधी असल्याचे म्हणत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. एका नेटकऱ्याने, आता तुमचे वय झाले आहे आणि तुम्ही आधीसारख्या दिसत नाहीत अशी कमेंट केली होती.

सोशल मीडियावर ट्रोलर्सला उत्तर देत शमिताने लिहिले आहे की, मी आता वेगळी दिसते हे मान्य आहे.

वेळेनुसार गोष्टी बदलतात आणि हा निसर्गाचा नियमच आहे. शरीरासह कोणत्याच गोष्टी कायमस्वरूपी टिकून राहत नाहीत. माझ्या वयाप्रमाणे मी सुदृढ आणि आनंदी आहे. देवाने मला जे काही दिले त्यासाठी आभारी आहे आणि हीच गोष्ट माझ्यासाठी महत्त्वाची आहे, असे शमिता शेट्टीने लिहिले आहे. शमिता शेट्टीच्या रिलेशनशिपबाबत अनेकदा चर्चा रंगल्या असल्या तरी तिने अद्याप लग्न केलेले नाही. शिल्पा शेट्टी ही शमितापेक्षा ३ वर्षांनी मोठी असून १४ वर्षांच्या मुलांची आई आहे. मात्र, शमिताने लग्न न करता सिंगल आयुष्य जगण्याचा निर्णय घेतला आहे, यावरून तिला सोशल मीडियावर ट्रोल करणाऱ्यांना शमिताने चोख प्रत्युत्तर दिले. ट्रोलर्सने वेळेत लग्न केले असते तर आज तुमची मुले मोठी असली असती अशी कमेंट केली.

यावर शमिताने परखड उत्तर देत लिहिले की, हो, कदाचित माझी मुले मोठी असली असती, पण त्यात काय एवढे? तुम्ही लग्न करून असे काय मिळवले आहे?

असा रोखठोक प्रश्न शमिताने विचारला आहे. वयावरून आणि लग्नावरून ट्रोल करणाऱ्यांना शमिता शेट्टीने अनफॉलो करा असेदेखील सुनावले आहे. माझ्या सारखा सिंगल महिलांवर तुमचे पुरुषप्रधान विचार लाद ण्यासाठी आणि वयावरून टीका करण्यासाठी आम्हाला फॉलो तरी कशाला करता? माझ्यासाठी एक काम करा; मला अनफॉलो करा, अशा शब्दांत अभिनेत्री शमिता शेट्टीने ट्रोलर्सला थेट उत्तर देत सुनावले आहे.

# करिश्मा कपूरचा घटस्फोट....



करिश्मा कपूरने आजपर्यंत अनेक चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. ९०च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. तिचे राजा हिंदूस्तानी, दिल तो पागल है असे अनेक सिनेमे गाजले आहेत. अभिनेत्रीचा चाहतावर्ग मोठा आहे. करिश्मा सध्या चित्रपटात मोठ्या प्रमाणात सक्रिय नाही. मात्र, ती अनेकदा तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत असते. तिचा एक्स पती संजय कपूर यांचे निधन झाल्यानंतर करिश्मा व तिची मुले मोठ्या प्रमाणात चर्चेत आली होती.

२००३ मध्ये करिश्माने उद्योगपती संजय कपूर यांच्याबरोबर लग्न केले होते. त्यांच्या लग्नाच्या मोठ्या प्रमाणात चर्चा झाल्या होत्या. त्यांना दोन मुले झाली. मात्र, त्यांचे हे नाते फार काळ टिकू शकले नाही. ते २०१६ मध्ये वेगळे झाले.

लग्नाच्या ११ वर्षांनंतर त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला होता. सुरुवातीला त्यांनी एकमेकांच्या संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला होता. मात्र, त्यानंतर त्यांनी एकमेकांवर इतके गंभीर आरोप केले की त्यांच्यात कायदेशीर लढाईला सुरुवात झाली. संजय कपूर यांनी शारीरिक व मानसिकरित्या शोषण केल्याचा आरोप करिश्माने घटस्फोटाच्या याचिकेत केला होता. तसेच, असेही म्हटले होते की जेव्हा ती गरोदर होती, त्यावेळी संजयच्या आईने दिलेला ड्रेस तिला बसत नव्हता, त्यावेळी संजयने त्याच्या आईला करिश्माला कानाखाली मारण्यास सांगितले होते.

याबरोबरच, संजय यांनी देखील करिश्मावर आरोप केले होते. करिश्माने पैशांसाठी लग्न केल्याचे त्यांनी आरोप केला होता.

दोन वर्षे त्यांनी एकमेकांवर अनेक आरोप केले. त्यानंतर २०१६ मध्ये त्यांनी परस्पर संमतीने घटस्फोट घेतला. त्यावेळी झालेल्या करारानुसार, अभिनेत्रीला त्यांची दोन मुले, समायरा आणि कियान यांचा ताबा मिळाला. संजय कपूर यांना त्यांच्या मुलांना भेटण्याचा आणि त्यांच्याबरोबर सुट्टी घालवण्याचा हक्क देण्यात आला.



> दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर, विशेषतः पेरूच्या आसपास, मासेमारी हा अनेक लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. सुमारे १६०० च्या दशकात तिथल्या मच्छीमारांना एक गोष्ट लक्षात येऊ लागली. दर काही वर्षांनी अचानक समुद्रातील माशांचे प्रमाण खूप कमी होत असे. मासेमारीत घट होत असे, समुद्री पक्ष्यांची संख्या कमी होत असे आणि किनाऱ्यावरील अर्थव्यवस्थेलाही मोठा फटका बसे. तर काही वर्षी परिस्थिती अगदी उलट असायची- समुद्रात भरपूर मासे मिळायचे. विशेष म्हणजे हा बदल बहुतेक वेळा डिसेंबरमध्ये, म्हणजे ख्रिसमसच्या सुमारास जाणवत असे.

# पावसावर यंदा 'एल निनोचा परिणाम'

**डॉ. एस.डी. सानप**

'यंदा एल निनो सक्रिय होणार', 'मान्सूनवर त्याचा परिणाम होईल', 'पाऊस कमी पडू शकतो' अशा चर्चा सर्वत्र सुरू आहेत. हवामान आणि मान्सून यांच्याशी संबंधित जवळपास प्रत्येक चर्चेत हा शब्द हमखास ऐकायला मिळतो.एक छोटी पण महत्त्वाची गोष्ट आधी सांगावीशी वाटते. अनेकजण 'El Niño' चा उच्चार 'अल निनो' असा करतात. प्रत्यक्षात योग्य उच्चार 'एल निनो' असा आहे.

दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर, विशेषतः पेरूच्या आसपास, मासेमारी हा अनेक लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. सुमारे १६०० च्या दशकात तिथल्या मच्छीमारांना एक गोष्ट लक्षात येऊ लागली. दर काही वर्षांनी अचानक समुद्रातील माशांचे प्रमाण खूप कमी होत असे. मासेमारीत घट होत असे, समुद्री पक्ष्यांची संख्या कमी होत असे आणि किनाऱ्यावरील अर्थव्यवस्थेलाही मोठा फटका बसे. तर काही वर्षी परिस्थिती अगदी उलट असायची- समुद्रात भरपूर मासे मिळायचे.

विशेष म्हणजे हा बदल बहुतेक वेळा डिसेंबरमध्ये, म्हणजे ख्रिसमसच्या सुमारास जाणवत असे. स्थानिक लोक स्पॅनिश भाषा बोलत असल्यामुळे त्यांनी या उष्ण समुद्री परिस्थितीला 'एल निनो' असे नाव दिले. तर ज्या वर्षी समुद्रातील परिस्थिती थंड आणि अनुकूल राहायची, त्या अवस्थेला पुढे 'ला नीना' म्हणजे 'लहान मुलगी' असे म्हणू लागले. आज जगभर प्रसिद्ध असलेले 'एल निनो' आणि 'ला नीना' हे शब्द कोणत्याही प्रयोगशाळेत जन्माला आले नाहीत, तर साध्या मच्छीमारांच्या अनुभवातून निर्माण झाले.

पुढे हळूहळू वैज्ञानिकांना लक्षात आले की ही फक्त समुद्रातील बदलाची गोष्ट नाही. तिचा जगभरातील हवामानावर परिणाम होतो. भारतातही या गोष्टीचे महत्त्व एका मोठ्या संकटानंतर समजले. १८७७ मध्ये भारतात भीषण दुष्काळ पडला. लाखो लोकांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले. त्यानंतर मान्सूनचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्याची गरज प्रकर्षाने जाणवली. भारतीय हवामान विभागाचे पहिले मुख्य अहवालकर्ता सर एच. एफ. ब्लॅनफोर्ड यांनी हिमालयातील हिमवृष्टीच्या आधारे पावसाचा अंदाज देण्याचे प्रयत्न सुरू केले. १८८२ ते १८८५ दरम्यान त्यांनी प्राथमिक अंदाज जारी केले. त्या काळासाठी हे मोठे पाऊल होते. यानंतर भारतीय हवामान विभागाने दरवर्षी नियमित मान्सून अंदाज जाहीर करण्यास सुरुवात केली.पुढे सर जॉन इलियट आणि विशेषतः सर गिल्बर्ट वॉकर यांनी या संशोधनाला अधिक वैज्ञानिक दिशा दिली. वॉकर यांनी जगभरातील हवेच्या दाबातील बदलांचा अभ्यास करताना 'सदर्न ऑसिलेशन' या महत्त्वाच्या घटनेचा शोध लावला. पण खरी क्रांती १९६० च्या दशकात झाली. हवामान शास्त्रज्ञ जेकब जर्कनिस यांनी 'एल निनो' आणि 'सदर्न ऑसिलेशन' या दोन वेगळ्या मानल्या जाणाऱ्या घटनांमधील संबंध स्पष्ट केला. त्यांनी दाखवून दिले की पॅसिफिक महासागरातील पाण्याचे तापमान आणि वातावरणातील हवेच्या दाबातील बदल हे एकमेकांशी जोडलेले आहेत. जेव्हा व्यापार वारे (Trade Winds) कमकुवत होतात, तेव्हा उष्ण पाणी पूर्व पॅसिफिककडे सरकते आणि महासागर-वातावरणामध्ये मोठे बदल सुरू होतात. यालाच पुढे ENSO – El Niño Southern Oscillation – असे नाव देण्यात आले. १९८० पर्यंत वैज्ञानिकांना हे स्पष्ट झाले की ंएध ही पृथ्वीच्या हवामान व्यवस्थेतील अत्यंत प्रभावी प्रणाली आहे. मान्सून, दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि जागतिक हवामानातील अनेक बदल ंएध शी संबंधित असतात.सध्या जग पुन्हा एकदा नव्या एल निनोकडे वाटचाल करत आहे. अनेक संशोधकांच्या मते हा आतापर्यंतच्या सर्वात शक्तिशाली एल निनोंपैकी एक ठरू शकतो. अर्थात तो अजून सुरुवातीच्या अवस्थेत आहे आणि अंतिम परिणाम नेमका किती होईल हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईल. पण जर सध्याचे अंदाज खरे ठरले, तर त्याचा परिणाम जगभर जाणवू शकतो.

आज परिस्थिती पूर्वीपेक्षा काहीशी वेगळी आहे. आता उपग्रह, महासागर निरीक्षण यंत्रणा आणि प्रगत हवामान मॉडेल्समुळे एल निनोवर सतत लक्ष ठेवता येते. शेती तंत्रज्ञानही सुधारले आहे. त्यामुळे पूर्वीसारखा अन्नधान्याचा मोठा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता कमी आहे. पण तरीही एल निनोमुळे अनेक अडचणी वाढू शकतात. उदाहरणार्थ, आधीच जगभरात खतांचा तुटवडा, ऊर्जा दरवाढ आणि युद्धांमुळे आर्थिक ताण निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत एल निनोमुळे दुष्काळ, उष्णतेच्या लाटा किंवा उत्पादनात घट झाली, तर त्याचा परिणाम अधिक गंभीर होऊ शकतो.

एल निनोची तीव्रता मोजण्यासाठी मध्य आणि पूर्व पॅसिफिक महासागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान पाहिले जाते. सामान्य एल निनोमध्ये तापमान साधारण १ अंश सेल्सिअसने वाढते. पण १९८२, १९९७ आणि २०१५ मधील शक्तिशाली एल निनो घटनांमध्ये ही वाढ २ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होती.

# गोष्ट झुरळांच्या आत्मसन्मानाची

**तुंबी दुराई**

कोणे एके काळची ही गोष्ट. एका विद्वानाच्या घरातील पुस्तकांच्या कपाटातले ग्रंथ कुरतडता कुरतडता एक तरुण झुरळ अचानक थांबले. 'जे काही कुरतडायचे आहे ते नीट वाचून कुरतडावे' असे संस्कार झुरळीने त्याच्यावर केले होते. त्याच घरातील एका लाकडी कपाटाच्या फटीत त्या झुरळाचे घर होते.झुरळीला - म्हणजे त्याच्या आईला एकाच वेळी १६ पिल्ले झाली, त्या सगळ्यांना झुरळीने त्याच्या त्याच्या बौद्धिक कुवतीनुसार जगण्याचा मंत्र दिला होता आणि त्यांच्यात भांडणे होऊ नयेत, म्हणून खाण्याच्या वेगवेगळ्या सवयी लावल्या होत्या. एकाला स्वच्छतेची अजिबात आवड नव्हती, त्याला तिने कचऱ्यातून खाद्य कसे शोधायचे ते शिकवले. एकाला अगदी लहान असल्यापासून फटीतून बाहेर पडून उत्सुकतेने जगात काय चालले आहे, ते पाहण्याची सवय होती. त्याला झुरळीने वृत्तपत्रे कुरतडून जगण्याचा सल्ला दिला.

एक पिल्लू सतत 'मी बाहेर जातो... मी बाहेर जातो' असा धोशा लावायचे, त्याला ती एक दिवस रेल्वे स्थानकात घेऊन गेली आणि लोकल गाड्या, ट्रेन्सची ओळख करून दिली. रोज नवे स्थानक, रोज नव्या प्रवाशांच्या टिफिन्समधील स्वादिष्ट जेवण यामुळे ते आनंदाने कधी वातानुकूलित, तर कधी साध्या डब्यातील आसनांच्या फटींमध्ये राहू लागले. एका पिल्लाला सतत याचा निरोप त्याला, त्याचा निरोप याला देण्याचे व्यसन होते. झुरळी आई एक दिवस त्याला घेऊन पोष्टात गेली. तिथे निरोपाची असंख्य पत्रे पाहून पिल्लू आनंदाने उड्या मारू लागले, झुरळीने त्याला एका टपाल तिकिटामागील गोंद चाखायला दिला, त्याला तो एवढा आवडला, की पत्रे कुरतडून तिकिटांच्या मागील गोंद खाणे हेच त्याचे जीवितकार्य झाले. एक पिल्लू सतत गंभीर चेहरा करून चिंतन करायचे. जगात आपल्या किती जाती आहेत, आपले शास्त्रीय नाव काय आहे, असे प्रश्न विचारून तो झुरळीला भंडावून सोडायचा. झुरळी एक दिवस त्या पिलांच्या जन्मदात्याला म्हणाली, 'याचे काय करावे तेच कळत नाही.' झुरळ म्हणाले, 'तुला पिल्ले हवी होती ती मी दिली, त्यांचे काय करायचे ते तूच बघ, मी आता दुसरी झुरळी शोधतो.'झुरळी घरभर फिरली, तिला पुस्तकांचे कपाट दिसले तेव्हा तिला आनंद झाला. सतत प्रश्न विचारणाऱ्या पिल्लाला तिने ते कपाट दाखवले आणि म्हणाली, 'तुझ्याकडे जेवढे प्रश्नही नसतील तेवढी उत्तरे या कपाटातील पुस्तकांत आहेत. आता मनसोक्त पुस्तके कुरतड, मात्र नीट वाचून कुरतडत जा.' तर अगदी सुरुवातीला ग्रंथ कुरतडता कुरतडता अचानक थांबले ते झुरळ हेच. ते थांबले कारण कुरतडण्यापूर्वी पुस्तकाचे पान वाचता वाचता त्याला एका ठिकाणी झुरळांचा उल्लेख आढळला. त्याने ते वाक्य पुन्हा पुन्हा वाचले 'एखादे झुरळ झटकून टाकावे तसा त्याने मनातला विचार झटकून टाकला...' वाक्य वाचल्यावर त्याला मनस्वी दुःख झाले. 'झुरळ ही काय झटकायची चीज आहे? एवढे क्षुल्लक आहोत की काय आपण?' त्याने तेवढे पान सोडून इतर पाने कुरतडायला घेतली आणि पोट भरल्यावर कागदाचे पचन होऊन विसर्जनाची वेळ आली तेव्हा पुन्हा त्या पावावर येऊन तपकीरी रंगाचे बारीक दाणे शरीरातून कागदावर सोडून 'एखादे झुरळ झटकून टाकावे तसा त्याने मनातला विचार झटकून टाकला...' हे वाक्य अंडरलाइन करून ठेवले

झुरळाच्या मनाला ते वाक्य फार लागले, कारण वाचून वाचून त्याच्यात प्रगल्भता आली होती. प्रत्येकाला मनाप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे, वागण्याचे स्वातंत्र्य आहे, मतभेदांना वाव असला पाहिजे... अशा विचारांनी त्याचे व्यक्तिमत्त्व घडले होते. आपल्याला झटकून टाकण्याची, क्षुल्लक ठरविण्याची ही भाषा त्याला अस्वस्थ करून गेली. त्याने आपल्या भावांना, मित्रांना, मैत्रिणींना, नातेवाईकांना आणि अनेकांना हे वाक्य ऐकवले. काहींना तर आग्रहाने पुस्तकाच्या कपाटात नेऊन ते अंडरलाइन केलेले वाक्य दाखवलेही; परंतु त्यांना त्यात काही वावगे वाटत नव्हते. छान खायचे आणि खडूंच्या रेषा, स्प्रे केलेल्या जागा यांच्यापासून सावध राहून आपली संख्या वाढवायची यातच त्यांना रस होता. जगणे आणि स्वाभिमानाने जगणे यांतला फरक त्यांना कळत नव्हता. वाचनामुळे येणाऱ्या प्रगल्भतेचा त्यांच्यात अभाव होता.

मात्र विचारी झुरळाने आपल्या मनातला विचार कधीच झटकला नाही, तो तसाच डोक्यात ठेवला.वृत्तपत्रे कुरतडणाऱ्या त्याच्या भावाने एक दिवस त्याला सांगितले, 'अरे, मी आजच वाचले, झुरळांची एक नवी जात एका फार मोठ्या विद्वानाने शोधून काढली आहे. त्यावर खूप चर्चा सुरू आहे आणि या झुरळांना असे झटकून टाकता येणार नाही, असे अनेक जण म्हणू लागले आहेत.' पुस्तकी झुरळाला ते ऐकून अतिशय आनंद झाला. ही झुरळांची नवी जात आपल्यापेक्षा हुषार असेना का - अखेर आहेत तर आपलेच भाईबंद. आता, आपणही त्यांना जॉईन व्हायचे आणि झुरळांच्या आत्मसन्मानाच्या या लढाईत सहभागी व्हायचे. तो भावासोबत वृत्तपत्रांच्या गठ्ठ्यात शिरला आणि त्याने त्या बातम्या वाचून काढल्या. ज्यांनी झुरळांची ही नवी जात शोधली होती, त्यांच्याबद्दल त्या झुरळाच्या मनात आदराची भावना दाटून आली. आपण या महाशयांची भेट घेऊन आभार व्यक्त केलेच पाहिजे, असे त्याला वाटू लागले. जाताना काही तरी स्नेहाची, आदराची भेटही घेऊन गेले पाहिजे असे वाटल्यामुळे त्याने पुन्हा बातम्यांकडे मोर्चा वळवला आणि हल्ली कोण काय भेटी देतो त्याचा शोध घेतला.त्या महान व्यक्तीचे घर शोधून एका रात्री ते तिथे पोहोचले. घरात कायद्याचे जाड-जाड ग्रंथ पाहून झुरळ सुखावले. ती व्यक्ती टेबल लँपच्या उजेडात एक ग्रंथ वाचत असतानाच, एका पानावर ते झुरळ मागच्या दोन पायांवर उभे राहिले आणि...'आमच्या स्नेहादराच्या या भेटीचा कृपया स्वीकार करावा' असे म्हणत त्याने पुढील दोन पायांत धरलेले मेलडी चॉकलेट पुढे केले!




# महाराष्ट्रातील सिंचन धोरणाचे विदारक वास्तव!

**सुनील निमसरकर**

देशात सर्वाधिक, म्हणजे अडीच हजारांपेक्षा जास्त धरणे एकट्या महाराष्ट्रात आहेत, तरीही, येथील ७० टक्क्यांहून अधिक शेती आजही मान्सूनच्या लहरीवरच अवलंबून आहे. गेल्या काही दशकांत जलसिंचन प्रकल्पांवर अब्जावधींचा निधी खर्च होऊनही राज्यात सिंचनाची परिस्थिती बदललेली नाही. या परिस्थितीला जबाबदार असलेला भ्रष्टाचार, सरकारी यंत्रणेची दिरंगाई आणि चुकीच्या धोरणांमुळे अनेक मोठे धरण प्रकल्प आजही अपूर्ण अवस्थेत असून कागदावरच रखडले आहेत. वास्तविक सिंचनाची शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यामध्ये कदाचित कसूर केल्यामुळेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनिश्चितता आली आणि या अभावामुळे तो कर्जाच्या दुष्टचक्रात अडकला असून सरकारच्या चुकीच्या धोरणांनी त्याला मृत्यूच्या खाईत लोटले आहे.

सरकारी आकडेवारी आणि जमिनीवरील वास्तव: केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या 'नॅशनल रजिस्टर ऑफ स्पेसिफाइड डॅम्स-२०२५' च्या अधिकृत आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात २६९६ धरणे आहेत. यातील २६९१ धरणे पूर्ण झाली असून ५ धरणांचे काम अजूनही सुरू आहे. दुसरीकडे



राज्याच्या जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार, येथे लहान-मोठे मिळून ३५०० हून अधिक जलसिंचन प्रकल्प आहेत. मात्र, यातील जुने आणि नवीन मिळून तब्बल २२५ जलसिंचन प्रकल्प आजही रखडलेल्या किंवा अपूर्ण अवस्थेत लटकले आहेत. गेल्या तीन दशकांत सरकारने सिंचनक्षेत्रावर २ लाख कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च केला; परंतु प्रत्यक्ष सिंचन क्षमतेत त्या प्रमाणात कोणतीही वाढ झाली नाही. सिंचन विभागाच्या या अपयशावर २०१४ च्या 'चितळे समिती'च्या अहवालाने थेट शिक्कामोर्तब केले होते. या अहवालात स्पष्ट नमूद केले होते की, १९९९ ते २००९ या १० वर्षांत तब्बल ७०,००० कोटी रुपये खर्चूनही राज्याच्या सिंचन क्षमतेत अवघी ०.१ टक्के एवढीच वाढ झाली होती.वर्तमानातील परिस्थितीचा विचार केला तर, राज्याच्या जलसंपदा विभागाच्या जून २०२५ पर्यंतची आकडेवारी सांगते की, संपूर्ण राज्यात ५७.१६ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे. या क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टिकोणातून सरकार 'जलयुक्त शिवार २.०' आणि 'बळीराजा जलसंजीवनी' सारख्या योजनांचे कार्यान्वयन करत आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्यातील रखडलेले ९१ प्रकल्प २०२६ पर्यंत पूर्ण होतील, पण २०१८ मधील ही योजना डिसेंबर २०२० मध्येच पूर्ण होणे अपेक्षित होते. सरकारच्या ढिसाळ धोरणांमुळे आधी २०२३ आणि आता ही मुदत थेट २०२६ पर्यंत पुढे नेण्यात आली आहे. थोडक्यात, जुन्याच अपयशाचे ओझे वागवत, त्यालाच आता नवीन उद्दिष्ट म्हणून सादर करण्याचा प्रकार सुरू आहे.विषय केवळ दिरंगाईचा नसून जमिनीवरील वास्तवाचाही आहे. सरकार ५७.१६ लाख हेक्टर क्षमतेचा दावा करत असले, तरी प्रत्यक्ष वापर आणि क्षमता यांमध्ये मोठी तफावत आहे. ताज्या आर्थिक सर्वेक्षणाच्या अहवालात नमूद प्रमाणे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, उपसा व लघु पाटबंधारे या तिन्ही श्रेणींची एकूण सिंचन क्षमता जून २०२५ पर्यंत २१.७० लाख हेक्टर दाखवण्यात आली आहे; पण वर्ष २०२४-२५ मध्ये यापैकी अवघ्या ९.३८ लाख हेक्टरचाच प्रत्यक्ष वापर होऊ शकला. इतकेच नव्हे तर याच श्रेणीतील सुमारे ८९५२ लहान-मोठे प्रकल्प आजही प्रगतीपथाच्या नावाखाली अपूर्ण लटकलेले आहेत, जे लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी मारत आहेत. हेच कारण आहे, की मोठ्या दाव्यानंतरही प्रत्यक्ष सिंचनाचा आवाका आजही एकूण शेतीयोग्य जमिनीच्या २३-२४ टक्क्यांच्या पुढे जाऊ शकलेला नाही, तर सरकारी दावा जवळपास ३३ टक्क्यांचा केला जात आहे. हा मधला ९ ते १० टक्क्यांचा फरक साधारण १६.६१ लाख हेक्टर जमीन केवळ कागदावरच ओलिताखाली आहे, जिथे अपूर्ण कालव्यांमुळे पाण्याचा एक थेंबही पोहोचलेला नाही.

विदर्भ-मराठवाडा उपेक्षितच: जर भौगोलिक आणि राजकीय परिस्थितीकडे पाहिले तर राज्याच्या सिंचन बजेटचा आणि धरणांचा मोठा हिस्सा राजकीय प्रभावामुळे केवळ पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रात केंद्रित झाला आहे. एकट्या पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा आणि भीमा नदीच्या खोऱ्यात धरणांची संख्या सर्वाधिक आहे. याउलट, शेतकरी आत्महत्येचे केंद्र बनलेला विदर्भ आणि मराठवाडा आजही भीषण जलसंकटाचा सामना करत आहेत. या भागात धरणांची संख्या कमी आहेच; पण ज्या काही योजना सुरू केल्या, त्याही अनेक दशकांपासून सरकारी यंत्रणेच्या सुस्त कारभारामुळे अर्धवट पडून आहेत.

या प्रादेशिक विषमतेचा अंदाज यावरून येतो की, संपूर्ण राज्याची सिंचन सरासरी १८-२० टक्के असून ती देशात सर्वात कमी आहे. साहजिकच विदर्भ आणि मराठवाड्याची स्थिती यापेक्षाही वाईट आहे. येथे सिंचनाची व्याप्ती अवघ्या १२-१५ टक्क्यांवर मर्यादित आहे. याचा अर्थ येथील ८५ टक्क्यांहून अधिक शेती आजही पूर्णपणे पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे.

'गोसीखुर्द' प्रकल्प: ३७२ कोटींचे बजेट २५ हजार कोटींवर: विदर्भातील गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प सरकारी सिंचन व्यवस्थेच्या अपयशाचा जिवंत पुरावा आहे. १९८३ मध्ये अवघ्या ३७२ कोटी रुपयांच्या मूळ बजेटसह आणि २.५९ लाख हेक्टर सिंचनाचे उद्दिष्ट ठेवून सुरू झालेला हा प्रकल्प चार दशकांच्या दिरंगाईमुळे आज तब्बल २५,९७२.६९ कोटींच्या घरात पोहोचला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, धरणात सध्या १,१४६.०७५ दशलक्ष घनमीटर पाण्याचा साठा उपलब्ध असूनही वर्ष २०२५-२६ चे प्रत्यक्ष सिंचन नियोजन अवघे १,२९,११८ हेक्टर इतकेच मर्यादित आहे. म्हणजेच, अब्जावधी रुपयांची उधळपट्टी होऊनही आणि २२,२५८ हेक्टर जमीन बुडवूनही हा राष्ट्रीय प्रकल्प आपल्या मूळ लक्ष्याच्या अर्ध्या टप्प्यापर्यंतही पोहोचू शकलेला नाही.

सिंचनासाठी १,११०,५९४ दशलक्ष घनमीटर पाणी आरक्षित असूनही, मुख्य कालव्यांसह टेकेपार, नेरला आणि शिवनाला सारख्या उपयोजनांमध्ये या वर्षी रब्बी हंगामातील प्रत्यक्ष सिंचन शून्यावर आहे. संपूर्ण प्रकल्पात रब्बीचे नियोजन केवळ ७००० हेक्टर आहे. यावरून हे स्पष्ट आहे, की अपूर्ण कालव्यांमुळे या प्रकल्पाचा मोठा हिस्सा आजही केवळ फायलींमध्येच बंदिस्त आहे.नैसर्गिक नव्हे, मानवनिर्मित संकट: विदर्भ-मराठवाड्यातील शेतकरी जर आजही मान्सूनच्या पावसावरच अवलंबून आहे, तर तो सिंचनाच्या भीषण अभावामुळे.